म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.
REFBK 0000088
REFBK-0000088

॥ श्रीगुरुदेव दत्तप्रसन्न ॥

# गोविंद विनायक आपटे

यांचा खटला

ऊर्फ

# न्यायाचा मासला.

हें पुस्तक

गोविंद विनायक आपटे [illegible]

ह्यांनीं

तयार केलें

REFBK-0000088

इ. स. १९०२.

किंमत १ रुपाया.

वाई " मोदवृत्त " छा० छा०

ह्या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क वि. का. यापट ह्यांनीं आपले स्वाधीन ठेविले आहेत.

॥ श्रीगुरुदेवदत्त ॥

## गो० वि० आपटे यांचा खटला.

## ऊर्फ

# न्यायाचा मासला.

आपल्या या भरतभूमीवर अलीकडे अशीं कांहीं अरिष्टें येऊं लागलीं आहेत कीं, त्यांच्या योगानें आपल्या देशाला, आपल्या धर्माला व आपल्या स्वातंत्र्याला सर्वतोपरी उतरती कळा लागली यांत बिलकुल संशय नाहीं.

इ. स. १८९६।९७ सालीं जेव्हां मुंबईस प्लेगनें आपलें ठाणे दिलें व त्याच सालीं हिंदुस्थानांत दुष्काळही पडला, तेव्हां अशीं अरिष्टें आपणांवर व आपले देशावर पुन्हां न यावींत ह्मणून १८९६ सालांत मी कुलाबा जिल्ह्यांतील ता० पनवेल येथें गेलों व तेथील मम देशबंधूंस धर्मोपदेश करूं लागलों. तो असा कीं:—

आ ग धर्मानें चाललें पाहिजे; आपले पूर्वज धर्मानें, नीतीनें, एकविचारानें व देशाभिमानानें वागत होते. तसें आपण हल्लीं वागत नसल्यामुळें आपण आपल्या धर्माला, स्वातंत्र्याला व मोठमोठ्या शौर्यादि कृत्यांला सर्वतोपरी मुकलों. करितां, मम देशबंधूंनों, धर्मानें वागा; आपण आपल्या धर्माचीं तत्त्वें समजून घेण्यास झटा, एक व्यक्तीवर विश्वास ठेवा, प्रत्येक गोष्टींत एकोप्यानें चाला, वगैरे तऱ्हेनें व पूर्वींचें इतिहासामधील शूर पुरुषांचीं व अबलांचीं चरित्रेंही वर्णन करून सांगत होतों. याप्रमाणें सुमारें ३।४ महिने काम चांगल्या रीतीनें चाललें होतें.

माझें उदरनिर्वाहाचें साधन निराळें होतें. ...ीचा व्युन्हाश 'छाप-खान्यांत नोकर असल्यामुळें, तेथील कामकारण नाहीं. दुसरे दिवशी.. आपली सभा आहे, त्या ताम येथेंच सभा होती.

माझे सभेंतील बोलण्याचे जे विषय ते कोणतेही रीतीनें पाहिले असतां निव्वळ बोधपर होते; त्या विषयांत सरकारसंबंधी विरुद्ध मजकूर असण्याचें कारणच नाहीं. कारण, निव्वळ धर्मोपदेश करणारास सरकारची जरूरच नाहीं. सरकार कसेंही वागो, रयतेवर जुलूम करो अथवा न करो; आह्मांला फक्त इतकेंच करणें अवश्य आहे कीं, ज्या धर्मांतील लोक त्या धर्मांतच रहावेत. आपले पूर्वज ज्या धर्माच्या तत्त्वानें आजपर्यंत चालत आले, त्या धर्माचा अभिमान व ज्या देशांत आपल्या पिढ्यानुंपिढ्या रहात आल्या, त्या देशाचा अभिमान प्रत्येकानें बाळगणें हें मनुष्यमात्राचें कर्तव्य आहे.

'दारू ही कोणीं पिऊं नये, दारूपासून शरीरहानि, द्रव्यहानि, अब्रूहानि व सर्वतोपरी नाश करणारी अशी जी दारू ती लोकांनीं सोडून द्यावी' असा उपदेश मी करीत असे. माझ्या उपदेशामुळें दारूच्या नीच व्यसनांतून हजारों लोक सुटले व सुटत होते. माझा प्रयत्न तसाच कांहीं वर्षेपर्यंत चालू असता, तर ही सुरा मीं अजीबात बंद केली असती. परंतु, मध्येंच लचांड उपस्थित होणें, ह्मणजे त्या सुराबाईचेंच दैव जबर; यात शंका नाहीं. असो. याप्रमाणें धर्मसंबंधी व दुर्व्यसन बंद होण्यासंबंधी मी नेहमीं बोलत असे. अशा रीतीचे माझे बोलण्याचे विषय असल्यामुळें दिवसेंदिवस लोक माझ्या सभेला वाढत्या प्रमाणावर ह्मणजे आज दोनशें तर पुढच्या सभेला पांचशें, तसेंच पुढें हजार, दोन हजार अशा वाढत्या प्रमाणावर येत असत. ता० १८।१२।९६ रोजीं वोर्ले या ठिकाणीं जी सभा भरली होती, त्या सभेस अदमासें ६।७ हजार लोक जमले होते. या सभेंतील विषय एकी, भक्ति व दारू न पिणें हे होते. 'केसरी' वर्तमानपत्रांतून केन साहेबाचें—दारू पिऊं नये, दारूपासून शरीराची व देशाची हानि होते—अशा अर्थाचें आलेलें भाषण वाचून दाखविलें. माझें भाषण झाल्यावर, प्रो० माठे यांचें [illegible]कोडसंबंधीं भाषण झालें व पुढील सभेची ता० २७ ह[illegible]ली.

[illegible] करीत असतां व सभेस बरेच

लोक जमतात असें सरकारला समजल्याबरोबर पुढें प्रत्येक सभेला पोलिस हजर रहात असत; मात्र ता० १८।१२।१६ रोजीं बोर्लें गांवच्या सभेला पोलिस हजर नव्हते. माझें भाषण झाल्यानंतर प्रो. साठे यांच्या भाषणाचे वेळीं मात्र दोनच पोलिस हजर होते.

वरील सभा झाल्यानंतर आह्मी मुंबईस निघून गेलों. मागील सभेंत ठरल्याप्रमाणें ता० २७।१२।१६ रोजीं चिखलें येथील सभेस हजर होण्याकरितां, मुंबईहून ता० २६ रोजीं रात्रौ पनवेल मुक्कामीं गेलों. तों त्या ठिकाणीं एक दोन तासांत आह्मांस अशी बातमी लागली कीं, आमचेवर वॉरंट सुटलें आहे. प्रथम सदरहु बातमी खोटी असावी, असें मला वाटलें; परंतु अशी जी बातमी बाहेर आली, तीवरून थोडासा संशय उत्पन्न झाला व मी एका मित्राकडे गेलों. त्याचे घरीं जों मी जातों तों, त्यानें सदरहु वरील बातमी पक्की आहे व तुह्मीं आतांचें आतां मुंबईस निघून जावेंत हें उत्तम, असें मला सांगितलें. तेव्हां मी त्यांस ह्मणालों—कोणाची चोरी केली नाहीं व कोणाशीं मारामारी केली नाहीं; जर सरकारकडून ह्मणावें, तर सरकाचे विरुद्धही आपण कांहीं गुन्हा केला नाहीं मग आपणांस भिण्याचें कारण काय ? कांहीं नाहीं. आपण आपलें काम चालू ठेवूं. काय होईल तें होईल—असें मी आपले मित्रास सांगून ताबडतोब, पनवेलपासून अदमासें तीन मैलांवर चिखलें ह्मणून एक खेडेगांव आहे, तेथें रात्रीं ८ वाजणेचें सुमारास जाऊन पोहोंचलों. मी गांवांत आल्याची बातमी हां हां ह्मणतां सर्व लोकांस समजली व जो भेटीस येतो, तो मोठ्या घाईनें ह्मणतो— आपटे ! ! ! तुह्मी आज कशाला आलांत; तुमचेवर वारंट सुटलें आहे— तेव्हां मीं त्यांना असें सांगितलें कीं, "ज्याला कर नाहीं त्याला डर कोणाची" या ह्मणीप्रमाणें आह्मीं कोणाचा गुन्हाच केला नाहीं. तेव्हां आपणांस भिण्याचें कांहींच कारण नाहीं. दुसरे दिवशीं ह्मणजे ता० २७ रोजीं चिखलें येथेंच सभा होती.

असो. ता० २७ रोजीं सकाळीं मोठ्या पहाटेस कांहीं जरूरीचें काम असल्यामुळें मी पनवेलीस गेलों. तेथें मित्राचे घरीं बोलत बसलों असतां समोरचे दरवाजामधून वरचेवर कोणी डोकावून पहात आहे असें मला वाटल्यावरून मित्राचे नोकरास दरवाजाबाहेर कोण आहे तें पाहून येण्पास सांगितलें. त्या नोकरानें झटदिशी दरवाजाबाहेर कोण आहे तें पाहिलें व मोठ्या गडबडीनें मजजवळ येऊन, माझे कानांत—' पोलिस ' आहेत— असें त्यानें सांगितलें. ते शब्द ऐकतांच मला थोडीशीं भीति वाटली; परंतु, मोठ्या गंभीरतेनें मी ह्मणालों—कोण ? पोलिस आले आहेत ! कांहीं चिंता नाहीं. गांवांतील जें कांहीं काम होतें तें झालेंच होतें—मित्राचा निरोप घेतला व तेथून निघालों. दरवाज्याबाहेर जों पडतो तों अर्धवट पोलिस ह्मणजे पोलिसी चिन्हें कांहीं अंगावर होतीं व कांहीं नव्हतीं असें तें अर्धवट पोलिस दोन तीन उभे होते. मी जसा पुढें जाऊं लागलों तसे ते माझें मागोमाग मी गांवाबाहेर पडेपर्यंत होते.

मी गांवाबाहेर जाऊन गाडीची वाट पहात उभा राहिलों. मी ज्या गाडींतून पनवेलीस आलों होतों; तीच गाडी परत चिखल्यास जाणार होती; ह्मणून मी गाडीची वाट पहात उभा होतों. माझेपासून थोडेच अंतरावर ते अर्धवट पोलिस उभे होतेच; मीं त्यांतील एकास विचारलें कीं, तुह्मी कोणाला पहातां ? तेव्हां तो ह्मणाला, आमचा एक इसम या रानांत गेला आहे; त्याला आह्मीं पहात आहों. असें त्यांचे बोलणें ऐकतांच मी पुन्हां गावांत जाण्याकरितां निघालों, तों पुन्हां, ते अर्धवट पोलिस माझे मागोमाग आले. तेव्हां मी त्यांना झुकांडी देऊन दुसऱ्याच रस्त्यानें पुन्हां गांवाबाहेर येऊन उभा राहिलों तों ते मोठ्या गडबडीनें धांवत धांवत पुन्हां माझेजवळ आले. त्यावेळेस मला एकदम हंसू आलें. व मीं त्याना पुन्हां विचारलें कीं, तुमचा इसम तुह्मांला मिळाला कीं नाहीं ? तेव्हां ते हंसून ह्मणाले, तुह्मांला मघांशीं आह्मीं जें सांगितलें तें खोटें. तुह्मांला खरें वाटलें नाहीं तें आह्मीं ओळखलें. आह्मी तुमचेकरितांच

येथें उभे आहोंत. मीं त्यांना विचारलें कीं, मजकडे तुमचें काय काम आहे ? तेव्हां त्यांनीं खरें तें सांगितलें. ते ह्मणाले—फौजदारांचा हुकूम असा आहे कीं, मि. आपटे हे जर गांवांत आले तर त्यांचेवर फक्त नजर ठेवावी, ते जिकडे जातील तिकडे त्यांचे बरोबर जावें.. ह्मणून आज सकाळपासून आह्मी तुमचे पाळतीवर आहोंत. इतकें आमचें बोलणें जों होत आहे तों आमची गाडी आली व आह्मी गाडींत बसलों; माझा मुक्काम चिखलें येथेंच आहे असें फौजदार यास सांगा असें त्या अर्धवट पोलिसांस सांगून गाडी हांकली.

त्या गाडींतून जातांना गाडींत असलेल्या मित्राचें व माझें भाषण सदरहु वॉरंटासंबंधानेंच चाललें होतें. वॉरंट कोणाकडून असावें ? फिर्यादी कोण ? वगैरे भाषण चाललें होतें. आह्मी सुमारें १—१॥ मैल गेल्यावर एक मोठी नदी लागली; ती ओलांडून पुढला चढाव चढून गाडी जों वर जाते, तों समोरून हातांत बंदुका असलेले पोलिस येत आहेत असें दिसलें. व थोड्याच वेळांत ते गाडीजवळ येऊन भिडले. त्या पोलिसांनीं मला गाडींत पाहिल्याबरोबर बंदुका सांवरून, जरा नेटानें गाडी उभी करा! असें ह्मणाले. तीन पोलिस व एक हवालदार मिळून चार असावेत! हवालदार मजकडे पाहून ह्मणतो—इकडे सभा करणारे आपटे ते तुह्मीच कां ? तेव्हां मी ह्मणालों—सभेंत बोलणारा आपटे तो मीच. हवालदार ह्मणतो—जर तुह्मी तेच आपटे आहांत, तर तुह्मांला पकडून आणणेविषयीं फौजदार यांचा हुकूम आहे. असें हवालदार ह्मणतांच मी ह्मणालों—सभेंत बोलणारा आपटे मीच आहें, अशी जर तुमची खात्री असेल व तुह्मीं मला कधीं सभेंत अगर कोठें पाहिलें असेल तर पकडा. हवालदार ह्मणतो—तुह्मांला मीं कधीं पाहिलें नाहीं. त्यावर मी ह्मणालों—मग तुह्मी ज्या आपट्यांना पकडणार त्यांचें वॉरंट तुमचे जवळ आहे काय ? हवालदार ह्मणतात आमचे जवळ वॉरंट नाहीं. जर तुमचेजवळ वारंट नाहीं, तर तुह्मी कोणत्या कायद्याचे आधारानें पकडूं शकाल ? हवाल-

दार ह्मणतात—वॉरंट फौजदार यांचे जवळ आहे.—बरें तर आह्मी जातों आतां;—असें ह्मणून आह्मीं गाडी चालू केली.

माझें लक्ष्य पोलिसकडे होतेंच; ते पोलिस एकमेकांत कुजबुजूं लागले व थोडयाच वेळांत ते धांवत धांवत आमचे गाडीजवळ आले. एक पोलिस गाडीपुढें व बाकीचे मागें याप्रमाणें उभे राहून, पुन्हां आमची गाडी त्यांनीं उभी केली.

हवालदार ह्मणतो—तुह्मीच ते आपटे आहांत, तेव्हां आतांचें आतां पनवेलीस तुह्मांला आलें पाहिजे. जर विनाकारण तक्रार कराल, तर (हातकडी) घालून आणण्याचा वरिष्ठाचा हुकूम आहे.

हें वरील उद्दामपणाचें पोलिसचें भाषण ऐकतांच माझें तळव्याची आग मस्तकाला पोंचली व असा राग आला कीं, डोळे लाल झाले व अंग थरथरा कांपूं लागले. मी मोठ्या रागानें हवालदार यांस ह्मणालों—एखाद्या अडाण्यी, कातकरी, वारली, ठाकूर अशा अन्य जातीला असलें भेडसावणें दाखवा, तूर्त माझ्याशीं प्रसंग आहे; जर तुमचेजवळ वॉरंट असेल तर दाखवा, नाहींतर मुकाट्यानें चालते व्हा.

असें माझें बोलणें ऐकतांच हवालदारसाहेब एकदम नरम झाले व ह्मणाले—आपल्याला सर्व कायदा माहिती आहेच व तुमचें ह्मणणें बरोबर आहे. आतां आह्मांला तुमचेबरोबर कांहीं तक्रार करतां येत नाहीं; परंतु, तुमचेबरोबर आह्मांस परत चिखल्यास आलें पाहिजे व एका पोलिसास पनवेलीस पाठविलें पाहिजे आणि आतां तर दहा वाजले असतील; आह्मी सर्वजण उपाशीं मरूं; करितां तुह्मी जर पनवेलीस आतांच याल तर आह्मांला जेवण घातल्यासारखें होईल.

असें आर्जवाचें बोलणें जेव्हां पोलिसानें सुरू केलें तेव्हां मी खुशीनें त्यांचे बरोबर पनवेलीस जाणेंस निघालों. गाडींतील मित्राचा निरोप घेतला व त्याचे जवळ चिखल्यांतील मित्रांना—मी पनवेलीस गेलों—असें सांगणेस सांगितलें.

इकडे पोलिसांबरोबर पायीं चालत चालत पनवेलनजीक येऊन पोंचलों. गांवांतून जात असतां हां हां ह्मणतां सर्व गांवभर बातमी पसरली. मी कचेरींत जाऊन पोहोंचेपर्यंत रस्त्यानें लोकांच्या झुंडीच्या झुंडी आमचा देखावा पाहण्यास जमल्या होत्या.

प्रथमत: मला फौजदार यांचे घरीं नेले; व त्या ठिकाणीं, फौजदारांनीं एका लखोट्यांतून एक कागद अर्धवट बाहेर काढून पुन्हां आंत घातला व ते ह्मणाले तुह्मांस पकडून अलीबागेस पाठविणेबद्दल कलेक्टरचा हुकूम आला आहे. नंतर पोलिसांनीं मला खजिन्याचे जवळ नेलें; व तेथें दोन तीन इसमांस बोलावून आणिलें आणि आमचेजवळ असलेल्या सामानाची व कपड्याची त्या इसमांचे देखत यादी केली.

ती येणेंप्रमाणें:——

| | |
|---|---|
| १ एक हिरवा फेटा. | ७ अत्तरांच्या कुप्या तीन. |
| २ सदरा. | १ एक सोनचाफा. |
| ३ कोट. | २ .... हिना. |
| ४ ज्याकिट. | ३ .... गुलाब. |
| ५ नं० धोतर. | ८ कापुराची वडी. |
| ६ काठी. | ९ श्री शिवछत्रपतींची तसबीर. |
| | १० डायरी. |

शिवाय ८११८६ किंवा ८१२८६ वगैरे वगैरे इतकें सामान होतें. आठवलें तेवढें बहुतेक दिलें आहे. याप्रमाणें यादी झाल्यानंतर जवळच असलेल्या एका खोलींत मला बंद केलें.

ज्या वेळेस त्या खोलींत पोलिसानें जाणेस सांगितलें; त्या वेळेस व खोलींत गेल्यावर माझी जी स्थिति झाली ती लिहितां सुद्धां येत नाहीं. कांहीं वेळ झाल्यावर एक पोलिस आला व तो ह्मणाला " तुमची जेवणाची काय व्यवस्था ? " तेव्हां मी त्यांस ह्मणालों,—माझी भूक तहान कोणीकडे गेली कोणास ठाऊक ! पोलिस ह्मणाला— आतां १-१॥ वाजण्याचा

सुमार झाला; तसें करूं नका, कांहीं तरी खाल्लें पाहिजे; वगैरे बोलूं लागला: तेव्हां मी त्यांस ह्मणालों—ठीक आहे. श्री. रा. अंतोबा पटवर्धन यांचे घरीं जाऊन सांगा ह्मणजे ते जेवण पाठवून देतील. हें ऐकून तो पोलिस गेला.

तों दुसरे दोन हत्यारी पोलिस आले व त्यांनीं मला नळावर स्नानास नेलें. जाते वेळीं आमचे हातांत बेडी घालण्याकरितां आणली; ती पाहून मी पोलिसला ह्मणालों—विनाकारण असा त्रास देण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण, मीं जर आपले खुशीनें वॉरंट लागू करून घेतलें आहे; तर आह्मी पळून थोडेच जाणार आहोंत. तो पोलिस जेव्हां फार त्रास देऊं लागला, तेव्हां मीं असा विचार केला कीं, आपण तूर्त बंदिवान् झालों खरें, मग बेडी हातांत घातली आणि न घातली तरी एकच. असा विचार करून हात पुढें केल्याबरोबर त्यांनीं बेडी घातली. नळावर गेल्यावर बेडी काढि-ल्यानंतर स्नान वगैरे झालें. तेथें लोकांचीं गर्दी बरीच झाली होती. स्नान करून परत येतांना हातांत पाण्याचा तांब्या अस-ल्यामुळें बेडी घातली नव्हती. कचेरींत आल्यावर जेवण झालें, व पुन्हां कोठडींत बंद केलें. रात्रौ रा. रा. दातार यांचे कडून फराळाचें आलें होतें तें खाल्लें; व त्या कोठडींत ती सारी रात्र मोठ्या चिंतेंत व विचा-रांत काढिली. उद्यां आपणांस अलिबागेस जावें लागणार, जातांना आपल्याला कसकसा त्रास होईल, पुढें आपली स्थिती काय होणार, अशाप्रकारचे विचारांत ती रात्र सरली.

सकाळीं सुमारें ६—६॥ वाजतां दोन पोलिस आले व त्यांनीं मला कोठडींतून बाहेर काढलें व फौजदाराकडे घेऊन गेले. फौजदारांनीं मला सांगितलें कीं, तुह्मांला आज अलिबागेस पाठवीत आहों. तुमचेबरोबर हे दोन पोलिस आहेत. हे तुह्मांला घेऊन जातील. नंतर ते दोन पोलिस माझेजवळ आले व हातांत बेडी घालूं लागले; तेव्हां मीं त्यांना बरेंच समजावून सांगितलें कीं, जर मला तुह्मी गांवांतून नेणार तर हातांत बेडी घालूं नका. ते पोलिस कांहीं केल्या ऐकेनात; तेव्हां फौजदाराकडून त्या

पोलिसांना बेडी न घालणेंविषयीं सांगितलें. त्या पोलिसांस फौजदार असें ह्मणाले—आपल्यांच्या बद्दलची जबाबदारी तुमचे शिरावर आहे; तरी मला असें वाटतें कीं, यांचे हातांत बेडी घालण्याचें कांहीं कारण नाहीं. कारण, हे कोणी अडाणी मनुष्य नव्हेत, हे समंजस व कायदा जाणणारे आहेत; त्यांतून तुह्मांस जर कांहीं संशय वाटलाच तर तुह्मी वाटेल तशी तजवीज ठेवा. असें फौजदाराचें बोलणें झाल्यावर त्या दोन पोलिसांनीं बेडी न घालण्याचें कबूल केलें व तेथून आह्मी तिघे निघालों तों पेठेंत गेलों. पेठेंत जों जातो, तों माझा जिवलग मित्र पु. ज. चाफेकर माझ्या भेटी-करितां वाटेंत उभाच होता. त्यास पाहिल्याबरोबर कंठ दाटून आला व मित्राचीही तीच स्थिति झाली. परंतु, वेळेकडे लक्ष्य देऊन आह्मीं आपलें दुःख गिळून टाकलें व मित्राबरोबर बोलत चाललों. आमची बोटीवर जाण्याची वेळ झाल्यामुळें पोलिसांनीं फार घाई चालविली; तेव्हां मित्रानें थोडेंसें फराळाचें दिलें तें घेतलें व पोलिसांबरोबर निघालों.

पनवेलहून बंदरावर पायीं जाणेची पाळी आली. मी पोलिसला ह्मणालों—स्वतःचे पैसे खर्चून मी टांगा करितों; तुह्मी आपलें कसें करणार ? तेव्हां ते ह्मणाले—आह्मांला तुमचे बरोबर आलें पाहिजे; तुह्मांला टांग्यांतून एकटें कसें जातां येईल ? मिळून तात्पर्य हें कीं पगार थोडा, ह्मणून स्वतःचे पैसे खर्चण्यास ऐपत नाहीं व सरकारमधूनही त्यांना मिळत नाहींत.

असो. नंतर मीं त्या दोन पोलिसांचे व आपले मिळून तीन प्यासें-जरचे पैसे दिले व एक टांगा केला आणि बंदरावर गेलों. तों बोटीची वेळ झालीच; आह्मी त्रिवर्ग बोटींत जाऊन बसलों व बोट चालू झाली.

मी गांवांतील रस्त्यानें बंदरावर जाणेंस चाललों असतां माझें ऐकि-वांत आलेली थोडीशी बातमी माझे वाचकांस निवेदन करितों.

ता० २७।१२।१६ रोजीं सकाळीं सुमारें ८—८॥ वाजण्याचे सुमा-रास मुं० चिखले येथें, फौजदार यांची स्वारी बरोबर नराधमा

पोलिसी हत्यारबंद लवाजमा घेऊन श्री. रा. रा. विष्णुपंत ऊर्फ आण्णासाहेब पाटणकर इनामदार यांचे वाड्याजवळ दाखल झाली व वाड्यांत जाऊन–सभा भरविणारे आपटे कोठे आहेत ?–वगैरे चौकशी सुरू झाली; व इकडे तिकडे जरा धामधूम उडविली. मी गांवांत सुद्धां नाहीं अशी पोलिस साहेबाची जेव्हां खात्री झाली, तेव्हां त्यांनीं आपल्या लवाजम्याच्या दोन तुकड्या करून, एका तुकडीस गाडीरस्त्यानें पनवेलीस जाण्याचा हुकुम दिला; व दुसरी तुकडी बरोबर घेऊन, फौज-दाराची स्वारी स्वतः पायवाटेनें पनवेलीस निघाली. यांपैकी कोणत्या तुकडीची व आमची कोठें गांठ पडली; हें वाचकांचें लक्ष्यांत सहज येईल.

मागें सांगितल्याप्रमाणें आह्मी बोटींतून चाललों असतां, बरोबर १२ वाजतां बोट मुंबई बंदरास लागली; व तेथून तीच बोट धरमतरकडे जाणेंस निघाली. धरमतर बंदरास सुमारें ३–३॥ वाजतां पोंचली. तेथें जों उतरतों तोंच पोयनाडचे जमादार तेथें उभे होतेच, त्यांनीं मला पाहिल्याबरोबर, आमचे जवळचे पोलिसांस विचारलें कीं, आपटे ते हेच कां ! तेव्हां त्यांनीं, ‘ हो हेच ते आपटे, असें सांगितलें. ’

नंतर बंदरावर असलेल्या खानावळींत जाऊन आणि स्नान, संध्या व भोजन आटोपून जरा विश्रांति घेतली; व येथून १–१॥ मैलाचें अंत-रावर असलेल्या पोयनाड गांवीं जाणेंस निघालों तों दिवे लावण्याचे सुमारास जाऊन पोंचलों. तेथें गेल्यावर आमचे बरोबर आलेल्या पोलि-सांनीं मला तेथें असलेल्या पोलिसांचें स्वाधीन केलें. थोड्याच वेळांत जमादार आले व त्यांनीं सामान वगैरे पाहून मला बंद करण्यास सांगि-तलें. माझें जेवण ५–५॥ वाजतां झाल्यामुळें, मला भूक बिलकूल नव्हती; परंतु, जमादार साहेबांनीं फार आग्रह केल्यामुळें थोडासा फराळ करीन ह्मणून सांगितलें. जमादार यांनीं मला गांवांत फराळास येणेंबद्दल फार आग्रह केला; परंतु, माझी गांवांत येण्यास नाखुषी असल्यामुळें मी होतों त्याठिकाणींच रात्रीं अदमासें ८–८॥ वाजतां फराळाचें ताट

पाठवून दिलें. फराळ वगैरे आटोपल्यानंतर आह्मी आपले ( बंदिस्त— दिवाणखान्यांत ) निजणेंकरितां गेलों व बाहेरून पोलिस रीतीप्रमाणें टाळा ( कुलुप ) बंद करून, पहारा करीत राहिला.

उजाडल्यावर पोयनाडपोलिसगेटपैकीं दोन पोलिस व मी जों निघालों तों १०–११ वाजणेचे सुमारास अलिबागेस जाऊन पोचलों.

जेव्हां अलिबागेजवळ जाऊन पोंचलों, तेव्हां पोलिस ह्मणाले आतां गांव जवळ आलें आहें, येथें अंमलदार लोक रहातात; व जिल्ह्याचें ठाणें आहे. करितां आपले हातांत आतां बेडी घालणें भाग पडतें याबद्दल माफी करा. मी त्यांना ह्मणालों-कांहीं हरकत नाहीं; तुमचें कर्तव्य तुह्मांला केलें पाहिजे. 'खुशाल बेडी घाला' असें ह्मणून मी हात पुढें केले; व त्यांनीं ताबडतोब हातांत बेडी घातली.

गांवांतून जातांना, कांहीं लोक ह्मणत, हे कोण असावेत कांहीं ह्मणत, आपटे ह्मणून ज्या इसमावर वारंट सुटलें होतें ते तर हे नव्हेत !!! याप्रमाणें गांवांतून जातांना लोकांच्या तोंडचे उद्गार कानीं पडत होते. वर सांगितल्याप्रमाणें १०।११ वाजण्याचे सुमारास कचेरींत जाऊन पोहोंचलों. तेथें एका कारकूनाजवळ मी उभा राहिलों. कारकूनानें आमचें सामान जें पोलिसजवळ होतें तें सर्व तपासून घेतलें व आल्याची वर्दी साहेबास कळविणेंकरिता एका पोलिसास पाठविलें. तिकडील हुकूम आल्याप्रमाणें पोलिसांनीं आह्मांला साहेबाचे बंगल्यावर ताबडतोब नेलें. साहेबांनीं आह्मांला पाहिलें व पुन्हां दोन प्रहरीं हजर करण्याचा हुकूम झाला. नंतर तेथून आह्मांला एका मोठ्या बंदोबस्ताचे ठिकाणीं नेलें. तेथें जों पहातों, तों कैदी दृष्टीस पडले. तेव्हां असें वाटलें कीं, हा तुरुंग असावा! असो, तेथें गेल्यावर स्नान वगैरे आटोपून स्वयंपाक केला, व जेवणास बसतों न बसतों तोंच साहेबाकडून लवकर हजर करणें विषयीं हुकूम आला. मग काय विचारतां! घाई घाईनें दोन घास खाल्लें व तसाच उठलों आणि कपडे घातले तों हत्यारबंद पोलिस तयार होतेच.

त्यांचेसह साहेबाचे बंगल्यावर गेलों. पोलिसांनीं साहेबाचे पुढें मला उभे केलें व आपण पाठीमागें उभे राहिले. त्यावेळेस प्रो० साठे हेही माझे जवळ उभे होते. नंतर कांहीं वेळानें माझेतर्फे कोणी वकील वगैरे हजर नसल्यामुळें खटल्याची तारिख ३१।१२।९६ ही नेमण्यांत आली. व कचेरी बरखास्त झाली. तेथून मला पुन्हां त्या बंदोबस्ताचे ठिकाणीं नेलें.

अलिबागेंत ज्या ठिकाणीं मला ठेविलें होतें; त्या ठिकाणास **हिरा-कोट** असें ह्मणतात. या हिराकोटांत पूर्वीं देवीचें मंदिर होतें; व त्या वेळीं याचें नांवही निराळें असावें! या देवीची स्थापना **आंग्रे यांनीं** केली असावी! कारण, अलिबाग वगैरे कोकणपट्टीवर आंग्र्यांचें वर्चस्व होतें. ह्मणून कदाचित् हा हिराकोटही यांनींच बांधलेला असावा. हल्लींही या कोटांत देवीचें अस्तित्व आहे. असो. आतां आपण आपलें तारखेकडे वळूं. मागें ठरल्याप्रमाणें ता. ३१।१२।९६ रोजीं दोनप्रहरीं साहेबांचे समोर आह्मांस उभे केलें व काम चालूं झालें. माझी सही वकिलपत्रावर घेऊन वकिलांनीं वकीलपत्र हजर केलें. थोडा वेळ खटला चालल्यावर पुन्हां तारीख नेमली. ता० ११।१।९७ मुक्काम पेण येथें तारीख नेमली गेली.

आतां वाचकांना प्रो० साठे हे कोण वगैरेसंबंधी माहिती देतों. प्रो० साठे हे पुणें येथील सार्वजनिक सभेचे सेक्रेटरी होते. हे फक्त फ्यामिन्‌कोड रयतेला समजून सांगत. हे वक्ते फार चांगले आहेत.

ता० १८।१२।९६ रोजच्या बोर्लें गांवचे सभेला हे मागाहून आले. प्रो० साठे यांनीं पनवेलहून मला चिठ्ठी पाठविली होती कीं, तुमचे सभेला पुष्कळ लोक जमले आहेत; तेव्हां माझे मनांत तेथें येऊन, जमलेल्या सर्व लोकांस फ्यामिनूकोड समजून द्यावे असें आहे. तरी ही चिठ्ठी पहातांच—तुह्मीं आगर तुमचे मित्र कोणींतरी, चिठ्ठी घेऊन आलेल्या इसमाबरोबर पाठविलेल्या टांग्यातून लवकर यावें—अशा अर्थाची चिठ्ठी, माझ्या सभेचें काम चाललें असतां, प्रो० साठे यांचेकडून आली. तेव्हां मीं असा विचार केला कीं, जर आपण पनवेलीस गेलों तर येथें एकही

मनुष्य रहाणार नाहीं. ह्मणून मीं जमलेल्या लोकांस असें सांगितलें कीं, पुण्याहून एक विद्वान् गृहस्थ आले आहेत; अशा विद्वान् व हुशार गृहस्थाचें भाषण तुह्मांला ऐकण्यास मिळणें दुर्लभ आहे. त्यांचे मनांतून तुह्मांला थोडासा उपदेश करणेचा आहे ह्मणून त्यांनीं मला ही चिठ्ठी पाठविली आहे. जर तुह्मी ते येई तोंपर्यंत थांबत असाल, तर त्यांना आणणेंकारितां, मी आपलें मित्रांस पाठवितों. याप्रमाणें माझें बोलणें ऐकतांच, सर्वांकडून एकदम—ते पुणेकर येई तोंपर्यंत आह्मी बसतों—असें उत्तर आलें. ह्मणून मीं तावडतोब प्रो. साठे यांना आणणेकरितां आपलें मित्रास पाठविलें. त्याप्रमाणें ते आले व त्यांचें भाषणही चांगलें झालें. जेव्हां प्रो० साठे पनवेलहून बोर्ले येथील सभेला आले; तेव्हां त्यांचे बरोबर बरीच मंडळी आली होती. ज्यावेळेस प्रो. साठे हे सभेच्या ठिकाणीं आले व त्यांचें भाषण सुरू झालें; तेव्हां मी चोहोंकडे नीट पहात होतों; कारण, प्रथमपासून आजचे आमचे सभेला पोलिस हजर नव्हते. व आतां पनवेलहून बरेच लोक आले आहेत, तेव्हां पोलिसही कदाचित् आले असतील ह्मणून मी चोहोंकडे पहात होतों तों दोन पोलिस दृष्टीस पडले. सभेंत माझें भाषण सुरू झाल्यापासून रोंपेपर्यंत मी वरचेवर पोलिसांस कां पहात होतों, याचें कारण, पोलिसास वरिष्ठ अधिकाऱ्यांचा असा हुकूम होता कीं, प्रत्येक सभेला पोलिसांनीं हजर राहून सभेचा रिपोर्ट करावा. अशा अर्थाचा हुकूम झालेला आमचे ऐकिवांत होता व माझ्या प्रत्येक सभेचे चांगले रिपोर्टही गेल्याचे माझें ऐकण्यांत आले होते. ह्मणून मी वरचेवर पोलिसांस पहात होतों. माझ्या भाषणानंतर प्रो० साठे यांचे भाषणाचेच वेळीं मात्र दोन पोलिस हजर होते, त्याचे आधीं माझे भाषणाचें वेळीं पोलिस नव्हते.

असें असतां ता० १८।१२।१६ रोजीं बोर्ले गांवचे सभेस पोलिस हजर नसतां मी सभेंत अमुकच बोललों असा पोलिसानें जो पुरावा केला तो कां ? व असें करण्याचें कारण काय? तें त्यांचे

त्यांनाच माहित ! पुढील पोलिसच्या जबान्यांवरून सुद्धां पोलिस सभेला हजर होते किंवा नव्हते हें वाचकांचें सहज लक्ष्यांत येईल.

अलिबागेंतील हिराकोटांत ता० २९।१२।१६ पासून ते ता० १०।१।१७ सकाळीं १० वाजेपर्यंत मुक्काम होता. इतके दिवस या हिराकोटांत रहावें लागलें. येथें रोज सकाळीं व संध्याकाळीं स्वयंपाक करून जेवावें लागत असे; या हिराकोटांत कैदीही रहातात. हा लहानसा जेल ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. येथील जेलर हे स्वभावानें फार चांगले होते. या हिराकोटांत खजिना असतो व याला आंत जाण्यास एकच दरवाजा आहे. हा दरवाजा जरा मोठ्यापैकींच आहे. दरवाज्याचें आंतलें बाजूस ज्या ओऱ्या आहेत, त्यांत पोलिसांचें ठाणें असतें. येथें अहोरात्र हत्यारी पोलिसांचा पहारा असतो; हा पहारा रात्रौ दरवाज्यांत नसतो; खजिना व कैदी यांवर असतो. या कोटांत आल्यावर १।२ दिवसांनीं माझे प्रकृतीस बरें वाटेना. कारण, पोयनाडहून चालत आल्यामुळें फारच त्रास झाला होता; ह्मणून, तेथें डॉक्टराचें औषधही घेत होतों.

असो. मागें ता. ३१।१२।१६ रोजीं साहेबाकडे काम चाललें असतां, आमचेतर्फेच्या वकिलांनीं साहेबांकडे माझी भेट १।२तास व्हावी! अशी विनंति केली. त्याप्रमाणें साहेबांनीं भेट होईल ह्मणून सांगितलें; व जेलर यांना साहेबांनीं अशा अर्थाची एक चिठ्ठी लिहिली कीं, आरोपीस आरोपीचे वकील भेटण्यास आले असतां १।२ तास आरोपीची भेट करून देणें. त्याप्रमाणें, एके दिवशीं आह्मी आपलें कोठडींत बंद असतां, एकानें आमचे कोठडीचें दार उघडलें व तुह्मांला कोणी भेटण्यास आले आहेत ह्मणून जेलर साहेबांनीं आफिसांत बोलावलें आहे असें सांगितलें. ते शब्द ऐकतांच मी चट्दिशी उठलों व त्या इसमाबरोबर आफिसांत गेलों; तों एक पार्शी खुर्चीवर बसलेला पाहिला. मी आफिसांत गेल्यावर तो पार्शी मला ह्मणाला—मी तुमचेतर्फे वकील आहें; आणि ता० ११।१।१७ रोजीं पेण मुक्कामीं तुमचा खटला चालणार आहे; तेव्हां

तुह्मीं ता० १८।१२।१६ ला बोर्ले गांवचे सभेंत काय बोललांत वगैरे सर्व खरे काय ते सांगा. कारण, मी तुमचेतर्फे वकील आहें ह्मणून. तेव्हां मी त्या पाशीं वकिलास खरें तेंच सांगितलें. तें असें:—एकी व भक्ति या विषयांवर मी बोललों आणि दारू पिऊं नका असें सांगितलें. केसरी वर्तमान पत्रांतलि केन साहेबाचा दारू वाईट आहे ती पिऊं नये—अशा संबंधी आलेला लेख वाचून दाखविला.

याशिवाय स्वामिभक्ति, देशाभिमान, धर्माभिमान, ऐक्यता, शौर्य व भक्ति हे गुण ज्यांच्या अंगीं वसत होते, असे जे पूर्व इतिहासप्रसिद्ध शूर वीर व अबला अशांचे गुण वर्णन करून सांगत होतों. सरकारविरुद्ध मी सभेंत कांहींच बोललों नाहीं. याप्रमाणें वकिलांनीं हकीकत ऐकली व ते मोठ्या ऐटीनें चालते झाले.

सदरहूप्रमाणेंच मला एके दिवशीं जेलर यांनीं आफिसांत नेलें. मी आफिसांत जों जातों, तों एक ख्रिश्चियन खुर्चीवर बसला होता व दुसरा जाडेलासा एक इसम दुसऱ्या एका खुर्चीवर होता. सदरहु ख्रिश्चियन कोणी तरी पोलिसपैकीं असावा असें वाटलें.

### त्यानें केलेले प्रश्न.

१ तुह्मी राहणार कुठले ?
२ धंदा काय करीत होता ?
३ कोणाचे सांगणेवरून व्याख्यानें देतां ?
४ प्रश्नांचीं उत्तरें कां देत नाहीं ?
वगैरे वगैरे कांहीं प्रश्न विचारले.

### उत्तर.

“प्रश्नांचें उत्तर न देण्याचें कारण या ठिकाणीं दारूची घाण येत आहे. दारू पिणाऱ्या मनुष्याचा मला अतिशय राग येतो, तेव्हां येथें उभे राहण्याची माझी इच्छा नाहीं. मला जें सांगणें आहे तें कोर्टांत सांगेन” असें ह्मणून मी आपले कोठडीकडे निघून गेलों.

दुसरे दिवशीं मला समजलें कीं, काल आलेल्या दोन इसमांपैकीं, एक पोलिस इन्स्पेक्टर ख्रिश्चियन व दुसरा जाडेला अलिबागचा फौजदार.

असो. मी ज्या ठिकाणीं होतों त्या मजबूत तटबंदी ठिकाणाचें ' हिराकोट ' हें नांव अलीकडील आहे. या तटबंदीसमोर हेडक्वार्टर ( हत्यारी पोलिस राहण्याच्या बराकी ) व परेड करण्याची जागा असल्यामुळें हिराकोट असें नांव पडलें असावें !

ता० १०।१।९७ रोजीं सकाळीं जेलर यांनीं शिधा लवकर दिला; व—स्वयंपाक, जेवण वगैरे आटोपून १० वाजणेचें आंत तयार असा. कारण, उद्यांची ता० ११ आहे; करितां तुह्मांला आज सायंकाळीं तरी पेणेस गेलेंच पाहिजे; पोलिस तुह्मांला नेण्याकरितां आतां येतील, ह्मणून ह्मणतों १० चे आंत तुह्मीं आपलें तयार असा—असें सांगितलें. जेलर यांचे हुकुमाप्रमाणें, आह्मीं आपलें जेवण आटोपलें व कपडे घालून १०।११ चे आंत तयार होऊन बसलों. तों पोलिस आफिसांत आलेच होते. मीं जेवण वगैरे आटोपलें असें जेलर यांना समजतांच मला बोलावून नेलें; व पोलिसांचे ताब्यांत दिलें. त्या वेळेस एक जमादार व दोन पोलिस होते. एकाचे हातांत बेडी व दुसऱ्याचे हातांत सुताची काढणी होती. पोलिसाचे ताब्यांत जातांच, पोलिस ह्मणाले—चला, हात पुढें करा; तेव्हां मी ह्मणालों—चला कुठें ? पोलिस ह्मणाले—पेणेस जावयाचें. मी ह्मणालों—पेणेस कसें जावयाचें? पोलिस ह्मणाले—कसें ह्मणजे ? चालत जावयाचें. पुन्हां मी ह्मणालों—माझे हातून इतकें चालणें होणार नाहीं; व मी पायीं येत नाहीं; जेव्हां मी पायीं जात नाहीं असें झालें; तेव्हां डॉक्टरसाहेब यांचेकडे, जेलर यांनीं चिट्ठी पाठविली. त्यांचे कडून तावडतोब उत्तर आलें कीं, आरोपी चालणेंस लायख नाहीं; सबब टांग्यांतून न्यावें. अशा अर्थाचें उत्तर असावें. असें पुढील व्यवस्थेवरून अनुमान होतें. असो. वरीलप्रमाणें मी चालला व स्वस्थ बसलों. थोड्यांच वेळांत मदरहू पोलिस ह्मणाले चला:

तुह्मांला जाणेंकरितां टांगा तयार आहे. हे शब्द ऐकतांच त्या पोलिसाबरोबर मी दरवाज्याबाहेर गेलों; व टांग्याजवळ उभा राहिलों. तेथें, माझें हातांत बेडी घातली व दंडास काढणी बांधली व ते—टांग्यांत बसा—असें ह्मणतांच टांग्यांत बसलों. माझे जवळ जमादार व एक पोलिस असे दोघे मला धरून बसले होते. टांग्याचे पुढें व मागें दोन दोन पोलिस, उत्तरेच्या बाजून दोन व दक्षिणेच्या बाजून दोन पोलिस; एक बिगुलवाला व काडतुसाची एक पेटी वगैरे सामानासह हत्यारबंद पोलिस सुमारें १२।१३ अलिबागेहून आह्मांला पेणेस नेणेकरितां, माझे बरोबर निघाले; अशा हत्यारबंद पहाऱ्यांतून अलिबाग गांवांतून एकदां गेलों; जातां जातां अदमासें दोन वाजणेचे सुमारास पोयनाड येथें जाऊन पोंचलों. पोयनाडहूनही कांहीं पोलिसांची कुमक बरोबर घेऊन पुन्हां जे निघालों तों धरमतर बंदरास जाऊन पोंचलों. तेथें गेल्यावर आमचे बरोबर हा फौजफांटा पाहून व मी मात्र त्यांत एकटा बिनहत्यारी व बिनड्रेस्चा पाहून त्या बंदरावरील लोकांची खूप गडबड उडून गेली होती. आह्मी अलतडीहून पलतडीं गेल्यावर तेथें पुन्हां गाडींत बसलों, व लवाजम्यासह सायंकाळचे सुमारास पेणनजीक जाऊन पोंचलों.

पेण गांवातून कचेरींत जाई तोंपर्यंत सर्व गांवांत मी आल्याची बातमी लागली. कारण, मी कचेरींत जाइपर्यंत गाडीमागें शेंकडों लोक जमले होते. दिवे लावण्याचे सुमारास मी कचेरींत जाऊन पोंचलों; तेथें गेल्यावर थोड्याच वेळांत मला रीतीप्रमाणें कोठडींत बंद करण्यांत आलें.

सकाळीं सुमारें ७।८ वाजणेचे आंत शौच, मुखमार्जन, स्नान वगैरे सर्व आटोपलें. यावेळीं वास्तविक पहातां, मी ( अंडरट्रायल ) मध्यें आहें. मला पोलिसकडून त्रास बिलकूल झाला नाहीं. कारण, शौचास गेलों तरी हत्यारबंद पहारा, मुखमार्जनास, लघवीस, स्नानास, भोजनास, वगैरे जरा बाहेर जाणें असलें कीं, हत्यारबंद पहारा बरोबर आहेच; आतां माझी गोष्ट कांहीं निराळी होती; ह्मणून मला विशेष त्रास झाला

नाहीं. दुसरें, अन्य जातीचे लोकांस हे पोलिस फार त्रास देतात. मलाही कदाचित् उर्मट स्वभावाच्या पोलिसांनीं त्रास दिला असता, परंतु, त्रास न होण्याचें मुख्य कारण ह्मटलें ह्मणजे आमचेवर जे मुख्य पोलिस अधिकारी होते ते होत. त्यांचें नांव दिनदयाळ जमांदार; खरोखर हे नांवाप्रमाणें दीनांवर दया करणारेच होते; यांत बिलकूल संशय नाहीं. हे स्वभावानें फारच चांगले होते. हे पेन्शनर असून हेड्का- टेरचे जमादार आहेत. हे ब्रह्मदेशचे लढाईंत होते. असो.

दहा वाजण्याचा सुमार जेव्हां आला; तेव्हां आह्मी आपले पहाऱ्या- सह खानावळींत गेलों; भोजन झाल्यावर पोलिसी पहाऱ्यानिशीं परत जों येतों तों पोलिसकचेरींत इतकी गडबड उडून गेली होती कीं, ती गडबड पाहूनच मी दुःखांत व विचारांत असतां मला हंसें आलें; कारण, कोणी पोलिस आपले कपडे साफ करीत आहेत, कोणी हत्यारें, कोणी बंदुका, ज्यांना बंदुक हातीं धरतां सुद्धां येत नव्हती अशांना बंदुका, अशा धराव्यात, तशा धराव्यात असें सांगत आहेत, बिगुलवाला आपलें बिगुल साफ करीत आहे, कोणी काडतु- सच्या पेट्या बाहेर आणून ठेवीत आहेत, याप्रमाणें हत्यारी पोलि- सांची एकच गडबड उडून गेली होती. दुसरे बाजूस बिनहत्यारी पोलिसांचीही तशीच धांदल चालली होती. जेव्हां साडेदहा होऊन गेले तेव्हां मी ज्या कोठडींत होतों त्या कोठडीसमोर अदमासें ७०।७५ हत्यारबंद पोलिस सारखे रांकेनें उभे होते; व त्यांच्यावरील अधि- कारी त्यांची सर्व तयारी करून दिलेली बरोबर आहे किंवा नाहीं हें पहात होतें. प्रत्येक हत्यारबद पोलिसाजवळ काडतुसचें एक बडल व तीन सुट्टी काडतुसें ह्याप्रमाणें दिलीं होतीं. सदरहूप्रमाणें बिनहत्यारी पोलिसांचीही जय्यत तयारी होती. ह्यांची संख्या सुमारें ४०-५० पर्यंत होती. ह्या बिनहत्यारी पोलिसांचे जवळ लांक- डाचे दंडे असण्याचे ऐवजीं, ह्यांना लांब लांब तलवारी देण्यांत आल्या

होत्या. असा हा सर्व देखावा पाहून दुःख एकीकडे राहून हसूं आलें ह्यांत कांहीं नवल नाहीं. हा चालविलेला बेबंदशाही थाट पाहून तरी आरोपी भिऊन जाईल असें सरकारास वाटलें असेल; परंतु, " जेथें कर नाहीं, तेथें डर कसली " ह्या ह्मणीप्रमाणें, आह्मी कोणत्याही प्रकारें सरकारचा जर गुन्हाच केला नाहीं, तर असल्या बुजावणीला आह्मी थोडेच भिणार आहोंत.. असो.

सदरहु जमलेला फौजफांटा आह्मांला मॅजिस्ट्रेटपुढें नेऊन उभे करण्याकरितां उत्सुक झाला आहे असा दिसला;. व जमादारसाहेब आपल्याबरोबर चार हत्यारबंद पोलिस घेऊन आमच्या कोठडीजवळ आले व त्यांनीं आमचेवर पहारा करीत असलेल्या पोलिसांकडून आह्मांला बाहेर काढिलें आणि ते त्या जमलेल्या फौजफांट्यांत घेऊन गेले.. माझ्यापुढें एक लहानशी पोलिसांची तुकडी, मध्यें मी व माझेजवळ जमादार आणि मागें बाकीचा सर्व हत्यारी व बिनहत्यारी फौजफांटा. ह्याप्रमाणें जय्यत तयारी झाल्यावर एकदम कुइक मार्च करण्यांत आला.

ज्यावेळेस आमचे कोठडीजवळ जमादार आले, त्यावेळेस मीं त्यांना विचारलें कीं, हीं सर्व तयारी करून मला कोठें नेणार ? तेव्हां ते ह्मणाले— तुह्मांला ज्या ठिकाणीं साहेबांचा तंबू आहे, त्या बागेंत नेणार. तेव्हां मी ह्मणालों—बाग जर दूर असेल तर माझ्यानें चालवणार नाहीं. तेव्हां जमादार ह्मणाले— बाग जवळ आहे; फार दूर नाहीं.. असें ऐकतांच वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें आह्मी निघालों.

वरीलप्रमाणें, आमचा फौजफांट्यानिशीं गांवांतून कुच करीत असलेला थाट, अवलोकन करण्याकरितां सर्व नगरवासी लोक आपापल्या घरांतील उंच भागावर जाऊन उभे राहिले होते.. तसेंच हजारों लोकांच्या झुंडींच्या झुंडी मागाहून येतच होत्या. अशा तऱ्हेचा आमचा तो थाट १२ वाजण्याच्या सुमारास बागेंत जाऊन पोंचला. तेथें गेल्यावर बारा हत्यारबंद पोलिसांनिशीं आह्मांला आफिस-

च्या तंबूजवळ नेण्यांत आलें व त्याठिकाणीं आमचेवर एका पहारेवाल्याखेरीज बाकीच्यांच्या बंदुका एकांत एक अडकवून उभ्या केल्या होत्या. आमच्या संरक्षणार्थ असलेल्या पोलिसांशिवाय बाकीचा सर्व फौजफांटा साहेबांच्या तंबूचे सभोंवार गराडा देऊन उभा करण्यांत आला होता. ह्या हत्यारबंद पोलिसांचे सभोंवार बिनहत्यारी पोलिसांचा गराडा देण्यांत आला होता. अशा ह्या दुहेरी गराड्यांचें पहाऱ्यांत जो तंबू होता त्यांत मॅजिस्ट्रेट ( गोरा ), पो. सु. (गोरा ), पो. इ. (ख्रिश्चियन ) वगैरे लोक होते. मधून मधून बिगुलवाला मोठ्या ऐटीनें इकडून तिकडे व तिकडून इकडे फिरत होता. अशा या हत्यारबंद पोलिसांचे पहाऱ्यांत खटल्याचा निकाल, अथवा विलक्षण न्यायाची पद्धत पाहून कोणाला आश्चर्य वाटणार नाहीं !

असो. इकडे आफिसचे तंबूपासून उत्तरेचे बाजूस थोडे अंतरावर एक मोठी बैठक घातलेली दृष्टीस पडत होती व बागेंत येण्याचे रस्त्यावर चहा, कॉफी व फराळाचीं दुकानें, कलंगड्याच्या गाड्या ह्यांची गर्दी उडून गेली होती व आसपासचे कड्यांवरून कातकरी, वारली ठाकूर, महार वगैरे लोकांच्या झुंडींच्या झुंडी बसल्या होत्या. अदमासें १५।२० हजार लोकांचा जमाव झाला होता. ह्याप्रमाणें सभोंवार जमलेला देखावा मी पहात आहें तोंच वर निर्दिष्ट केलेल्या बैठकीवर शेंकडों लोक येऊन बसत होते व कांहींजण इकडून तिकडे हिंडत होते. इतक्यांत त्या सर्व लोकांनीं उभे राहून टाळ्यांचा गजर केला व ते खालीं बसले. गजर कां झाला व लोक खालीं कां बसले ? हें आह्मी बारकाईनें पहात असतां त्या समाजामध्यें नामदार टिळक हें दृष्टीस पडले ह्मणून टाळ्यांचा गजर झाला असें आमचें लक्ष्यांत आलें.

इतक्यांत साहेबाचा पट्टेवाला आला व तो, माझेवर पहारा करीत असलेल्या पोलिसला ह्मणाला—आरोपीला घेऊन चला. त्याबरोबर पोलिस आह्मांला घेऊन तंबूकडे चालले. समोरील पोलिसच्या गराड्याजवळ जाऊन पोचलों,

तों तेथें प्रो० साठे ह्यांची गांठ पडली व तेथून पुढें ते व आह्मी असे दोघे मिळून पुढें चाललों. जातांना आह्मांला जे दोन पोलिसांचे गराडे लागले; ते मोठ्या बंदोबस्तानें व सारख्या अंतरानें उभे होते. तेथून आह्मी निघालों तों तंबूंत साहेबासमोर उभे राहिलों व थोड्याच वेळांत खटला सुरू झाला. त्यावेळीं तंबूंत आमचे डावे बाजूस पी. पी. खरे, हायकोर्ट प्लीडर, नामदार टिळक, प्रो. परांजपे, रावसाहेब ना. बा. कानिटकर व आप्पासाहेब वैद्य वगैरे पुण्याहून आलेली बरीच मंडळी बसली होती; शिवाय अलिबाग जिल्ह्यांतिलही बरीच मंडळी होती. आणि आमचे उजवे बाजूस पोलिस इ०, फौजदार,—अलिबागचे 'हिरा कोटांत' तुमचे तर्फेचे आह्मी वकील—ह्मणून सांगितलेले जे, ते एक पार्शी व समोर मॅजिस्ट्रेट गोरा व त्यांचे जवळ पो. सु. गोरा; शिवाय कांहीं लोक तंबूंत होते.

ज्या वेळेस आह्मी तंबूंत शिरलों, त्या वेळेस अंत व बाहेर एकदम गडबड उडाली; व आह्मांला तंबूंत उभे रहाण्यास सुद्धां मोठी अडचण पडली व तंबूच्या काढण्या तुटण्याचीही वेळ आली होती. पो. सु. नीं पो. इ. ला लोकांची गर्दी कमी करण्यास हुकूम फर्माविला होता; परंतु, पुढें पाय टाकण्यास जागा नव्हती; तेव्हां पो. इ. काय करणार याप्रमाणें गडबड चालली असतां, प्रो० साठे यांच्या वकीलानें, साठ्यांचा व आपल्यांचा खटला निरनिराळा चालवावा अशी साहेबास विनंति केली; व ती साहेबांनीं मान्य केली आणि ताबडतोब आह्मांला बाहेर घेऊन जाण्याबद्दल पोलिसला हुकूम केला. त्याप्रमाणें आमचेवर पहारा करीत असलेल्या पोलिसांनीं आह्मांला बाहेर नेलें. आह्मांला तंबूचे बाहेर पहातांच सभोंवार असलेले लोक एकदम उभे राहिले. त्या गर्दींतून आफ़िसच्या तंबूकडे आह्मांला घेऊन गेले. पूर्वी जे दोन पोलिसचे गराडे आह्मीं पाहिले होते, त्यांचा जातांना त्या गर्दींत कांहीं पत्ता सुद्धां लागला नाहीं. ह्याप्रमाणें त्या गर्दींतून निघून ऑफिसचे तंबूजवळ जाऊन पोंचलों. जेव्हां आह्मी साहेबासमोर उभे राहिलों, तेव्हां हातांतील बेडी काढण्यांत

आली होती. आणि जेव्हां पोलिस मला बाहेर घेऊन चालले तेव्हां पुन्हां हातांत बेडी घालूं लागले; तों पो० सु० साहेबांनीं पो० इ० ला असा हुकूम केला कीं, खटल्याचा अखेर निकाल होई तोंपर्यंत आपटे यांचे हातांत बेडी घालूं नये. सदर्हु हुकूम ताबडतोब अमलांत आला; ह्मणजे पुढें सगळा खटला संपेपर्यंत पोलिसांनीं आमचे हातांत बेडी घातली नाहीं. आह्मीं आफिसचे तंबूजवळ बसून विचार करीत होतों कीं, आतां प्रो० साठे यांचा खटला चालला आहे. त्याचा निकाल केव्हां होईल व आपला खटला केव्हां चालेल वगैरे तऱ्हतऱ्हेच्या विचारांनीं मन गढून गेलें होतें.

इतक्यांत एकदम टाळ्यांचा आवाज असा झाला कीं, जसे काय बंदु-कीचे बार सुटत आहेत. अशा तऱ्हेचा तो टाळ्यांचा आवाज एकदम कानीं पडतांच आह्मी साहेबाचे तंबूकडे पहात राहिलों तों एकाएकीं जसा पाण्याचा लोंढा येतो त्याप्रमाणें तंबूकडून आफिसचे तंबूकडे सर्व लोकांचा समाज येत होता. त्या समाजांत सगळ्यांचे पुढें प्रो० साठे, पी. पी. खरे, प्रो० परांजपे व ना० टिळक वगैरे मोठे लोक होते. त्या सर्वांच्या चेहऱ्यांवरून प्रो० साठे हे दोषमुक्त झाले असावेत असें वाटलें. तो समाज माझे जवळून आफिसचे तंबूजवळ असलेल्या पूर्वींच्या बैठ-कीवर गेला. जेव्हां हा समाज माझे जवळून गेला, तेव्हां त्या समाजां-तील लोकांचे शब्द माझे कानीं पडले; ते असे:—साठे तर दोषमुक्त झालेच; आतां फक्त आपटे ह्यांच्या खटल्याचा निकाल राहिला आहे. असे शब्द ऐकताच मला आनंद झाला कीं, साठे तर सुटले; आतां आपलें काय होईल तें होईल!

असो. सदरहु बैठकीवर कोणाचें तरी व्याख्यान चाललें असावें असें मला वाटलें. कारण; त्या बैठकीसभोंवतीं हजारों लोक उभे होते व इतक्या ह्या जमलेल्या समाजांतून एकाच मनुष्याच्या तोंडचे शब्द मधून मधून ऐकूं येत होते. ह्याप्रमाणें इकडे ही चाललेली

गडबड मी पहात होतों. इतक्यांत साहेबांचे पट्टेवाल्यानें आरोपीला पुकारल्यावरून पोलिसांनीं आह्मांला साहेबापुढें उभे केलें. आमचेतर्फेचे वकील हजर नसल्यामुळें ता० १३।१।१७ नेमण्यांत आली व आह्मी परत गांवांत जातांना मागें वर्णन केलेल्या थाटाप्रमाणें फौजफांट्यासह तालुका कचेरींत जाऊन पोंचलों; तेथें गेल्यावर तेथील पहारेवाल्यानें मला आपलें ताब्यांत घेतलें व कोठडींत बंद केलें.

असो. आतां वाचकांना थोडीशी इतर माहिती देतों:—पेण गांव हें तालुक्याचें ठिकाण आहे. हें गांव ह्मणण्यासारखें मोठें नाहीं; साधारण गांव आहे. अशा ठिकाणीं फार झालें तर, हत्यारी पोलिस १२ व बिन हत्यारी २५–३० इतकेच बहुतकरून पहिले पोलिस असावेत. यावेळीं पहातां सर्व गांवभर पोलिसच पोलिस!!! कारण, येवढ्याशा गांवांत हत्यारबंद पोलिस ७०–७५ व बिनहत्यारबंद ४०–५० मग काय विचारता? १००–१२५ पोलिस पार्टी गांवांतून फिरत असल्यामुळें बिचारे गरीब दुबळे जे कातकरी, वारली, ठाकूर व महार वगैरे अन्य जातींची मोठी धांदल उडून गेली होती. हे गरीब लोक असें ह्मणत कीं, पुन्याचा बामन हकड आला. आन् त्यो धर्मान् चला, धरम सोडूं नका, दारू पिऊं नका, चोरी करूं नका, सम्द एक होऊन देवाची भक्ति करा; असं चांगलं चांगलं सांगत असतां सरकारन त्याला पकडून काय जुलूम चालविलाय बगा!!! त्यो बिचारा बगीतला तर २०–२२ वर्षांचा ज्वान् मला दिसल्यायो; आन् त्याच्या माग, इच्या भन बंदुका घे घेऊन शिपाई लागल्याती. अन् शांच्या माग ह्यो तरास; मग आमच काय इच्यारता आमी बोलून चालून रानवट गडी. इच्या भन् २।३ दिस झाला गांवांत जरा गेलं ना गेल कीं, शिपुरड कस वसदिशीं अंगावर येतया. इच्या भन् जणू काय कुत्रच! उगाच्या उगाच धक्के देत्यातीं, आन् ह्मत्यात्—हत्त कशापाई आला हैस? तू कोन् गांवचा? चल फौजदार कचेरींत: तुझ नांव, गांव, धंदा

लिहून घ्यायच आहे. आनू जरा कां तंमाकूला थोक पैसा दिला मग काय इच्यारतां पुन्ना भेट होईपर्यंत खूष. अशा रीतीनें गरिबांची दैना होत होती; कारण, ता० १२ ला संक्रांत होती. शिवाय आमच्या खटल्याची तारीखही दुसरेच दिवशीं होती, सबब गांवांत लोकांची गर्दी उडून गेल्यामुळें पोलिसांची चैन उडाली होती. आह्मांला तर हत्यार-बंद पोलिसांनीं, आपल्या त्या बंदुकांनीं, लकलकीत बागनेटांनीं, काड-तुसांनीं, बिगुल, हट, हुट वगैरे सर्व आयुधांनीं, भिंवविण्याचा प्रयत्नच केला असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. अशी एक प्रकारची ह्मण आहे कीं, "शहाण्यास शब्दाचा मार" व "कोडग्यास सोट्याचा मार." ह्याप्रमाणें, शहाणा असेल तोंपर्यंत बोलण्यांत मजा! जर शहापणच सोडलें तर मग काय उपयोग? मग "जशास तसें" ह्या ह्मणीप्रमाणेंच चाललें पाहिजे असो. या पोलिसाच्या नादाला आपण जर लागलों तर आह्मांला आज जगापुढें जें आणावयाचें आहे तें तसेंच राहील. तर तसें न करितां न्यायी ह्मणविणाऱ्या राज्यांत न्याय होतो किंवा अन्याय होतो हें आपण जगापुढें ह्या पुस्तकरूपानें ठेवूं. आह्मी न्यायी आहोंत असें आपणच आपल्याला ह्मणवून घेणें ह्मणजे, आपले तोंडाभोंवतीं आपणच दिवा ओंवाळून घेण्यासारखें आहे. आपण करी आपुली स्तुति ॥ तो एक मूर्ख ॥ असें मूर्खलक्षणांत सांगि-तलें आहे. तर आपलें वर्णन, आपली स्तुति जगानें केली पाहिजे तेव्हांच तें खरें. असो.

आपण आतां आपल्या मुख्य कामाकडे वळूं. ता. १२।१।१७ रोजीं संक्रांत असल्यामुळें ता० १०।१।१७ रोजीं आमचे खटल्याची तारीख नेमली गेली होती. त्याप्रमाणें, ता० १३ रोजीं मागें वर्णन केल्याप्रमाणें जय्यत हत्यारबंद फौजफांटा आह्मांला नेण्याचे पूर्वींच तंबूकडे रवाना कर-ण्यांत आला होता. आह्मांला नेण्याची [illegible] झाल्याबरोबर जमादार साहेब कोठडीजवळ आले व आह्मांला त्यांनीं आपले ताब्यांत घेतलें. जमादार ह्मणाले—

आपटे महाराज, चलो आपकू साहेबके तंबूपर जाना है. तेव्हां मी ह्मणालों— इतकें लांब चालत येऊं शकत नाहीं. जमादार यांनीं टांगा आणविला; नंतर त्या टांग्यांत मी व जमादार बसलों; चोहोंबाजूस हत्यारबंद पोलिस होतेच. अशा थाटानें बागेंत पोंचल्यावर थोड्या वेळानें आमचे तर्फेचे वकील आल्यावर खटला सुरू झाला.

## सुधाकरपत्रांतील उतारा.

शनिवार, ता० १६ माहे जानेवारी १८९७.

पेण येथें ता० १३ मिनहू रोजीं मि. ब्रूक असिस्टंट कलेक्टर फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेट यांचे समोर आरोपित गोविंद विनायक आपटे यांच्या वरील खटल्यास सुरवात झाली. प्रॉसिक्यूशनतर्फे मि० जमशेटजी अलिबाग येथील वकील हे असून आरोपीतर्फे मि० शिवराम विठ्ठल भांडारकर हायकोर्टप्लीडकर, मि० घारपुरे पनवेल येथील व पेण येथील मि० बर्वे वकील हे हजर होते. सदर दिवशीं फिर्यादीतर्फे ची० कॉ. पनवेल यांच्या सुद्धां ९ साक्षिदारांच्या जबान्या होऊन त्यांपैकीं दोघांची उलट तपासणी झाली व बाकीच्या साक्षींच्या उलट तपासण्या दुसरे दिवशीं झाल्या. जबान्यांचा सारांश अलाहिदा दिलाच आहे. पोलिसांच्या साक्षीशिवाय बाकीच्या साक्षीवरून कायदेशीर रीतीनें आरोपाची शाबीदी दिसत नाहीं. प्रॉसिक्यूशनतर्फे आणखी पुरावा देण्याविषयीं परवानगी मागण्यांत आली. त्यांपैकीं दोन साक्षीदार मे० कलेक्टर साहेब यांचे चिटणीस व पनवेल येथील पोष्टमास्तर हे पूर्वीं करण्यांत आलेल्या ११००० सह्यांच्या अर्जासंबंधीं ह्मणजे रीतीप्रमाणें शाबिदी करण्यापुरते, असून दुसरे दोन साक्षीदार बोर्ले येथील सभेंत घडलेल्या हकीकतीबद्दल व्हावयाचे आहेत. ते महत्त्वाचे आहेत.—सदरहु साक्षीदार आयत्या वेळेस हजर करूं; त्यांचीं नांवें दिल्यास त्यांस फितविण्यांत येईल— अशी प्रासिक्यूशनतर्फे विनंति करण्यांत आली. आणखी पुरावा देण्यास रावड देण्यांत येऊं नये; कारण,

आरोपी आज पुष्कळ दिवस कैदेंत असून प्रॉसिक्यूशनतर्फे जो जो पुरावा यावयाचा तो तो आणण्यास पाहिजे तेवढा वेळ मिळालेला होता. नवीन पुरावा देण्यास सवड मिळाल्यानें आरोपीचें अनेक कारणानें नुकसान होतें; निदान जे साक्षीदार द्यावयाचे त्यांचीं नांवें मोहोरबंद लखोट्यांत बंद करून कोर्टाचे ताब्यांत देण्यांत यावींत वगैरे बाबतींत बरीच तक्रार आरोपीतर्फे करण्यांत आली. मि. ब्रूक् साहेब यांणीं नवीन पुरावा देण्यास सवड दिली; नांवें मात्र मोहोरबंद करून ठेवण्यास हरकत नाहीं असें ठरविलें; परंतु, साक्षीदारांची नांवें माहीत नसणारे पनवेलचे चौ० कॉ० हे त्यावेळीं तेथें असल्यामुळें तेंही शेवटीं घडून आलें नाहीं. पुढील ता० २२ मिनहू शुक्रवार रोजची, नेरळनजीक कोल्हार येथें नेमण्यांत आली.

ता० १४।१।९७ रोजीं जें काम झालें, त्यांत विशेष महत्त्वाची गोष्ट झटली ह्मणजे प्रॉसिक्यूशनतर्फेचे वकील जमशेटजी यांनीं प्रॉसिक्यूशनतर्फेचा साक्षीदार विठ्या राघनाक महार यानें आपल्या उलट तपासणींत—पोलिसानें आपणांस गैरशिस्तरीतीनें वागविलें व आपण पोलिसापुढील जबानी दहशतीमुळें दिली—वगैरे जो मजकूर सांगितला तो खोटा सांगितला असें सिद्ध करण्याकरितां स्वतः साक्षीचे पिंजऱ्यांत उभे राहून आपण होऊन दिलेली जबानी, ही होय. त्याचे जबानीचा मतलब असा होता कीं, सदर साक्षीदार आदले दिवशीं आपले बिऱ्हाडीं येऊन चार लोकांसमक्ष त्याणें आपणांजवळ पूर्वीची ओळख नसतां दोन वेळां दारू मागितली व—फिर्याद खरी आहे; आपण मला क्षमा करा—असें सांगितलें. वकीलमजकूर यांची वर लिहिलेल्या मतलबाची जबानी झाल्यावर मि० भांडारकर यांणीं त्याची बरीच उलट तपासणी केली व शिवाय मि० जमशेटजी यांणीं आरोपीतर्फे वकीलपत्र व माहिती घेऊन मागाहून फिर्यादीतर्फेचें ते काम चालवीत आहेत; हें त्यांचें करणें धंद्याच्या पद्धतीस विरुद्ध आहे, असें दाखविण्याकरितांही सवाल

विचारले; ते सवाल माजिस्ट्रेट यांणीं नाकबूल केले व योग्य वाटेल तर या बाबतींत मि० जमशेटजी यांच्या वर्तणुकीबद्दल हायकोर्टाकडेस दाद मागण्याचा मार्ग मोकळा आहे असें सांगितलें.

**मी असें ह्मणतो कीं**—माजिस्ट्रेट यांनीं बेकायदेशीर काम चालवावें व आमचे तर्फेचे वकीलानीं योग्य तक्रार केली असतां, त्यांस हायकोर्टाचा मार्ग मोकळा आहे असें सांगावें; ह्मणजे माजिस्ट्रेट यांनीं आपल्या मर्जीप्रमाणें वाटेल तें करावें असें कायद्यांत आहे किंवा काय ? माजिस्ट्रेट यांनीं मर्जीस वाटेल तसें करावें असें जर कायद्यांत असेल, तर मग येवढालीं कायद्याचीं बुकें पाठ करून व पुन्हां तीं बुकें हातांत घेऊन सरकारांनीं न्यायकायद्यांतील केलेल्या कलमांप्रमाणें वाद करण्यास वकील कोर्टांत तयार असतात. असो. जर मि० जमशेटजी यांनीं माझेतर्फे वकीलपत्र घेऊन शिवाय माझी जेलमध्यें भेट घेऊन सर्व हकीकत विचारून घेतली तर त्या वकिलांनीं मला जेलमध्येंही असें सांगितलें होतें कीं, मी तुमचेतर्फेचा वकील आहें तरी माझेवर विश्वास ठेवून खरी हकीकत सर्व सांगा. मीं खरी सर्व हकीकत जरी त्यांस सांगितली; तरी मी कोणतेही प्रकारें सरकारचा गुन्हेगार नाहीं हें मी पक्कें समजून होतों. असो. आतां असा विचार करूं कीं, सरकार जर खून, चोरी, दरोडा, मारामारी, दगलबाजी, विश्वासघात व आत्महत्या इत्यादि कृत्यें करणारास गुन्हेगार समजतें; तर सदरहु मि० जमशेटजी वकील यांनीं धडधडीत आह्मांला विश्वास दाखवून, पुन्हां फसविलें, तर विश्वासघाताचा आरोप सदरहु वकीलावर सहज लागुं होतो. असें असतां न्याय करण्याकरितां सरकारांनीं नेमलेल्या माजिस्ट्रेटनीं अशा अविश्वासु वकीलासंबंधीं हायकोर्टाचा मार्ग मोकळा आहे वगैरे सांगणें, ह्मणजे आपण वाटेल तसा अन्याय करणें होय. सारांश, आमचे वरील खटल्यासंबंधीं हितून तिथून सर्व अन्यायच तर न्यायदेवता तरी येणार कोठून ? असो.

## जबान्यांचा सारांश.

नंबर १ फिर्यादी विश्राम बाजी सांवत चीफ० कॉ० पनवेल, उमरवर्षे ४३।४४, जात मराठा, ता. १८।१२।९६ रोजीं बोर्ले येथें २।१ वाजतां सभा भरली होती, त्यांत आरोपीचें लेक्चर झालें. त्याचा रिपोर्ट हे. कॉ. नें दिला, तो हल्लीं मजजवळ नाहीं; पो. सु. कडे पाठविला आहे. आपल्यानें पाठविलेल्या अर्जांत ८ दिवसांत उत्तर मागितलें होतें. आपल्यानें लोकांस—जंगलांत जा, जंगल तोडा व ताडाची लागवड करा—ह्मणून सांगितलें. जर एखादा पोलिस आड आला तर त्यास टोणपा व घालवा, लोक सरकारच्याविरुद्ध उठले आहेत असें तपासांत कळलें. त्यांचा झाडा घेतला त्यांत मला १ डायरी व २।३ नांवें लिहिलेला एक कागद व त्यावर ' स्वतंत्र रहा ' अशीं अक्षरें सांपडलीं, ती डायरी कोर्टांत आहे, तीच आहे. सरकारकडे पाठविलेला अर्ज मजजवळ नाहीं.

( उलट तपासणी )— मी सभेच्या ठिकाणीं नव्हतों. रिपोर्ट कधीं मिळाला तें आठवत नाहीं. २०।२२ दिवसांपूर्वी तो दिला. मीं तो वाचला आहे, तारिख आठवत नाहीं. दौलती बाळा सांवत याचे सहीचा आहे. मी डायरी ठेवतों. पण असल्या गुप्त कामाची नाहीं. आफिसाशिवाय कोणच्या हातांत डायरी जात नाहीं. ही हकीकत डायरींत लिहिली नाहीं; कारण, इतरांस ती समजूं नये ह्मणून. गुप्त गोष्टींत मी खालच्या नोकरांवर विश्वास ठेवीत नाहीं. डायरी मी लिहितों; त्या लोकांनीं गुप्त गोष्ट फोडल्यास शिक्षा होईल. परंतु, माझा त्यांच्यावर असल्या गोष्टींत पक्का भरंवसा नाहीं. बाकी सर्व गोष्टी डायरींत लिहितों. सरकारच्या विरुद्ध मी डायरींत लिहीत नाहीं. नंतर मी याचा रिपोर्ट पो. सु. कडे पाठविला तो बार केला नाहीं; गुप्त रहावा ह्मणून. असा बार न करण्याबद्दल सरकारचा हुकूम नाहीं. सु. साहेबांनीं समक्ष सांगितलें आहे. पो. सु. सांगेल तोच मी कायदा समजतों. पोलिसगाईड मजजवळ आहे. त्यांत असा कायदा असल्याचें ठाऊक नाहीं. मी ५–६ वर्षे

चौ० कॉ० आहें. मी पायरी पायरीनें फौजदार बनलों. ५–४ वर्षांपूर्वी मीं पोलिसगाईड समजावून घेतलें. तें इंग्रजींत आहे.

डिपार्टमेंटल रूल मला ठाऊक आहेत. फावल्या वेळांत ह्या खटल्याची चौकशी मी करीत असें, पुन्हां तो रिपोर्ट पाहिला नाहीं. अवश्यकता वाटली नाहीं. त्याच्या नोट्स् घेतल्या नाहींत. तो ६ दिवसांनीं पो० सु० कडे पाठविला. त्याच्याच खालीं माझा अभिप्राय आहे. मागाहून चौकशीचा रिपोर्ट पाठविला नाहीं. १०।१२ ताड चिंध्रणचे नजीकचे चोखळलेले आहेत व लोक जंगलांत गेले एवढ्याबरच ते सरकाराविरुद्ध उठले असें मी ह्मणतों. सावळें येथील पाटलाच्या रिपोर्टांत ५।६ ताड लिहिले आहेत. पण ते ९।१० आहेत. मीं स्वतः पाहिलें नाहीं. त्यानेंच सांगितलें. चोखळणें ह्मणजे कापणें व ठोकणें. त्यांत गाडगी लावणें येत नाहीं. मीं याचा रिपोर्ट पो. सु. कडे केला नाहीं. आरोपीस केव्हां पकडला व कोठें तें आठवत नाहीं. चिखल्याचे आसपास असावा! १०।११ दिवस झाले, सकाळीं पकडला. त्याला वारंट दाखविलें व पनवेलीला आणून माजि० चे ताब्यांत दिला. त्याचा झाडा पनवेलीस संध्याकाळीं घेतला. आणल्यावर अर्ध्या तासानें घेतला. डायरी व कागद त्यांत सांपडले; त्याचा पंचनामा आहे. पो. सु. कडे पाठविले नाहींत. पोलिसचे ताब्यांत होते.

( **फेर तपासणी** )—मीं असले गुप्त रिपोर्ट ६ वर्षांत केले नाहींत. पो. सु. कडील रिपोर्ट मीं आतां मागितला तरी मिळणार नाहीं. गाडगे लावण्याचे आधींचे कृतीस चोखळणें ह्मणतात.

२ **तुकाराम दादा**—उमर २०।२२, जात वैश्यवाणी. धंदा चिकी गुडदाणी विकण्याचा, राहणार पनवेल, प्रतिज्ञेवर सांगतों. मी सभेला गेलों होतों. २५ दिवस झाले. दोन अडीच हजार लोक होते. एक मनुष्य बोलत होता. नापीकामुळें सरकारास अर्ज करा, दारू पिऊं नका, एकी करा, आपण सरकारांत पाठविलेल्या अर्जाची पावती आहे, पण उत्तर नाहीं. सबब

तुह्मी जंगलांत जा, तोडा व ताडाची लागवड करा. शिपाई आड आल्यास त्याची विनवणी करा, पानतंबाकु द्या, व न ऐकेल तर काठ्यांनीं टोण द्या. नंतर मी गेलों. याशिवाय मला कांहीं ठाऊक नाहीं. त्याला ओळखणार नाहीं. तो दहा पावलांवर होता. नांव ठाऊक नाहीं.

( उलट तपासणी )–माझ्या मालकीचे ताड नाहींत व कोणतीही इस्टेट नाहीं. सभा शुक्रवारीं भरलेली होती. मी पहिल्यापासून नव्हतों. उगाच तेथें गेलों. पनवेलहून आठ वाजतां निघालों. वीस अंकपर्यंत उभा होतों. नंतर एक तास बसलों. मजपुढें पुष्कळ लोक होते. ओळखीचें कोणी नव्हतें. मी चिकी गुडदाणी विकावयाला गेलों. शेवटपर्यंत नव्हतों. सभेंत अर्ज वाचला नाहीं. साहेब यावयाचा ह्मणून लोक गेले. बोलणाऱ्याभोंवतीं लोक होते. माझा जन्म पनवेलींत गेला आहे. दुसरा चहावाला तेथें आला होता कीं नाहीं माहीत नाहीं. मजवर लायसन्स ट्यॉक्स् नाहीं. तेथें एकही पोलिस आढळला नाहीं.

**३ अंताजी मोरेश्वर टिळक**–उमर ४०, जात ब्राह्मण तलाठी, प्रतिज्ञेवर सांगतोः— मीं आरोपीला बोलल्याचे सभेंत पाहिलें. २५ दिवसांपूर्वी सभा झाली. ३।४ हजार लोक होते. मी सभेला नव्हतों त्यामुळें आरोपीचें बोलणें माहित नाहीं. मी साडेतीन वाजतां गेलों. त्यावेळीं सभा नव्हती. मीं चौकशी करून रिपोर्ट लिहिला व ता० १९। १२।१६ ला पाठविला. त्यांत माहिती मिळवून लिहिली. मी आपल्या कानांनीं ऐकिली नाहीं.

( उलट तपासणी )—आपटे यांच्या भाषणाचे वेळीं मी हजर नव्हतों. सभा झाल्यावर गेलों. साठ्यांच्या कामांत माझी जबानी झाली आहे. पनवेल तालुक्यांत मालकीचे ताड आहेत. गाडगे लावून ताडी काढण्याशिवाय इतर कामास परवानगी लागत नाहीं.

(फेर तपासणी)–रस काढण्याचे पूर्वीच्या कृति मला माहीत नाहींत.

**४ सूर्याजी मल्हार सावंत**—मी प्रतिज्ञेवर सांगतों. उमर ४०,

जात मराठा, धंदा पोलिस. पट्टा नंबर ३५२, राहणार पनवेल मी आरोपीला ओळखतों. मीं त्याला बोरल्याचें सभेंत पाहिलें. ता० २८ पुन्हां सांगतों. ता० १८ दिजेंबर रोजीं मी नाइकासह सभेला गेलों. ३।४ हजार लोक होते. १२।१ वाजतां मी गेलों. त्यावेळीं आपटे बोलत होते —ताड लावा, फार तर दहा बारा शिपाई येतील. ते तुमचे काय करणार? त्यांना ठोका आणि घालवा. तसेंच जंगलांत जा, १।२ शिपाई येतील. ते काय करणार ? त्यांना तसेंच करा. ८ दिवसांत असें करा. मी लागेल ती मदत देईन. खल्याला दुसरी सभा भरवूं—याशिवाय मला ठाऊक नाहीं. लोक खवळलेले होते. ते उठले व—शिवाजी महाराज की जय—ह्मणून ओरडले. नंतर मी परत आलों. कानांनीं ऐकिलें. दुसरें कोणी बोललें नाहीं.

( **उलटतपासणी** )— गेल्या रविवारची ता० आठवत नाहीं. मी २।३ तास होतों. सभेस किती दिवस झाले आठवत नाहीं. गेलों त्यावेळीं आपटे व साठे बोलत होते. १॥ तासांनीं साठे बोलले. आपटे बोलत असतां साठे मध्येंच बोलले नाहींत. आपटे १॥ तास बोलत होते. साठे यांचें भाषण स्वतः ऐकलें. असें प्रतिज्ञेवर सांगतों. मी अखेरपर्यंत हजर होतों. मी गोपाळकृष्ण यांस ओळखतों. तो माझ्यापासून १०।१५ पावलें दूर होता. तो चारपांच मिनिटांनीं माझ्याजवळ आला. मी गेल्यापासून गोपाळा किती वेळानें आला सांगवत नाहीं. मी बारा वाजतां गेलों. ३॥ ला आलों. आपट्यांच्या भाषाणानंतर गोपाळ कृष्ण जवळ आला. किती वेळानें सांगवत नाहीं. तो जवळ आल्यावर आपटे यांचें भाषण अर्ध्या तासानें संपलें. मी लोकांच्या मध्यें होतों. बसलों होतों. गोपाळकृष्ण बसला नव्हता. तो शेवटपर्यंत नव्हता. मला भेटल्यावर तो १०।१५ मिनिटांनीं गेला. गोंगाट नव्हता. भाषण ऐकण्याकरितां मंडळी गुपचुप होती. मारामारी व दंगा झाला नाहीं. सभेच्या बातमीवरून बारा वाजतां गेलों. मी गेल्यावर मंडळी जमत होती. २ वाजतां पूर्ण जमली. मी ७—७॥ वाजतां परत

आलों. दौलती नाईक बरोबर होता. दोघे बरोबर आलों, गेलों व बसलों. शेवटपर्यंत दोघांचें त्यावेळीं भाषण झालें नाहीं. तुकाराम दादाला ओळखत नाहीं. तो सभेला मजपासून १०।२० कदमांवर होता. सभेचें काम शांतपणानें पार पडलें. आपट्यांचें बोलणें मीं टिपलें नाहीं. नाईकांशीं बोलणें गेटावर झालें. गेटावर आल्यावर भाषण झालें नाहीं. मीं स्मरणानें सांगितलें. पुढें सभा भरण्याचें ठरलें.

**( फेर तपासणी )**—मला दिवस किती झाले तें सांगतां येत नाहीं. मी गेल्यावर साडे तासानें बोलले. असें अंदाजानें सांगितलें. सभेंत गोपाळकृष्ण आला होता कीं काय माहित नाहीं. सुमारें १५ मिनिटांनीं गोपाळ कृष्ण गेटावर गेला व आह्मी ७॥ वाजतां गेलों. लोक टाळ्या वाजवून परत आले.

**कोर्टाच्या सवालावरून**—या सभेंत कातकरी, ब्राह्मण, आगरी, सोनार, ठाकूर वगैरे चार जाति बसल्या होत्या. बोलणारे १—१॥ फूट उंचीच्या जागेवर उभे होते. आपटे याजवळ भाषण करितांना एक बुक होतें. मध्यें टाळ्या वाजत. नंतर दुसरे कोणाजवळ सभा आटोपल्यावर माझें बोलणें झालें नाहीं.

**५ गोपाळकृष्ण सावंत**— प्रतिज्ञेवर सांगतों. उमर वर्षें २५—३० जात मराठा, धंदा पोलिस शिपाई. बोर्लै सभा ता० १८ ला भरली होती. चीं० कॉ० आजिवलींगेटावर येऊन मला हशा पाटलास बोलावण्यास सांगितलें. मी ३॥ वाजतां गेलों. २—३ हजार लोक असून नंतर कांहीं मिनिटांनीं आपटे बोलावयास उठले. १००।२०० सह्यांचा अर्ज केला. पावती आली. उत्तर नाहीं. तर आतां जंगलांत जा. लांकडें आणा. ताड लावा. एक दोन शिपाई आड येतील त्यांस भिऊं नका. तसेंच जंगलचें कोणास धरून नेऊं लागल्यास सोडवा. लोक उद्यां ताड लावूं असें ह्मणाले. नंतर मी हशा पाटलास घेऊन परत आलों.

**( उलट तपासणी )**—माझी साक्ष असल्यानें पांच सहा दिवसांपूर्वी

फौजदारांनीं सांगितलें. पनवेलीस विचारिलें होतें. सभेसंबंधानें बोलले. त्यांस मीं हकीकत कळविली. याला किती दिवस झाले तें आठवत नाहीं. १५।२० दिवस झाले असतील. नंतर पुन्हां भाषण झाल्याचें आठवत नाहीं. मी सभेंत तास सवा तास होतों. माझ्या शेजारीं कोण पोलिस होते ठाऊक नाहीं. मी गेलों तेव्हां साठे बोलत नव्हते. आपटे तास बोलले. नंतर सुमारें १० मिनिटांनीं साठे बोलले. मला हशा पाटलास बोलावण्यास पाठविलें होतें. दिवस खालीं गेला होता. २॥—३ वाजतां मीं आजिवलीगेट सोडलें. हशाकडे न जातां परभारें बोरल्यास गेलों. हशा सभेंत असल्यास लौकर घेऊन येण्यास मला सांगितलें होतें. सरासरी १५ मिनिटांनीं तो भेटला. भाषण पुरें झाल्यावांचून तो येईना; नंतर त्याला आणला. कांहीं उभे होते, कांहीं बसले होते, कांहीं झाडावर होते. आपट्यांचे हातांत अर्ध्या फुलस्केपयेवढा कागद होता; बुक् होतें. मी आपट्यापासून ३२ पावलांवर होतों. सभा झाल्यानंतर फौजदारांनीं मला केव्हां विचारलें आठवत नाहीं. मी अशा सभारंभास गेलों नव्हतों. सभा सावलींत होती. बोलणारे उंच दगडावर उभे राहून बोलत. ती खळ्याची जागा होती. ती २।४।६ बोटें उंचीची असेल. मंडळीच्या बाहेर होतों. नाईक बारा पावलांवर होता.

( **फेर तपासणी** ) वेळ मीं अंदाजानें सांगितला. उद्यां ताड लावूं. जंगलांत जाऊं. प्रतिबंध मानणार नाहीं. असें लोक बोलले.

**६ सखाराम विठोजी देशमुख**—प्रतिज्ञेवर सांगतों. उमर ३०।३५, जात मराठा, धंदा शेतकी, राहणार आम्बरोळी. मी बोर्ली सभेला गेलों होतों. हजार दीड हजार लोक होते. मी आरोपीला ओळखीत नाहीं. धारा व जंगल सुटण्याबद्दल सरकारास अर्ज करा असें सांगितल्याचें ऐकिलें व लोक असेंच ह्मणत होते. मी लांब होतों सबब लेक्चर कोणीं व काय दिलें तें समजलें नाहीं. पोलिसकडे माझा जबाब झाला. ( तो वाचून दाखविला ) मीं हा जबाब दिला नाहीं. त्यांनीं मला धमकावलें सबब

जिवाच्या आशेनें त्यावर सही केली. हिरोजी खंडोजी माझा भाऊबंद आहे. काल पेणेस होता. आज कोठें आहे तें ठाऊक नाहीं.

( **उलट तपासणी** ) पनवेल तालुक्यांत माझे मालकीचे ताड आहेत. पायऱ्या काढायला परवानगी नको. झावळ्या तोडण्यास पायऱ्या लागतात. ताडगोळ्यास परवानगी लागत नाहीं. ताड तोडायला परवानगी नको. पण कळवावें लागतें. गाडगें लावण्याशिवाय बाकीच्या कामास परवानगी लागत नाहीं. सभेंत एक अर्ज वाचला होता. ताड व जंगलाची परवानगी मागितलेली होती. मी सभेला ५ वाजतां गेलों. ती संपण्याच्या बेतांत होती.

( **फेर तपासणी** ) ताड ठोकायचे कधीं तें ठाऊक नाहीं. रस काढण्याच्या पूर्वी बोंड येतो. तो माहित नाहीं. ठोकल्याशिवाय रस निघत नाहीं. हें मला माहित आहे.

**७ बिड्या वल्लद रावनाक महार**—प्रतिज्ञेवर सांगतों. उमर ४०।४५, राहणार खाणोला. मी बोलर्याला रोडेभाऊ तलाठीपासून ताडीचे लायसन्स घेण्यास गेलों होतों. २५।२६।२७ दिवस झाले. हजार, दीड हजार लोक जमले होते. ते बोलत नव्हते. मी आरोपीला ओळखत नाहीं. पुणेवाला व पेणवाला कोणी आला आहे असें ह्मणत. याशिवाय सभेंत कांहींही ऐकलें नाहीं. माझा जबाब ची. कॉ. नें घतला आहे. मला लिहितां येत नाहीं. जबाब पाहिजे तसा लिहून माझी सही केली आहे. मला धमकावून पाहिजे तसा लिहून घेतला.

( **उलट तपासणी** ) त्या दिवशीं सभा फक्त बोलर्यासच झाली एवढें मला ठाऊक आहे. शेवटपर्यंत नव्हतों. पनवेल तालुक्यांतील ताडांवर ज्याची त्याची मालकी आहे. चोखळायाला परवानगी लागत नसून गाडगें लावण्यास मात्र लागते. मला शनवारीं रात्रीं पोलिसानें पहाऱ्यांत ठेविलें होतें व आह्मी सांगतों त्याप्रमाणें सांग ह्मणत. मला सकाळीं पग्न लावून दिलें व पुन्हां बोलाविलें. शनवारची रात्र मी उपाशी होतों.

त्यावेळीं माझा पाय दुखत नव्हता. मी नको म्हणत असतां जुलमानें माझी सही केली.

८ ज्ञाना नागु पाटिल—उमर २०।२२, जात आगरी, राहणार सावळें, धंदा शेती, प्रतिज्ञेवर सांगतों. आमच्या गांवांत ताड चोखळले असल्याचा मीं रिपोर्ट केला आहे. चोखळले म्हणजे सालपटे काढलीं. त्याना तसें करण्यास परवानगी लागत नाहीं. हे ताड जंगलजवळ आहेत. ते कोणीं चोखळले नाहीं. ( रिपोर्ट वाचून दाखविला ) सभेला कोण गेले मला ठाऊक नाहीं. मी सभेला नव्हतों. रिपोर्टांत ताडाची लागवड केल्याचें लिहिलें पण तें कोणीं तें माहित नाहीं. नामाजी पांडू पाटिल व बाबाजी महादु भंडारकर यांनीं आम्ही ताड लावूं वगैरे कांहीं सांगितलें नाहीं. माझें दुकान आहे म्हणून सभेच्या वेळीं मी पनवेलीस गेलों होतों. रिपोर्टांत दाखल केलेल्या चौदा इसमांनीं आम्ही जोरानें ताड लावूं असें मुळींच सांगितलें नाहीं. रिपोर्टावर फक्त माझी सही मात्र आहे.

( **उलट तपासणी** ) मालकींचे ताड या तालुक्यांत आहेत. मालक ताड, फळें व झावळ्या घेतो, पायऱ्या पाडतो. सरकारची परवानगी लागत नाहीं. ताड लावण्यास परवानगी लागत नाहीं. नक्की ठाऊक नाहीं. चोखळण्यांत गाडगें लावण्याशिवाय सर्व येतें. पो. इ. नें सांगण्याच्या पाटलास चार थापडा मारल्या म्हणून मीं भीतीनें सही केली. त्याला व मला बरोबरच नेलें होतें. मला धमकी दिली. जबाब वाचून दाखविला नाहीं. त्या प्रसंगाची आठवण झाली म्हणजे अजून माझें अंग थरारतें.

( **फेर तपासणी** ) तारखेची आठवण नाहीं. वारही आठवत नाहीं. सांजची पनवेलीस सही केली. पो. इ. कडे व ची. कॉं. कडे झाले आहत. पो. इ. बंदरच्या ऑफिसांत उतरले होते. मला आंत येतांना कोणींही पाहिलें नाहीं. गाडगें लावण्यापूर्वीं कोंब निघतो. त्याच्या ठोकणे करितात. त्याला परवानगी लागते. परवानगी लागत नाहीं हे खरें आहे. मीं लायसन्स घेतलें आहे.

## पेण, सुधाकर, ता० २३।१।१८९७ उतारा.

१ **दौलती बाळा सांवत**—प्रतिज्ञेवर सांगतों—उमर ३६, जात मराठा, धंदा पो. कॉ. वर्ग ४ गेट अजिवली. मी आपट्याला ओळखतों. मी बोर्लीस सभेला गेलों होतों. ता० १८।१२।९६ सुमारें १२ वाजतां गेलों. मी गेलों तेव्हां लोक येत होते. सुमारें ३ हजार मंडळी होती. आपट्यांचें भाषण मीं ऐकलें. माझ्या बरोबर एक कॉन्स्टेबल होता. आपण कलेक्टर साहेबाकडे अर्ज पाठविला होता. आपणांस फक्त त्याची पावती आली. उत्तर आलें नाहीं. तेव्हां सरकारानें तो गांडीला पुसून टाकला असावा. तर तुह्मी जंगलांत जा; लांकडें तोडा; ताडाची लागवड करा; एखादा पोलिस आड आल्यास त्यास टोणपा; एखाद्याला धरून नेऊं लागल्यास त्यास सर्व मिळून सोडवा. पोलिस किती येतील! ५।१०।१५ येतील. ते तुमचें काय करणार! त्यांस काठ्यानें टोणपा. तसेंच जंगलाचें. १।२ शिपाई येतील त्यांचेंही तसेंच करा; कंत्राटवाल्याची दारू पिऊं नका. ती मुताप्रमाणें माना; ताडाची लागवड करून ताडी प्या. आठ दिवसांत असें करून दाखविल्यास मी पाहिजे ती मदत देईन; आपण पाहिजे तर दुसरी सभा चिखल्यास भरवूं असें आपटे बोलले. त्यावेळीं लोक खवळलेले दिसले. व आह्मी उद्यां जंगलांत जाऊं, तोडूं व ताडाची लागवड करूं. मग पहातां येईल असें बोलले; लोक खवळलेले पाहून मी परतलों. मीं ही हकीगत ची. कॉ. ला कळविली आहे.

( **उलट तपासणी** ) सभा होऊन २६।२७ दिवस झाले. ता० १८ जानेवारी फेब्रुवारी नाहीं. डिसेंबर रोजीं भरली होती. त्या जागेवर बांबूचीं बेटें आहेत; सभोंवार आहेत. पूर्वेकडे २०।२५ पावलें व उत्तरेकडे २०।२५ पावलें लांब आहे. तुटक तुटक आहेत. रांकेनें नाहींत. बेटांना लागून सुद्धां मंडळी बसली होती; मला असल्या सभांना जाण्याचा हुकूम आहे. याच सभेकारितां निराळा हुकूम नव्हता; मंडळी ३ हजार होती. सभा तास सव्वा तास चालली होती. मी भाषण आटोपल्यावर १०।१५ मिनिटांनीं गेलों. भाषण

सुमारें ४ वाजतां सुरू झालें असेल. मी तेथें ?।५ तास होतों. कांहीं वेळानें सभा फुटली. त्या सभेंत साठे बोलले नाहींत. आपट्यांचें भाषण आटोपल्यानंतर अस्तमानाच्या सुमारास साठे एका माळावर बोलले. त्यांना भाषण करितांना मीं स्वतः पाहिलें. तिथें साठे बोलले नाहींत. माझ्याबरोबर सुकोजी महार होता. गोपाळकृष्णा मागाहून आला. तो भाषण होण्याचे पूर्वी सुमारें १–२ तास आला. तो भाषण होईतोंपर्यंत होता. माझ्यापासून १५।२० पावलांवर होता. तो मी बरोबर आलों नाहीं. माझी त्याची गेटावर गांठ पडली नाहीं. बोलतांना आपट्यांच्या हातांत कागद नव्हता. हात रिकामे होते. आपटे भाषण करीत असतां गोंगाट मुळींच नव्हता. लोक साधारणपणें बोलत होते. सर्व ठिकाणीं छाया नाहीं. कांहीं मंडळी उन्हांत होती. कांहीं बसली उठली होती. सभेच्या दिवशीं सुमारें ६॥–६॥। च्या सुमारास माझी व चीꣳ कॉꣳ ची गांठ पडली. मीं १९ ला रिपोर्ट केला. कोणाबरोबर पाठविला तें लक्ष्यांत नाहीं. मी गेटावर गेलों त्यावेळीं तेथें सूर्याजी मल्हार, गोपाळ कृष्णा व लक्ष्मण महार वगैरे होते. शिवाय, तपासाकरितां आणलेले लोक होते. मी नजीकच अंतरावर होतों. त्या भाषणाचा रिपोर्ट मीं घरीं येऊन लिहिला. माझ्या शेजारीं कोणीही नव्हतें. एक कॉन्स्टेबल मात्र होता. तुकाराम दादाला मीं सभेच्या ठिकाणीं पाहिला. आह्मी बारा वाजतां आल्यावर तो दुकान घेऊन तेथें होता. सभा सगळी बरखास्त होईतोंपर्यंत होता. आपट्याचें भाषण झाल्यावर मंडळी फुटली व आह्मीही गेलों. ती जागा सोडून मी ५।४ मिनिटांनीं गेलों. लोकांनींही जाण्याची सुरवात केली. लोक पहिल्यानें शांत बसले होते. नंतर ताड वहात जा वगैरे बोलत. झटपट झाली नाहीं. बोलण्याचीच फक्त गडबड चालली होती. गोंगाट होत होता. कांहीं उभे होते व कांहीं बसले होते. १००।५०० उभे होते व कांहीं बसले होते. कांहीं झाडावर बसले होते. तुकारामदादा नांवाचा तेथें होता कीं काय तें ठाऊक नाहीं. आपट्यांचे

हातांत एक अर्धा फुल्स्केप व बुक होतें. मी ३२ पावलें लांब होतों. मी आपट्यांच्या बोलण्याचें टिपण केलें नाहीं. तेव्हांही नाहीं व आतांही नाहीं. सभा झाल्यानंतर २।३।४।५ दिवसांनीं फौजदारांनीं मला ही हकीकत विचारली. नक्की आठवत नाहीं. मी असल्या सभेला आतांपर्यंत गेलों नव्हतों. आपट्यांचे शेजारीं पुष्कळ मंडळी बसली होती. बहुतेक सावलींत होती. २।३ मंडळी सावलींत होती. छत्री वगैरे कोणींही उघडली नव्हती. ते कधीं कधीं धोंड्यावर असत; जमीनीवरही असत. ती जमीन उंचवट्याची होती. २।४।६ बोटें असेल. सगळ्या मंडळींच्या मी बाहेर होतों. मग ती जागा आह्मीं सोडली नाहीं. तेथेंच होतों. नाईक माझ्यापासून १०।१५ पावलांवर होते. लोक बोलले.

**( फेर तपासणी )** माझ्या जवळ घड्याळ नव्हतें. मीं वेळ अंदाजानें सांगितली. आह्मी सकाळीं जाऊन ताड लावूं, जंगलांत जाऊं, तोडूं. कोणी प्रतिबंध करावयास आला तर त्याची तजवीज करूं असें लोक बोलत होते.

**कोर्टाच्या सवालावरून**—सभोंवतीं आगरी, कातवडी लोक होते. भाषण सर्वच लोक करीत. मराठे, कातवडी, आगरी बोलत होते.

## पेण, सुधाकर, ता० ३०।१।१८९७ उतारा.

( मुद्दाम पाठविलेल्या बातमीदाराकडून )

खटला ठरल्याप्रमाणें, ता० २२।१।९७ रोजीं, कोल्हारास सुमारें १ वाजतां सुरू झाला. मागील वकील हजर असून, पुण्याहून मि० आप्पाराव वैद्य हेही आले होते. सुमारें २।३ हजार मंडळी जमली होती.

१० **फिरू वल्लद करीम**—प्रतिज्ञेवर सांगतो—धंदा व्यापार, कोंबड्याचा, आरोपींस ओळखतों. त्यास बोरले गांवीं पाहिलें—ते ह्मणाले ताड लावावे. सरकारास धारा देऊं नये; दारू पिऊं नये; ताडाचें दूणें देऊं नये; जंगल तोडावें, आठ दिवसांत चमत्कार दाखवा. मी तुह्मांस मदत करीन सभेला मी व माझा गडी गेलों होतों, त्याचें नांव भाऊ.

बापाचें नांव माहित नाहीं. दिवस उतरला होता. तोंपर्यंत मी तेथें होतों.

( **उलट तपासणी** ) मी राहणार पनवेल येथील आहें. मीं सभेला गेलों होतों. ही गोष्ट मी आजपर्यंत कोणाजवळ बोललों नाहीं. आणखी कोणी सभेमध्यें बोलला नाहीं. मी सभा संपेपावेतों होतों. किती तास स्मरण नाहीं; कांहीं बसले होते; कांहीं उभे होते; कोंबडी बरोबर नव्हती. दिवसा मिळत नाहीत. कोंबडी सांजची मिळतील. म्हणून गडी नेला होता; सभा संपल्यावर गांवांत जाऊन कोंबडी घेऊन परत आलों; कोंबडी दोन डझन ( २४ ) घेतली. पनवेल येथें १० वाजतां आलों; माझा गडी भाऊ दर खेपेला बरोबर नेतों; प्रत्येक खेपेला पैसें देतों; रोज त्यालाच नेतों. ५॥ वाजतां सभा आटोपली व मी परत आलों. गांवांत कोंबडी कोणाकोणाची घेतली याचा हिशोब नाहीं; कोणाजवळून एक कोणाजवळून दोन घेतली. मी जाणेचे पूर्वी सभा सुरू झाली होती. माझें जंगल, ताड व शेत नाहीं. माणसें जमलीं होतीं म्हणून मी उभा राहिलों; कशाकरितां जमलीं होतीं माहीत नाहीं. मी ७।८ वर्षें हा धंदा करतों; बोर्ली गांवांत व आजूबाजूस कोंबडी घेतों; एक दोन दिवसांआड खेंदीस जातों; वेळेचा नियम नाहीं. बोर्ली पनवेलपासून १॥—२ कोस आहे; मला फौजदारांनीं साक्षीस आणलें. समन्स लावलें नव्हतें. मला ५।६ दिवसांपूर्वीं फौजदारांनीं बोलावल्यावरून मी कचेरींत गेलों; माझा व गडी भाऊ याचा जबाब झाला; दिवसा गेलों होतों; बरोबर खुराडा घेऊन गेलों होतों; सभेच्या वेळीं भाऊ २० पावलांवर होता; त्याच्या जवळ खुराडा होता. गोंगाट नव्हता; लोक ऐकत होते; माझ्या ओळखीचें कोणी नव्हतें. माझ्या दृष्टीला दुसरे मुसलमान पडले नाहींत, शिपाई दोघे तिथे होते. नांवें ठाऊक नाहींत. मला मराठी धड समजत नाहीं; सभेची हकीकत फौजदारांशिवाय कोणास कळविली नाहीं; आरोपीच्या अंगांत काय होतें तें माहित नाहीं; १८ गांवचे लोक होते. नांवें माहित नाहींत; भाषण मीं लिहून ठेविलें नाहीं. मला

लिहितां येत नाहीं; अर्ज वगैरे कांहीं वाचला नाहीं; सभेंत ताड लावावे, सरकारास देणं देऊं नये, जंगल तोडावें याशिवाय कांहीं ठाऊक नाहीं. हें मी पाठ करीत नव्हतों; या गोष्टी पोलिसाला सांगण्यासारख्या आहेत किंवा नाहींत याचें धोरण राहिलें नाहीं; मी असले सभेला कधीं गेलों नाहीं; मला जाण्यास बनत नाहीं; आरोपी २०।२२ पावलांवर होता; तेथें बांबूचीं व भेंडीचीं झाडें आहेत. भाऊ उजवे बाजूस होता कीं डावे बाजूस होता तें आठवत नाहीं. मला तो दिसत नव्हता. बोर्ली गांवचें कोणत्या दिशेस सभा होती तें सांगतां येत नाहीं; आरोपीला यापूर्वीं कधीं पाहिला नव्हता. पनवेल १२ वाजतां सोडली. ३ च्या सुमारास सभेच्या ठिकाणीं गेलों. ५॥ वाजतां सभा आटोपली; मी १० वाजतां घरी गेलों.

(**फेर तपासणी**) वेळ अंदाजानें सांगितली; मला व माझ्या गड्याला फौजदारांनीं बोलावल्यावरून आलों. धडा याचा अर्थ मला कळत नाहीं. मीं बोलणें ऐकलें.

११ **भाऊ हणमंता नलवडे**–प्रति० सांगतों. जात मराठा, धंदा मोलमजुरी, राहणार पनवेल. आरोपीस ओळखतों. बोल्यांस पाहिलें. ४।४। झाले होते. गांवाबाहेर होते. २००० लोक होते. कांहीं उभे होते. कांहीं बसले होते. आरोपी उभा होता. ते ह्मणाले–सरकारी धारा देऊं नये, दारू पिऊं नये, जंगल तोडावें, ताड लावावे, आठ दिवसांचे आंत जर तुह्मी तसें कराल–नाहीं, नाहीं, तसें नाहीं; चुकलों–तर आह्मी सर्व मदत देऊं सरकारी शिपाई व अंमलदार आला तर त्याला सोडून द्यावें. शिपायांनीं न ऐकल्यास हात दाखवावा. पुढें लोक गडबड करूं लागले. कुणबी बोलले कीं, आह्मी तुह्मांस आठ दिवसांचे आंत असें करून दाखवूं. आणखी मला कांहीं एक ठाऊक नाहीं.

( **उलट तपासणी** ) -- तेथें अठरापगड जात होती. कातकरी, ठाकूर, ब्राह्मण, सोनार, मुसलमान वगैरे. मुसलमान अदमासें २५ होते

मी व फिरू जवळच होतों. सभा अर्धा तास होती. मग मी परत ७॥ वाजतां पनवेलला आलों. मी आलों त्यावेळीं दिवे लागतच होते–( यावेळीं साक्षिदारानें ६।६॥ सांगितले; परंतु सरकारी वकीलानें ७।७॥ सांगितले; असा हट्ट धरला; शेवटीं तसेंच लिहून घेतलें. ) पनवेलीहून ३ वाजतां मी फिरूसह निघालों. परत बरोबरच आलों. सभा पाहून दुसऱ्या गांवाला गेलों. कोणत्या तें मला माहित नाहीं. कोंबडीं घेतलीं. तेथें कधीं गेलों नव्हतों. त्या दिवशीं माल मिळाला नाहीं. माल ह्मणजे कोंबडी. मी सुमारें दीड महिना नोकरीस आहें. पगार वरचेवर घेतों. लागेल तसा घेतों. ७॥ रुपयांपर्यंत महिन्याचा ठराव आहे. पनवेलचे ओळखीचे लोक नव्हते. मी राहणार पनवेलचा आहें. माझ्यापुढें मंडळी बसली होती. मी व माझा धनी उभा होतों. भाषण सुमारें अर्धा तास झालें. नंतर सभा बरखास्त झाली. आरोपीचा पोशाख आहे तसाच होता. ४।५ दिवसांपूर्वीं मला बोलाविलें होतें. मी आजपर्यंत कोणाजवळ बोललों नाहीं. धनी उभा राहिला ह्मणून मी राहिलों. माझें ताड व जगल नाहीं. ताड लावा या शब्दाचा अर्थ कळत नाहीं. हलागल्ला ह्मणजे मोठ्यानें बोलणें. बोलणें गैरशिस्त नव्हतें कीं काय माहित नाहीं. मला लिहितां येत नाहीं. पोलिस बोलावतील हें माहित नव्हतें काय भाषण झालें तें कोणाजवळ सांगितलें नाहीं. कोंबडीं केव्हांही मिळतात. नियमित वेळ नाहीं. पनवेल २॥–३ वाजतां सोडली. सभेचा गांव दोन कोसांवर आहे. बोरलीच्या वाटेवरच आहे. वाट सोडल्याशिवाय सभेस जातां येणार नाहीं. मी सभेला गेलों होतों. हें पोलिसांला कसें कळलें तें माहित नाहीं. मी व फिरू ची० कॉं. कडे बरोबरच गेलों. आरोपीस अगोदर पाहिलें नव्हतें. माझ्यांत व त्यांच्यांत १०।१२ पावलें अंतर होतें. आरोपी बोलला तें हुबेहुब मीं सांगितलें. यांत अंतर नाहीं.

( **फेर तपासणी** )—प्रत्येक खेपेस किती कोंबड्या मिळतात. तें

सांगतां येत नाहीं. ताड लावा याचा अर्थ सांगतां येत नाहीं.

१२ **केशव वासुदेव फडके**— प्रति० सां०— धंदा कारकून, कलेक्टर ऑफिस मुलकी खातें. ११४४८ सह्यांचा अर्ज झाला आहे. ९।१२।९६ रोजीं झालेला आहे. हा अर्ज कोणीं पाठविला व कसा आला हें माहित नाहीं. टपालांतून आला. याजवर बाजूला जें इंग्रजी लिहिलें आहे तें चिटणीसांच्या हातचें आहे. अर्ज व कागद चिटणीस घेतात.

खटला सुरू होण्यापूर्वी मि. आपटे यांचा फोटो घेण्याकरितां पुण्याहून मंडळी आली होती. त्यांनीं १२ पोलिस हत्यारें उपसून आपट्यांच्या भोंवतीं उभे आहेत असा फोटो घेतला.

## पेण, सुधाकर, ता० ६।२।१८९७ उतारा.

हा खटला ता. ३० रोजीं कर्जत येथें चालला. आरोपीतर्फे भांडारकर यांच्या ऐवजीं रा. बोडस हायकोर्ट प्लीडर हे आले होते. खटला पाहण्यास १०।१२ हजार मंडळी जमली होती. खटला १॥–२ च्या सुमारास सुरू झाला. जबान्या खालीं दिल्या आहेत.

१३ **अबकारी सब इन्स्पेक्टर**—प्रति० सांगतों. भेरली माडास सुद्धां परवानगी लागते. भेरली माडाचीं बिन परवानगीचीं ९ आढळलीं. कांहीं गाडगीं लावलेलीं होतीं. कांहीं तासलेलीं होतीं. मालडुंगें गांवीं होतीं. सरकारी जंगलमध्यें होता. मीं चवकशी केली आहे. रिपोर्ट केला आहे. पंचनामा झालेला आहे. ( दाखविला ) रिपोर्ट अबकारी इन्स्पेक्टरास केला.

( **उलट तपासणी** ) मालडुंगे बोलींपासून ५।६ कोसांवर आहे. सभेस मी नव्हतों. मला त्याची कांहीं माहिती नाहीं. मी आरोपीस ओळखत नाहीं. पूर्वीं कधीं पाहिलेलें नाहीं. हें कोणतें फॉरेष्ट आहे तें माहित नाहीं. छेदण्यास परवानगी लागते. नुसतें पाहिल्यास लागत नाहीं. नुसतें काथ तोडलें तर लायसन्स नको. पाहिलें ह्मणजे कळतें. कोणीं

तोडलें हें कळत नाहीं. तपास चालू आहे. मला असल्या सभेस जाण्याचा व तपास करण्याचा मामलेदाराचा हुकूम होता. इन्स्पेक्टरकडून आला. मालडुंग हें माहित नव्हतें. तेथेंच जा असा हुकूम नव्हता. बोर्ली गांवीं ताड आहेत. तेथें तोडलेले नाहींत. तोडलेल्या झाडांतून रस आला नव्हता. नुसती क्रिया झाली होती. एक दोन मधून थेंब येत होते. वरच्या कृतीस ७।८ दिवस झाले. पैकीं एक दोन जून झालेले होते. बोर्लें गांवचे लोक मालडुंगे येथें जात नाहींत व मला सांगवत नाहीं. सभेमुळें ताड तोडतील असा हुकुम आला होता. त्यास सुमारें २५।२६ दिवस झाले.

( **फेर तपासणी** ) मालडुंगे हा गांव माझ्या हद्दींत आहे. ह्मणून मी गेलों होतों.

**कोर्टाचे सवालावरून**—ता० २७।२८ सचे नंतर ७।८ दिवसांचे आंत मी आपले हद्दींत फिरण्यास गेलों होतों व ह्या ताडांखेरीज कोठें लावलेलीं झाडें आढळलीं नाहींत.

१४ **गोपाळ नारायण**—उमर वर्षें २८, जात ब्राह्मण, धंदा नोकरी पोष्टांत. ता० ९।१२।१६ रोजीं पनवेल येथें होतों. त्या दिवशींची रजिस्टर बंगीबुक् पाहून सांगेन. नंबर ९७ चे रजिष्टर अलिबागेस गेलें किंवा काय मला सांगतां येणार नाहीं. रजिस्टर असतें. त्याचें पावतीवर नांव असतें. हे नंबर व बुकांतील नंबर निरनिराळे आहेत. ए. डी. ही खूण केली आहे. ह्मणजे ही जबाब मागविलेली पावती आहे. ती हीच. ह्यांत हा पिंवळा कागद दिसतो ती रसीद. याचेवर पाठविणाराचें नांव असत नाहीं. डिलिव्हरी ऑफिसला असते. आरोपीस मी ओळखीत नाहीं. कधीं पाहिलें कीं नाहीं हें माझ्या लक्ष्यांत नाहीं.

( **उलट तपासणी** ) या पार्सल बुकांत नंबर ९७ यांतील एकच असते. असें मीं सांगितलें नाहीं. नंबर ५९६–५९७–५९८ कलेक्टर ऑफ कुलाबा हीं तिन्हीं एकच तारखेस आहेत ह्या तिन्ही

पैकीं कोणतें पार्सल कोणीं पाठविलें हें सांगतां येणार नाहीं. व रजिस्टर करणाराचा दाखला नाहीं व हातची सही वगैरे नसते व या तिन्हींपैकीं कोणतेंही माणसास ओळखूं शकणार नाहीं. रजिष्टर करण्यास जो येतो त्याचेच नांवची पावती असते असा नेम नाहीं. माझ्या नांवचें रजिष्टर असून दुसऱ्याचे नांवची पावती असूं शकेल. बुक्पोष्ट रजिष्टरमध्यें जातें. व त्याचा दाखला पार्सल बुकांत मिळणार नाहीं.

( **फेर तपासणी** ) नंबर १७ चें रजिस्टर पार्सल होतें तें अलिबागेस गेलें. पार्सलची पावती आमचे पाशीं मिळत नाहीं.

**कोर्टाचे सवालावरून**—नंबर ५।१६।१७।१८ हें एकच आहे ह्मणून सांगितलें. हें चुकून सांगितलें. एक पावतीची कॉपी आमचेकडे मागणाऱ्यास देण्याकरितां येते. व स्थळप्रत डिलिव्हरी ऑफिसला राहते. या पावतीचे नमुन्यांत डिलिव्हरी ऑफिसचें नांव, पाठविणाराचें नांव व रजिष्टर नंबर आणि घेणाराचें नांव अशी छापील सदराची असते.

नंतर दोन्ही वकिलांच्या तक्रारी झाल्या आणि त्यानंतर आरोपीवर पिनलकोड क० ११७,२२५,३५३ व ३७९, अबकारी ॲक्ट क० ४३ व फॉरेस्ट आक्ट क० २५ प्रमाणें चार्ज ठेवण्यांत आला. आरोपीची जबानी घेतली.

**आरोपी—गोविंद विनायक आपटे**—जात ब्राह्मण, धंदा व्यापार, वय २८, १८ डिसेंबर रोजीं बोर्ले गांवीं मीं भाषण केलें. यावेळीं अजमासें ६।७ हजार लोक जमले होते. त्यांस, ताड लावण्यास, जंगल तोडण्यास उत्तेजन दिलें नाहीं. सरकारी नोकरांस हरकत करून त्यांस मार द्यावा असें मी बोललों नाहीं. मि० केन साहेब यांनीं केसरी वर्तमानपत्रांत दारू न पिणेविषयीं लिहिलेलें वाचून दाखविलें. एकी व भक्ति या विषयांवर भाषण केलें. मीं कलेक्टर साहेबांस अर्ज स्वतः केला नाहीं. रयतेनें केला असें मला कळलें. ह्मणून डायरींत टिपून ठेविलें. जंगल धारा व ताड यांविषयीं मी कांहींच बोललों नाहीं.

नंतर खटला पेणेजवळ वावें वडखळें येथें ता. १० रोजीं नेमण्यांत आला.

## पण, सुधाकर, ता० १३।२।१८९७.

ता. १०।२।१८९७ हा खटला कालरोजीं पेणेनजीक वावें येथें न चालतां, मामलेदार कचेरींतच चालला. आरोपीतर्फे मे. बोडस, धारपुरे हजर होते. खटल्यास १२ वाजतां सुरवात झाली.

मि. बोडस यांनीं मागील तीन साक्षिदारांची पुन्हां उलट तपासणी करण्याविषयीं कोर्टाची परवानगी मागितली. आधार दाखवा, असें विचारल्यावर मि. बोडस यांनीं २५६।२५७ कलमांचा आधार दाखवून तीन कॉन्स्टेबलांस पुन्हां समन्स लावून परत बोलवावें. अशी कोर्टास विनंति केली. दौलती बाळा, सूर्याजी मल्हार, आणि गोपाळकृष्ण सावंत. वकिलांच्या तंक्रारी झाल्या व आधार उद्यां दाखविण्याचें ठरलें.

**काळ्या बिन राघु**—प्रति० सांगतों—वय ४०, जात आगरी, धंदा शेतकाम. राहणार अंबिवली. बोरल्याचे सभेला गेलों होतों. सभा ह्याच वखतास झाली. सुमारें १२ वाजतां. १॥। महिने झाले. मी गेलों तेव्हां लोक जमले होते. तेथें सर्व जातींचे रयत लोक जमले होते. पाणी गेलें आहे. पीक बुडालें आहे. तेव्हां सावकारांनीं मक्ता सोडावा. असें जमलेली रयत बोलत होती. ह्याला ( आरोपीला ) मी साफ ओळखीत नाहीं. तो पहिल्यानें नव्हता. मागून आला. एकजण ब्राह्मण तेथें बोलला. ह्याच कीं काय माहित नाहीं. त्यानें आपल्या जवळचा कागद वाचला. दारू पिऊं नका. दारू प्याल्यापासून अपकार होईल. तुमचे संसार जातील. यंदां खायलाच नाहीं असें तो ह्मणाला. दारूपासून संसार जातील व पोराबाळांचें नुकसान होईल असेंही तो ह्मणाला. आणखीं कांहीं तो बोलला नाहीं. तो लोकांचें बोलणें झाल्यावर दोन तीन शब्द बोलला. मी १२।१ वाजल्यापासून दोहोंपर्यंत तेथें होतों. त्याचें बोलणें संपेपर्यंत होतों.

( **उलट तपासणी** ) बोरली पनवेल तालुक्यांत आहे. किती सभा

झाल्या तें माहित नाहीं. पळस्प्याच्या सभेला मी गेलों होतों. तेथें खुर्चीवर कोण होता, तें मीं पाहिलें नाहीं. कोण बोलला तेंही समजलें नाहीं. मीं धान्याच्या अर्जावर सही केली नाहीं. माझें शेत वगैरे नाहीं. मी तेथें मक्त्याची सूट मागण्याकरितां गेलों होतों. बोर्लीच्या सभेसंबंधानें मला कोणीं सांगितलें हें मला सांगतां येत नाहीं. बोर्लीच्या सभेला मी चाकायेवढा ( २५ पावलें ) लांब होतो. बोलण्यापासून ( जवळचें चाक दाखविलें. ) कोणी उभे होतें व कोणी बसले होतें. कोणी उभे होते. कोणीहीं व्यवस्था करींत नव्हते. आतां नक्की किती वाजले हें सांगता येत नाहीं. १२ असतील नसतील. आम्ही सूर्यावरून वेळ समजतों. मला घटका समजत नाहीं. संध्याकाळ झाली नव्हती. अगदीं सभा संपेपर्यंत मी तेथें नव्हतों. सभेला सावकार लोक होतें. सावकारांना कोणीं बोलाविलें माहित नाहीं. रयतपैकीं सगळे बोलत होते. मला कोणाचें नांव सांगतां यायचें नाहीं. सभेंत धर्माची गोष्ट चालली होती कीं नाहीं हें मला ठाऊक नाहीं. मला फाट्याविषयीं कोणीं बोलल्याचे माहित नाहीं. माझ्या गांवांतलेही लोक होतें. ते कोठें बसले होते हें माहित नाहीं. माझ्याजवळ कोण होतें हें आठवत नाहीं. ( आरोपीस दाखविला ) हे माझ्या ओळखीचे नाहींत. हिरवा फेटा होता यावरून हे असतीलसे वाटतें. हे दोन तीन शब्द बोलल्यावर मी गेलों. नंतर कोणी बोलला असल्यास मला ठाऊक नाहीं. मी गेलों तेव्हां सभा होती. ह्मणून मीं यांचें भाषण शेवटपर्यंत ऐकलें नाहीं. सभा केव्हां उठली हें मला माहीत नाहीं. चवथ्या खुर्चीवरचे इसम ( मि. देव ) होते किंवा नाहीं, मला माहित नाहीं.

( **फेर तपासणी** ) आरोपी मी गेलों तेव्हां बोलत होता कीं नाहीं हें मला ठाऊक नाहीं. सावकारापासून सूट मागण्यासंबंधानें लोक उभे राहून बोलत होते. मला धर्म शब्दाचा अर्थ कळत नाहीं. पळस्प्याच्या सभेला हा होता कीं नाहीं हें माहित नाहीं. मीं पाहिला नाहीं. मी

सभेंतून गेलों त्यावेळीं दिवस बराच होता. किती वाजले व किती दिवस होता हें आह्मांस मुळींच कळत नाहीं.

**कोर्टाचे सवालावरून**—दोन तीन शब्द ऐकल्यावर मी एकटाच गेलों.

• **२ गणपतिराम पाटील**—प्रति० सांगतों—वय ३०, जात आगरी, धंदा नांगर, राहणार चिखलें. मी बोर्लीच्या सभेला गेलों होतों. अदमासे दोन महिने झाले असतील. सभेला मी घराहून जेवून निघालों. व १२ वाजतां तेथें गेलों. त्यावेळीं कांहीं येत होते व कांहीं आले होते. मी आरोपीला ओळखतों. सभेपूर्वी माझी त्याची ओळख नव्हती. लोक त्याला आपटे ह्मणतात ह्मणून मी ह्मणतों. त्यानें कागद वाचला व बोलून दाखविलें. दारू खाऊं नये. लोकांचा तोटा होतो. यंदां पाऊस कमी आहे. दाणा कमी पिकला आहे, तर तुह्मी दारूला पैसे खर्च करूं नका. चांगल्या रीतिनें रहा असें सांगितलें. एकी व भक्तीसंबंधानें सांगितलें, तें आह्मांला समजलें नाहीं. ह्मणून दारूसंबंधानें असें फोडून सांगितलें. तो घटका दोन घटका बोलत होता. मी सभा आटपेपर्यंत होतो. दिवस मावळतां गेलों. त्याचें सर्व बोलणें ऐकलें. आपट्यांच्या बोलण्यानंतर सभा फुटली व दुसरा एक बामण आह्मांस माझे दोन शब्द ऐका ह्मणून ह्मणूं लागला. ह्मणून आह्मी दुसऱ्या माळावर बसलों. त्याचें नांव ठाऊक नाहीं. तेथें मीं शिपाई मुळींच पाहिला नाहीं. मी ते बोलत होते तें साफ ऐकूं येईल इतक्या अंतरावर होतों.

( **उलट तपासणी** ) मीं चिखल्याचा. मीं पाटणकरास तेथच्या ओळखतों. माझी घरची जमीन आहे. व १।२ बिघे गणपतराव पाटण-कराची करतों. ते चिखल्याचे पाटणकराचे भाऊबंद. ते पनवेलीस अस-तात. आरोपी चिखल्यासच तिन्हाडास होता. ते चिखल्याचे पाटणकराकडे उतरले होते. बोरलीपासून चिखलें हद्दीला लागून आहे. बोरलीशिवाय पनवे-लीस व पळस्प्यास सभा भरली होती. मी पळस्प्यास व पनवेलीस सभेकरितां गेलों होतों. पळस्प्याच्या सभेंत काय झालें तें सांगतां येत नाहीं. नंतर किती दिव-

त्यांनीं बोरल्याची सभा झाली तें माहीत नाहीं. पनवेलच्या सभेंत अर्ज करा असें कांहीं झालें. तो ब्राह्मण कोण तें माहीत नाहीं. पनवेलीस सभा माणिकशहानें बोलविली होती. असें मला ठाऊक नाहीं. पळस्प्याची कोणी तें मला ठाऊक नाहीं. गळसुंद्याच्या सभेंत बोलीस जमण्यासंबंधानें ताकीद दिली होती. गुळसुंद्यास सभा बोर्लीच्या अगोदर किती दिवस भरली होती तें माहित नाहीं. त्याणें दारू पिऊं नका व मत्क्याबद्दल सावकार व तुह्मी समजुतीनें घ्या. मी एकदां मामलेदार कचेरींत गेलों होतों. मला दंड झाला नाहीं. कधींही. बोरलीच्या सभेंत ४।५ हजार लोक होते. विडीच्या अवकाशानें सभेला सुरवात झाली. नंतर आरोपी विडी ओढें-पर्यंत बोलले. नंतर जमिनीवर बसले. नंतर सभा फुटली. भक्ति म्हणजे आह्मांला फोडून सांगितलें. देवाचें नांव घ्यावें ह्मणजे तो तुह्मांला खायला देईल. चोरी करूं नये. याच्याशिवाय ते बोलल्याचें मला ठाऊक नाहीं. ह्या-शिवाय ते कांहीं बोलले असल्यास मीं ऐकलें नाहीं. मीं लागलींच दुस-ऱ्याकडच्या सभेस गेलों. एकी ह्मणजे दारू पिऊं नका असें फोडून सांगितलें. यापलीकडे मला ठाऊक नाहीं. मी जरा दिवस खालती फिरला होता तेव्हां सर्वांसह गेलों. बोरलीची सभा दुष्काळासंबंधानें होती. धारा पडूं नये ह्मणून अर्ज करा असें बोलणें चाललें होतें. याशिवाय दुसरें कांहीं नाहीं. त्या सभेंत एकादा शिपाई आला असल्यास मला ठाऊक नाहीं. माझ्या बाजूला माझ्या गांवातले लोक नव्हते. माझ्या जवळ कोण होतें हें मला सांगतां येत नाहीं. मीं तेथें विडी ओढली. तंबाकू मजजवळ होती. दुष्काळ आहे, अन्न कमी आहे असें बोलत होते. शिजवायला फाटी वगैरे नव्हती. वगैरे बोलणें झालें नाहीं. सभेच्या टोंकाला कोणी बोलत होता कीं नाहीं, यासंबंधानें मला ठाऊक नाहीं. मी आरोपीपासून कुसायेवढा लांब होतो. ( १०।१५ हात. ) ब्राह्मण जवळ बसले होते. हें नक्की ठाऊक नाहीं. ब्राह्मण होते व आगरीही होते. नांवें सांगतां येणार नाहींत.

त्यांना ओळखणार नाहीं. ते दुसऱ्या सभेंत गेले. त्य सभेला मी यांच्यापासून खांबाच्या ( ५ हात ) होतों. तेथें नवा बामन बोलला. सर० ला धान्यासंबंधानें अर्ज करूं, दुष्काळाचीं कामें काढूं वगैरे तेथें बामण बोलला. मी घरीं गेलों तेव्हां बत्ती लागली होती. मी तेथें चालत आलों. माझ्या बरोबर लोक ठाकूर वगैरे होते. मी कशाला जातों हें त्यांना ठाऊकच होतें. मी साक्षीला जातों हें मीं त्यांना सांगितलें. मला कोणीं विचारलें नाहीं. माझ्या बरोबर साक्षीदार नव्हते. दुसरे कुणबी सोबतीला माझ्या बरोबर होते. इतर साक्षीदार मला भेटले नाहींत. तूं काय साक्ष देणार हें त्यांनीं विचारलें नाहीं. पहिल्या दिवशीं पेणेस अंबेघराज-वळच्या कज्याच्या व कोल्हारास मी नव्हतों. तेथें ताडीबद्दल कोणींही बोलले नाहीं. ताडीच्या अर्जावर मीं सही केली आहे. पनवेलीस बोर्ल्या-च्या सभेनंतर पनवेलीस सभा भरली. किती दिवसांनीं तें समजत नाहीं.

( **फेर तपासणी** ) बोर्लीच्या सभेंत मला सगळेंच ऐकूं आलें असतें. बोर्लीच्या पूर्वीं मीं आरोपीला कधींही पाहिला नव्हता. ज्या वेळेला त्यांना धरलें त्यावेळेस ते आण्णांकडे होते, असें लोक ह्मणत व ह्मणूनच मीं ते चिखल्यास होते ह्मणून सांगितलें.

३ **धर्मा राघू ह्मात्रा**—प्रति० सांगतों—वय ५०, जात आगरी, धंदा शेत, रहाणार नेरे, मी बोर्लीच्या सभेस गेलों होतों. १॥-२ महिने झाले असतील. १२-१ वाजतां गेलों. जात आमची जमली होती. शेताचे मक्तेवाल्याचें चाललें होतें. आह्मी आपसांत बोलत होतों. मी आरोपीला ओळखतों. तो १२ वर तीन वाजतां आला. मला घड्याळ कळत नाहीं. २-३ वाजतां ह्मणजे सुमारें २ वाजतां. तेथें आरोपीनें एक कागद वाचला, व तुह्मी दारू पिऊं नका, दुष्काळ पडला आहे. दारू पिऊन तुमचीं पोटें कशीं भरतील ? मीं यांचें सर्व बोलणें ऐकलें. देवाचें स्मरण करा, प्रार्थना करा असेंही ते बोलले. यांचें बोलणें संपल्यावर मी चालता झालों. मी घरीं आलों. मीं तेथें कोणी शिपाई पाहिले नाहींत.

( उलट तपासणी )—नेरेपासून बोर्ली २-२। कोस आहे. सभा बोर्ल्यास आहे हें मला कोणीं सांगितलें त्याची मला याद नाहीं. मी नेऱ्याहून एकटाच गेलों. दुसरें गेलें असल्यास मला ठाऊक नाहीं. मी नेऱ्यास इनामदारांची जमीन लावतों. त्यांचें नांव गणू मोकाशी. मी पनवेल ता० तील इतर सभांस गेलों नाहीं. नेऱ्यापासून गुळसुंदे किती लांब तें ठाऊक नाहीं. बोर्लेंजवळ. वार ठाऊक नाहीं. घरून मी ११ च्या सुमारास निघालों. मला कोणी वाटेंत भेटलें नाहीं. ३।४ हजार लोक होते. माझ्या ओळखीचें कोणी नव्हतें; सभा कोणीं बोलाविली माहित नाहीं. व्यवस्था कोण करीत होता, हें माहित नाहीं. मी बाजूला होतों. आरोपी चांगले दिसत होते. मी आरोपीपासून शेगटाचे झाडाइतका लांब होतों (१०।१५ हात). सभेंत सावकार, पांढरपेशे होते. ते बोलत नव्हते. मक्त्याबद्दल सावकार व आम्ही बोलत होतों. कोण ठाऊक नाहीं. नक्की ओळखणार नाहीं. ते बसून बोलत. मी कोणाजवळ बोललों नाहीं. मी गेल्यावर किती वेळानें हे बोलले हें मला सांगतां येत नाहीं. दिवस जरा फिरला होता. दिवस जरा फिरला होता ह्मणून सांगितलें. कागद मोठ्यानें वाचीत होते. कागद वाचल्यानंतर मी गेलों. मी गेलों तेव्हां आरोपी उभे होते. मीं त्यांचें बोलणें दोन घटका ऐकलें. नंतर घरीं काम होतें ह्मणून मी गेलों. बोलणें संपलें नव्हतें. एकी शब्द मीं ऐकला. त्याचा अर्थ दारू पिऊं नका असा आहे. हा मी समजतों. मला कोणीं हा अर्थ समजविला नाहीं. आरोपितानें एकी शब्दाची फोड करून सांगितली. " फोड " काय हें समजत नाहीं. एकी ह्मणजे काय तें आरोपीनें सांगितलें. देवाला भजावें असेंही त्यानें सांगितलें. भक्ति शब्द मीं ऐकिला होता किंवा नाहीं हें खात्रीनें सांगतां येत नाहीं. आपणांस कशाकरितां बोलावलें, हें मीं कोणास विचारलें नाहीं. मी दिवे लागतांच गेलों. मी गणपत राघु पाटिल यास ओळखीत नाहीं. ' येथें पुष्कळ भेटले. तूं येथें कां आलास असें मला कोणीं विचारलें नाहीं. मला समान लागलें. तें कशाकरितां हें पाटलास

विचारलें. कज्याचें समान आहे. कज्जा बामणाचा आहे. समान पाटलानें वाचून दाखविलें नाहीं. साक्ष ब्राह्मणाचे तर्फेनें यावयाची हें कळलें होतें. साक्ष काय यावयाची हें ठरलें नव्हतें. पाटलानें व कोणींही गांवांत बोर्लीच्या सभेस गेल्यावर विचारलें नाहीं. सभेस गेलों होतों हें कोणास सांगितलें नाहीं.

( **फेर तपासणी** )—मी गेलों त्यावेळीं ते मुकेच उभे होते. त्याठिकाणापासून मला कांहीं ऐकूं येई, कांहीं नाहीं. ते साधारण ऐकूं येईसें बोलत होते. फार मोठ्यानें नाहीं व हलकें नाहीं. त्या सभेला नेऱ्याचे लोक गेलेले मीं पाहिलें नाहीं.

४ **विनायक बहिरो जोशी**—प्रति० सांगतों. वय ४५।४६, जात ब्राह्मण, धंदा शेतकी, राहणार चिखलें, मी बोर्लीच्या सभेला गेलों होतों. मला लोकांकडून कळलें. लोक चालले होते. त्यांना विचारलें व त्यांनीं सांगितलें. मी १२ नंतर गेलों. तेथें सुमारें १२॥ वाजतां गेलों. त्यावेळीं पुष्कळ लोक बसलेले होते. लोक ५।६ हजार असतील. कुणबी आपसांत बोलत होते. मीं आरोपीला पनवेलीस व चिखल्यास पाहिला. मी सभेस गेलों तेव्हां त्यांना पाहिलें नाहीं. १॥–२ तासांनीं पाहिलें. त्यांच्या हातांत **केसरी** पत्र होतें. तें त्यांनीं लोकांना वाचून दाखविलें. केनसाहेबाचें लेक्चर वाचून दाखविलें. आरोपी ह्मणाले कीं, दारू पिणें हें वाईट आहे. यंदां दुष्काळांत दारूला पैसा खर्ची कराल तर पोटाला काय खाल ? त्यांनीं पहिल्यांना व्याख्यान वाचलें व कुळंब्यास नीट समजावून सांगितलें. मी बोलणें संपेपर्यंत होतों. ६ वाजेपर्यंत तेथें होतों. यांचें बोलणें संपल्यावर कुळंबी बसले होते व आपसांत बोलत होते. आपण अर्ज करावा. आपणांस सूट मिळाली तर मक्तेदारास मिळेल. आपट्यांच्या मागून सुमारें ५ वाजतां साठे बोलले. पुष्कळ वेळानें त्यांचें बोलणें मीं ऐकिलें. आणखी कोणीं व्याख्यान दिलें नाहीं. आपटे एकदांच बोलले.

(**उलट तपासणी** )—बोर्लीशिवाय चिखल्यास एकदां लोक जमले होते.

पळस्पाच्या सभेचें ऐकिलें होतें. पनवेल व गुळसुंदे यांच्या सभांविषयीं ऐकिलें नाहीं. मी दुसऱ्याचें शेत करीत नाहीं. मीं ह्यांना आमच्या घरावरून जातांना पाहिलें. एकटे होते. तें कोणाकडे उतरले होते हें माहित नाहीं. चिखल्याच्या सभेंत ह्यांना पाहिलें. बोलणें ऐकिलें नाहीं. मी गेलों व परत आलों. काम होतें म्हणून मी परत गेलों. मला बोलीस सभा आहे असें कोणीं सांगितलें. त्याचें नांव सांगतां येत नाहीं. मी भिंतीयेवढा लांब होतों.(२–३) येवढा लांब होतों. माझ्या बाजूस कोण होतें हें सांगतां येत नाहीं. मी तेथें कोणाशीं बोललों नाहीं. अगदीं गप्प होतों. कुणबी लोक आपसांत बोलत होते. सावकारापाशीं त्यांचें बोलणें झालें कीं काय मला ठाऊक नाहीं. दुष्काळ आहे, अन्न नाहीं हें बोलले. फाळ्यासंबंधानें मीं ऐकिलें नाहीं. पोटांत आग पडली आहे, असें बोलतांना सुद्धां मीं ऐकिलें नाहीं. लोकांनीं सांगितलें ह्मणून त्याच्या हातांत केसरी होता, हें सांगतों. कोणीं सांगितलें तें ठाऊक नाहीं. मीं पनवेलीस पिलोबा डोंगरे यांच्या दुकानांत आरोपीस पाहिलें. रामभाऊ व अंतोबा दुकानावर होते. सभा कशाकरितां आहे हें मला चिखल्यास कळलें नव्हतें. कोणीं सांगितलें हेंही ठाऊक नाहीं. अध्यक्षस्थान याचा अर्थ ठाऊक नाहीं. सभेचा पुढारी मला ठाऊक नाहीं. चिखल्याच्याही नाहीं. मीं फक्त ऐकलें. माझ्याबरोबर कोणीही नव्हतें. मी चिखल्याच्या पाटणकरास ओळखतों. आण्णा पाटणकराच्या घरापासून माझें घर १५० कदम अंदाजें होईल. परवां समन्सावर सही करण्यास त्याकडे गेलों होतों. शिपायानें बोलावलें ह्मणून गेलों, त्यावेळीं तेथें विष्णु गोविंद पाटणकर होते. त्यांनीं मला तेथें कांहीं विचारलें नाहीं. मला समान कां असें मीं कोणास विचारलें नाहीं किंवा मला कोणीं विचारिलें नाहीं. माझ्याबरोबर दुसरे लोक होते. मी गाडींत शिरढोणावरून आलों. मऱ्या पांडु गडकरी, नाऱ्या धावा पाटील व गणपत राम पाटील व केरोभट भेहरे हे गाडींत होते. आणखी एक होता, त्याचें नांव आठवत नाहीं. गणपत्यानें मला कां जातां असें विचारिलें.

समान लागलें ह्मणून जातों, असें मीं सांगितलें. कसली साक्ष हें त्यानें विचारिलें नाहीं. त्यानेंही मला साक्षीला जायचें आहे असें सांगितलें. आणखी कांहीं झालें नाहीं. आह्मी एकत्र निघालों. काल रात्रीं आठ वाजतां निघालों. व उजाडण्यापूर्वीं तासभर आलों. आह्मी एकेच ठिकाणीं उतरलों. ज्याची सोय जिकडे झाली तिकडे तो गेला. कोर्टांत बरोबर आलों नाहीं. परंतु एकाच जागीं बसलों. तेथें साक्षींपैकीं कुणबी आहेत. त्यांत मालडुंगचे आहेत. हें त्यांनीं सांगितलें. आपट्यांच्या खटल्यांत साक्षीला आलों आहें, असें सांगितलें. एकी आणि भक्तीविषयीं बोलले. एकी ह्मणजे एकत्र व्हावें. एकाद्याकरितां झटावें असें मीं ऐकलें नाहीं. सर्वांनीं मिळून पिऊं नये म्हणजे एकी करणें असें त्यांनीं सांगितलें. यापुढें बोलले असल्यास मीं ऐकिलें नाहीं. पुढें पुढें मी हिंडत होतों. सुमारें ३–४ घटकांपर्यंत बोलणें झाल्यावर. ह्यानंतर बोलले असल्यास माझे लक्ष्यांत नाहीं. आरोपी या वेळांत बोलले कीं काय हें मला सांगतां येणार नाहीं. मी फार लांब गेलों नव्हतों. ५–२५ कदमांवर पुढें होतों. सभेचा वार, तिथि किंवा तारिख ठाऊक नाहीं. बोरलीच्या सभेंत मीं जंगलासंबंधानें शब्दही ऐकला नाहीं. फाट्यासंबंधानें बोलतांना कुळंबी लोकांना मीं ऐकलें नाहीं. अन्न शिजवून कसें खायचें यासंबंधानें कोणी बोलले नाहीं. ताडीबद्दल कांहीं ऐकलें नाहीं. साठे माळावर आल्यानंतर आरोपी यास भेटले कीं नाहीं हें ठाऊक नाहीं. मी यांना साठेजवळ बोलतांना पाहिलें नाहीं. सरकाराला अर्ज करण्याबद्दल आपट्यानें सांगितलें असल्यास ऐकलें नाहीं. आरोपीला बोलायाला अवकाश होता. आपट्यांच्या जवळ कोण होतें हें मला माहित नाहीं. दांडेकर या नांवाच्या एकाद्याला बोलतांना मीं ऐकलें नाहीं. मी दांडेकरास ओळखतों. ५–६ जण भाऊ. सर्वजण चिखल्यास येतात.

( फेर तपासणी ) आपट्यांचें बोलणें संपून ते स्तब्ध बसल्यावर मी हिंडूं लागलों. मीं आपट्याचें बोलणें सर्व ऐकलें. लोक आपसांत

नंतर बोलत होते रात्रीं निघालों असल्यामुळें, कांहीं वेळ बोलत होतों. कांहीं निजलों होतों. मी हिंडत असतां सभेचें काम चाललें नव्हतें. ह्मणूनच मी हिंडायाला लागलों.

**कोर्टाच्या सवालावरून**— सरकाराला अर्ज पाठविण्याबद्दल आरोपी कांहीं बोलला नाहीं. धारा न भरण्याबद्दलही तो बोलला नाहीं.

**५ विश्वनाथ गणेश आपटे**—प्रतिज्ञेवर सांगतों. वय ३०, जात ब्राह्मण, धंदा लिहिण्याचा, राहणार शिरढोण. मी बोरलीस १२ वाजतां दुपारीं सभेस गेलों होतों. त्यावेळीं लोक ५।६ हजार जमले होते. कांहीं चाललें नव्हतें. लोक ठिकठिकाणीं बसले होते. मी आरोपीस ओळखतों. ते १२॥ वाजतां गेलेले मीं पाहिलें. केनसाहेबांचें दारूविषयींचें व्याख्यान वर्तमानपत्रांतून वाचून दाखविलें. नंतर एकी आणि भक्ति या विषयांवर ते कांहीं बोलले. दारू पिण्यापासून तोटे आहेत. ह्मणून दारू न पिण्याविषयीं एक मत करा अशा प्रकारची एकी करा. नाना प्रकारचे प्रसंग आपणांवर आलेले आहेत. दुष्काळ पडला आहे. मुंबईस रोग आला आहे. तो कांहीं दिवसांनीं आपल्याकडे पसरेल. तर हा प्रसंग न गुजरण्याबद्दल ईश्वराची प्रार्थना करा. ह्मणजे तो तुमचें दुःख निवारण करील. याशिवाय कांहीं बोलले नाहीं. सभेंत दांडगाई वगैरे कांहीं झाली नाहीं. लोकांनीं त्यांचें बोलणें शांतपणें ऐकलें. मी शेवटपर्यंत सभेंत होतों. आपट्यांनें भाषण संपल्यानंतर कांहीं वेळानें साठे आले. पाऊण तासानें आले. त्यांनीं फॅमिन् रिलीफ्कोड समजावून दिलें. नंतर आपटे पुन्हां बोलले नाहींत. आपट्यांचें भाषण चाललें असतां तेथें शिपाई नव्हते. पळस्प्याच्या सभेला मी गेलों नव्हतों. तीविषयीं नुसतें ऐकलें आहे. जंगल ॲक्टाचें कलम ३१ बसण्यास ज्या हरकती असतील, त्यांसंबंधानें ३ महिन्यांचे आंत अर्ज करावा असा एक जाहिरनामा लागला होता. त्याप्रमाणें अर्ज झाला असें ऐकिवांत आहे. मीं तो जाहिरनामा आमचे गावीं लागलेला पाहिला आहे. तो हाच होय

( दाखविला ). बोरलीनंतर पनवेलीस सभा झाली. तेथें मी गेलों होतों. ती कोणीं भरली हें मला ठाऊक नाहीं. पण त्यांत माणिकशहा जहांगिरशहा होते. त्यांनीं भाषण केलें. मी घरीं संध्याकाळीं सभेचें काम आटोपल्यावर गेलों.

( **उलट तपासणी** )—बोरलीशिवाय चिखल्याच्या सभेची माहिती नाहीं. बोरली शिरढोणापासून ३ मैल आहे. पळस्प्याची सभा कोणीं बोलावली हें माहित नाहीं. बोरलीची कोणीं बोलावली हें माहित नाहीं. आपोआप होती कीं काय मला माहित नाहीं. लोक चालले म्हणून मी गेलों. सकाळीं कळलें. लोक बोलत. नांव सांगतां येणार नाहीं. मी आरोपितापासून १०-१५ कदमांवर होतों. माझ्या बरोबर, वासुदेवराव भाटवडेकर, वामनराव लागू वगैरे माझ्या गांवचे होते. मी एकाच जागीं नव्हतों. गर्दीप्रमाणें मागें पुढें होत असें. मी कोणाशींही ५-६ तासांत बोललों नाहीं. आठवत नाहीं. आरोपी बोलला तें आठवतें. मी काल संध्याकाळीं येथें आलों. मी एकटाच आलों. माझा गडी गाडी हाकलीत होता. माझी व तिसऱ्या खुर्चीवर बसलेल्या मनुष्याची ओळख नाहीं ( वासुदेव गणेश जोशी ). हे कुठचे तें मला माहित नाहीं. हा जाहिरनामा पाटलाचे घराजवळ झाडाला ४-५ महिन्यांपूर्वी लागला होता. झाडाला लागलेला हा नाहीं. तो मला शब्दशः आठवतो. आरोपीजवळ सभेंत कोण होता हें मला माहित नाहीं. माझ्या जवळ ब्राह्मण मंडळी असल्याचें मला स्मरत नाहीं. मीं तेथें पोलिस शिपाई पाहिले नाहींत. आतां मी सुटीचे वेळांत पाणी पिण्यास गेलों होतों. मी गेल्यानंतर आपटे -॥- -।॥- तासानें आले व नंतर १० मिनिटानें बोलणें सुरू झालें. १॥ तास झाले. मीं सर्व ऐकलें. मागें सांगितलेल्याच विषयांवर ते बोलले. त्याचा तो साधारण आशय आहे. मला तें सगळें सांगतां येणार नाहीं. त्यांनीं पत्र वाचलें. व थोडें बोलले. याशिवाय कांहीं बोलले नाहीं. सभा कशाकरितां बोलाविली हें माहित नाहीं. अर्ज मीं पाहिला

नाहीं. माझी जमीन आहे. कलेक्टर साहेबांकडे पाठविलेल्या अर्जाविषयीं मीं ऐकलें आहे. त्यावर माझी सही नाहीं. नंतर साठे बोरल्याच्या सभेंत आले. बरोबर पुष्कळ मंडळी होती. ओळखीची होती. आपटे बोरलीच्या सभेंत कोठून आले तें माहित नाहीं. ते कुठें गेले तें माहित नाहीं. मी दिवे लागतांना घरीं गेलों. त्या ठिकाणीं गर्दी फार झाली, ह्मणून सभा दुसऱ्या माळावर जाऊन बसली. मीही तेथें गेलों. जंगलसंबंधें अर्ज सरकाराकडे झाला आहे, असें मीं ऐकलें नाहीं. त्या सभेंत जंगलाबद्दल बोलणें झालें. दुष्काळ पडला आहे. पोटें भरत नाहींत, वगैरे कुळंबी बोलत होते.

**कोर्टाच्या सवालावरून**—आपट्यांचा व माझा कोणताही नातेसंबंध नाहीं.

६ **धावजी धर्मा**—प्रतिज्ञेवर सांगतों. वय २०।२५, जात ठाकूर, धंदा शेतकाम, राहणार मालडुंगे. मी बोरलीच्या सभेला गेलों होतों. २ एक महिने झाले असतील. १२ वर दोन वाजतां ह्मणजे दिवस फिरतांना मी तेथें गेलों. त्यावेळीं लोक बसले होते. मी आरोपीला ओळखतों. मी गेलों त्यावेळीं, काळ पडला आहे. ह्मणून दारू खाऊं नये, दारू खाल्ल्यापासून तुमची नुकसानी होईल. तुह्मांला पैसा अडका नाहीं असें तो बोलला. आणखीं माहित नाहीं. मी दिवस उतरे तोंपर्यंत तेथें होतों. नंतर घरीं आलों. मी जंगलाच्या कडेला असतों. आमच्या गांवाला ताड नाहींत. माझे ताड किंवा माड नाहींत. चोखळाची परवानगी असल्यास चोखळावें, नाहींतर नाहीं. चोखळणें ह्मणजे काय मला ठाऊक आहे. मी कधीं माडावर चढत नाहीं.

**( उलट तपासणी )**—मालडुंग्यापासून बोरली ४ कोस होईल. मी दुसऱ्या कोणत्याही सभेला आतांपर्यंत गेलों नाहीं. परवां मी कोठें होतों तें आठवत नाहीं. त्याचे मागील दिवशीं घरींच होतों. मला कोणी भेटलें नाहीं. समान लागलें ह्मणून येथें आलों. समान बापू वामनानें वाचून

दाखविलें. माझें नांव सरकारांत कोणीं सांगितलें तें मला माहित नाहीं. आरोपीस सभेपूर्वी किंवा नंतर पाहिलें नाहीं. सभेंत त्यांना एक घटका पाहिलें. मी सभेंत लांब उभा होतों. मी त्या शेकटाच्याही पलीकडे होतों. दोनशें पावलांवर होतों. मालडुंग्याहून मी एकटाच गेलों होतों. सभेचा कडका मला लागावा ह्मणून मी गेलों. माझ्याजवळ ओळखीचा कोणीही नव्हता. मालडुंग्याच्या हद्दीला भेरली माड आहेत. एक दोन महिन्यांत तीं पाहिलीं. चोखळलेलीं मला आढळलीं नाहींत. आरोपीशिवाय सभेंत कोणीही बोलला नाहीं. हा १-२ वेळ बोलल्यानंतर मी गेलों. पहिल्यानें कागद मोठ्यानें वाचला. दारू पिऊं नये. दुष्काळ आहे वगैरे आरोपी वाचून दाखवी. नुसतें कागदांतील-च सांगितलें. तोंडीं सांगितलें नाहीं. कागद सुमारें हातभर होता. यंदां मीं भाऊ मियाची जमीन लावली. दुसरी कोणाची नाहीं. दर वर्षी त्याचीच लावतों. मी येथें पायीं आलों. मी येथें आल्यावर माझें कोणाशीं बोलणें झालें नाहीं. उगवतच्या बाजूच्या नळावर भाकरी खाऊन मी बसलों. १२ वाजतां साक्षीदार जमले. त्यांनीं मला कांहीं विचारलें नाहीं. मला अजूनपर्यंत दंड किंवा शिक्षा झाली नाहीं.

( **फेर तपासणी** )—दोन वेळ बोलला ह्मणजे दोन सकून (शब्द) बोलला. थोडथोडें ऐकूं येत होतें. इथून भिंतीपर्यंत किती कदम होतील तें सांगतां येणार नाहीं.

**कोर्टाच्या सवालावरून**—काळ पडला आहे ह्मणून मोलमजुरी केली पाहिजे. यंदां शेत कांपलें जें गेलें तें टाकून दिलें. यंदां पीक कांपल्यानंतर मी मोलमजुरी करतों; फांटीं नेतों. अशी मोलमजुरी करतों.

शिवाय आणखी खालील इसमांच्या पाच मुद्यावर साक्षी झाल्या. १ बाळू पदू वाघ. २ भिवा नागू पाटील. ३ राघू लक्ष्मण पाटील. ४ लक्ष्मण पांडु पाटील. ५ विष्णु विठ्ठल शेट. ६ रामचंद्र मोरे शेट. ७ धर्मा धोंडू पाटील. ८ कमळ्या हिरू चौधरी ९ लक्ष्मुमण मल्लाळ वैशंपायन व साक्षी-

चे—साक्षी मि. बोडस यांनीं रद्द केले. ठरल्याप्रमाणें ३ पोलिसांस परत बोलावण्याविषयीं, मि. बोडस यांनीं आधार दाखविले. परंतु, मि. ब्रुक् यांनीं तें नाकारून मि. बोडस यांच्या या आशयाच्या अर्जास उत्तरही दिलें आहे. काल रोजीं डिफेन्स झाला. सोमवार रोजीं ५ वाजतां साहेब बहाद्दुर निकाल सांगणार आहेत.

## सुधाकर पत्रांतील उतारा.

मि. **आपटे** यांजवरील खटला ता. १० पासून पेणेस सुरू झाला. हा प्रथम वावे गांवीं चालावयाचें ठरलें असून, तो पेण मामलेदार ऑफिसांत आयत्या वेळीं चालला. या ठिकाणीं आसपासच्या कंपौंडाबाहेर पोलिसचा जय्यत पहारा होता. व लोकांस प्रतिबंध केलेला होता. त्यावेळीं खटला ऐकण्याकरितां लांबलांबून आलेल्या हजारों लोकांची अगदींच निराशा झाली. अशा तऱ्हेनें पोलिसच्या संत्री पहाऱ्याच्या संरक्षणाखालीं न्याय करण्याची पाळी यावी, ही मोठ्या दुर्भाग्याची गोष्ट होय. या खटल्यांतील सरकारी वकील मि. जमशेटजी यांणीं आपलें मनाचा कोतेपणा व आपला फाजील उतावळी स्वभाव दाखविण्याची अगदींच कमाल करून सोडली होती. एक सभ्य गृहस्थ मध्यें पाणी पिण्यास जात असतां त्याजसंबंधानें बाष्कळपणाचा संशय काढून आपणास फजीत मात्र करून घेतलें. तसेंच खटला ऐकण्याकरितां गेलेल्या १।२ सभ्य गृहस्थांसंबंधानेंही त्यांणीं साक्षीदारांस भलभलते प्रश्न केले व आपल्या मनाची थोरवी जगास दाखविली. आमचे हे तरुण होतकरू वकीलसाहेब पुढें असलें सभ्यपणास थाऱ्यावर बसविणारें वर्तन सोडतील तर त्यांची किंमत कमी होईल अशी त्यांनीं भीति बाळगण्याचें कारण नाहीं. आमच्या सूचनेबद्दल आमचे अनुभवी वकीलसाहेब प्रेमभावानें विचार करतील अशी आह्मी आशा बाळगतों.

'मी असें ह्मणतों कीं—सरकारतर्फे जो माझ्यावर पुरावा करण्यांत आला तो कुचकामाचा होता. तो असा:—

**नंबर ६ सखाराम विठोजी**—प्रति० सांगतों— पोलिसकडे माझा जबाब झाला. मीं तो जबाब दिला नाहीं. " पोलिसांनीं धमकावलें; सबब जिवाच्या आशेनें त्यावर सही केली. "

**नंबर ७ विठ्या राघनाक**—प्र० सांगतों. पोलिसनें शनवारची रात्र पहाऱ्यांत ठेवलें, व " आह्मीं सांगतों त्याप्रमाणें सांग " ह्मणत. मी रात्रभर उपाशी होतों. मी नको ह्मणत असतां जुलमानें माझी सही केली.

**नंबर ८ ज्ञाना नागू पाटील**—प्रति० सांगतों. पोलिस इन्स्पेक्टरनें सांगड्याच्या पाटलास ४ थापडा मारल्या; ह्मणून मीं भीतीनें सही केली. त्याला व मला बरोबरच नेलें होतें. मला धमकी दिली. जबाब वाचून दाखविला नाहीं. त्या प्रसंगाची आठवण झाली ह्मणजे, अजून माझें अंग थरारतें.

सदरहु तिन्ही साक्षीदार पोलिसच्या तडाक्यांत सांपडले होते. पोलिसांनीं उद्दामपणानें, आमचेवर पुरावा करण्याकरितां, वरील ३ साक्षिदारांवर आमचे विरुद्ध साक्ष देणेंविषयीं जुलूम केला, मारलें व पहाऱ्यांतही ठेवलें; परंतु साक्षिदारांनीं पो. इं. वगैरे पोलिसला न जुमानतां कोर्टापुढें खरें तेंच सांगितलें. लोकांवर जुलूम, मारहाण, पहाऱ्यांत ठेवणें, धमकावणें व खोटें बोलण्यास दुसऱ्याला प्रवृत्त करणें वगैरे वाईट गोष्टी करण्याकरितां सरकारनें पोलिसखातें ठेवलें नसावें असें मला वाटतें. लबाड, लुच्चे, चोर वगैरे अपराधी पकडण्याकरितां व त्याबद्दल खरा पुरावा मिळविण्याकरितां पोलिसखातें नेमलें असावें. असें असतां आमचे खटल्यांत तीन पोलिस व एक चीफ् कॉन्स्टेबल मिळून चार पोलिसांनीं अनीतीचें, उद्दामपणाचें व अविचाराचें वर्तन केलें. शिवाय, नंबर ९ या पोलिसानें आपले जबानींत बरेच फाजील शब्द उच्चारले आहेत. पोलिसच्या जबान्या साधारण मराठी वाचतां येणाऱ्यानें जर वाचल्या तर पोलिसाचें बेपर्वाईपणाचें वर्तन सहज समजून येईल. असो. पोलिसाचे नादाला आपण न लागतां माजिस्ट्रेटचे जजमेंटकडे वळूं.

## मराठा २१।२।१८९७, उतारा.

### म्याजिस्ट्रेटचा निकाल. नंबर ११.

**गोविंद विनायक आपटे** यांजवर असा चार्ज आहे कीं, त्यानें १८९६ चे डिसेंबरचे १८ वें तारखेस बोर्ली या गांवीं सुमारें ३००० लोकांचे सभेंत भाषण करून सरकारी अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय ताडी काढण्यास, जंगल तोडण्यास व सदरहु कृत्यांस हरकत करणाऱ्या अधिकाऱ्यांस मारण्यास व तसेंच अधिकाऱ्यांनीं पकडून ठेवलेल्या इसमास सोडवून घेण्यास उत्तेजन दिलें. बोर्लीगांवीं कांहीं भाषण केलें हें आरोपीस कबूल आहे. परंतु, त्यांतील भाषा काय होती व ती पिनलकोडच्या ११७ कलमाखालीं येते अगर कसें एवढाच प्रश्न आहे. बोर्ली येथील भाषण तासभर झालें. तेव्हां त्यासंबंधानें कोणासही सारांश सांगण्यापलीकडे कांहीं करतां येणार नाहीं. ह्मणून भाषणांतील प्रत्यक्ष शब्द कळणें कठीण असून त्यांतील तात्पर्यावरच भागवून घेतलें पाहिजे. हें सांगण्याचें कारण इतकेंच कीं, आरोपीचे वकाल मि० बोडस यांनीं जसेच्या तसे शब्द पुराव्यांत नाहींत अशी हरकत घेतलेली आहे.

पोलिस व इतर साक्षीदारांचे जबानीवरून असें दिसतें कीं, जंगलखात्याविरुद्ध तक्रारीसंबंधी कलेक्टरकडे एक अर्ज गेला होता. परंतु, त्याचें उत्तर न आल्यामुळें उगीच जास्त भानगडींत न पडतां लोकांनीं ताडी काढण्यास व जंगल तोडण्यास आपला आपल्यासच अधिकार घ्यावा व प्रतिबंध करतील त्यांस अटक करावी व सारा देऊं नये आणि दारू पिण्याचें बंद करावें. आरोपीतर्फे असें ह्मणणें आहे कीं, **आपटे** यांच्या भाषणांत **मद्यपाननिषेध, धर्म व एकी** यांशिवाय विषय नव्हता. फिर्यादीतर्फे एक जमादार, दोन शिपाई, एक कोंबडीविक्या आणि एक मेवेकरी असे साक्षीदार आहेत व आरोपीतर्फे ब्राह्मण, सोनार, ठाकूर, अग्री वगैरे ३८ असामी आहेत. आरोपीचे डायरीवरून त्यास पकडण्यापूर्वी एक महिनाभर पेणपनवेलीकडे भटकत

होता असें दिसतें व त्याचा हेतु लोकांस दुष्काळांतील सवलती सरकाराकडून बळजबरीनें मिळवून देण्याचा असावा असें दिसतें. आरोपी हा मुंबईचा माणूस आहे; तथापि तो चिखले वगैरे गांवच्या ब्राह्मणांशीं मिलाफी होऊन उद्योग करीत असावा असें दिसतें. बोर्ली वगैरे सर्व ठिकाणच्या लोकांनीं त्याची बाजू उचललेली आहे व हें या कोर्टाभोंवतीं जमणाऱ्या गर्दीवरून दिसून येईल. अशा स्थितींत पोलिसांची साक्ष अधिक भरंवशालायक मानली पाहिजे. कारण, आपट्यांविरुद्ध कारणाशिवाय त्यांनीं कां उठावें ? शिवाय, तुकाराम दादा मेवेकरी हा पोलिसासारखीच जबानी देत आहे. तो आरोपीस ओळखूं शकत नाहीं. तथापि, तो सांगतो ती भाषा **आपटे** हा जें बोलला असें पोलिस ह्मणतात त्याशीं चांगली मिळते व प्रथम बराच वेळ सभेंत **आपटे** हा एकटाच वक्ता होता. कोंबडीविक्या व त्याचा मालक यांच्या जबानींत फरक आहे, यास्तव त्या बाजूस ठेवल्या तरी शिवाय चार साक्षीदार आहेत. व उलट तपासणींत त्यांचा पुरावा शाबूत राहिला आहे. पुराव्यांत कित्येक कागदही दाखल आहेत. पैकीं एका अर्जांत आठ दिवसांचे आंत उत्तर न मिळाल्यास आपण ताडी काढावयास लागूं असें लोकांनीं लिहिलें आहे. **आपट्यांचे** रोजनिशींत हा अर्ज रजिस्टर केल्याच्या पावतीचा उल्लेख आहे. या उल्लेखावरून आपट्यानेंच जाऊन अर्ज रजिस्टर केला असें मानतां येत नाहीं. परंतु, हा मुद्दा फारसा महत्त्वाचा नाहीं. तलाट्याचा एक रिपोर्टही पुराव्यांत आहे. तो सभेचे दुसरेच दिवशीं केलेला असल्यानें आपट्याचे भाषणाचा अर्थ लोक काय समजलें हें त्यावरून कळणार आहे. एक मराठा व महार साक्षीदार यांनीं पोलिसपुढें आपल्या दिलेल्या जबान्या नाकबूल केल्या. सबब त्या या खटल्यांत त्यांचे विरुद्ध ह्मणून दाखल केल्या आहेत. सरकारतर्फे वकील मि० **बामनजी** यानें मूर्खपणानें स्वतः साक्षीदार होऊन सदरहू महारास आरोपीतर्फे धमकी देण्यांत आली आहे असें सांगितलें आहे व तें खरें असावें. आरोपीचें

ह्मणणें असें कीं, केसरीतील मद्यपाननिषेधावरचें केन यांचें भाषण आधारभूत घेऊन त्यांवर व धर्म व एकी या विषयांवर आपण भाषण केलें. परंतु, हा फाजील युक्तिवादपणाचा प्रकार दिसतो. कारण, फक्त नीतिशास्त्राच्या मूल तत्त्वावर व्याख्यान ऐकण्यास इतके लोक जमले होते असें ह्मणतां येणार नाहीं. हेंच खास. आरोपीतर्फेचा पुरावा बनावट आहे असें ह्मणणें शोभेल; पण खोटा खटला करण्यांत पोलिसचें काय हित आहे? या कारणास्तव कलम ११७ यांत सांगितलेला गुन्हा आरोपीनें केला असें मी शाबीत धरतों. ११७ यांतील कित्येक शब्दांसंबंधानें आरोपीतर्फे कित्येक तक्रारी करण्यांत आल्या आहेत. 'ताड लावणें' याचा अर्थ ताडी काढणें असाच होतो. 'जंगल तोडा' हे शब्द जंगलच्या आक्टाच्या ३१ साव्या कलमास अनुलक्षून आहेत असे सभेंत पास झालेल्या अर्जावरून दिसतें. ह्मणून जंगल याचा अर्थ (Protected) रान असाच केला पाहिजे. असें आरोपीतर्फे ह्मणणें आहे. परंतु, आरोपीच्या भाषेवरून पाहतां जंगल याचा अर्थ रिझर्व्ह फॉरेस्ट (Reserve Forest)असाच घेतला पाहिजे. आरोपीनें दिलेल्या चिथावणीवरून कोणकोणते गुन्हे लोकांचे हातून घडून येण्याचा संभव होता हें सर्व पिनलकोड धुंडाळून काढून सांगत बसण्याचें कारण नाहीं. परंतु, त्यानें चिथावणी केली एवढाच गुन्हा होऊं शकतो. आरोपीच्या भाषणामुळें कांहीं ताडांपासून ताडी लोकांनीं काढल्याचा पुरावा एका अपकारी इन्स्पेक्टराकडून करणेंत आला आहे. परंतु, तो भरपुर नाहीं व लक्ष्यांत घेण्याचेंहीं कारण नाहीं. आरोपीसारख्या सुशिक्षित मनुष्यानें असला जबर गुन्हा केला त्यांत त्याचे स्वतःचा कांहीं फायदा नसेल, परंतु तो दुसरे कोणाचे तरीं हातांत असून त्यांच्या चालनेनें या गोष्टी करीत असावा, इ० गोष्टी लक्ष्यांत घेऊन कोर्टाचा असा हुकूम होत आहे कीं, आपटे यानें एक वर्षपर्यंत साधी

कैद भोगावी व २०० रु. दंड द्यावा व हा दंड न दिल्यास त्याबद्दल तीन महिन्यांची साधी सजा भोगावी.

( Sd ) H. O. Brooke
Magistrate F. C.

## पेण, सुधाकर, ता० २०।२।१८९७.

**धरणीकंप**—यंदां आमच्या भूमातेस फारच भार झाला आहे असें दिसतें. याचा परिणाम कसा काय होतो याबद्दल लोक सचिंत आहेत. सोमवारीं, मंगळवारीं व बुधवारीं याप्रमाणें तिन्ही दिवस धरणीकंपाचे धक्के बसले. मि. **आपटे** यांजवरील खटल्याचा असमाधानकारक निकाल सोमवारीं संध्याकाळींच झाला असून नंतर लागोपाट तिन्ही दिवस हे धक्के बसले यामुळें लोक विस्मयचाकित झाले आहेत.

मराठा २१।२।१८९७. उतारा.

## कुलाबा प्रॉसिक्यूशन डिफेन्स.

**गोविंद विनायक आपटे** याजविरुद्ध खटल्याची चौकशी, फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेट ब्रुक यांचे पुढे १०।२।१८९७ च्या तारखेस पेण येथें फिरून सुरू झाली. अलिबाग येथील जमशेटजी वकील प्रॉसिक्यूशनतर्फे होते व आरोपीतर्फे हायकोर्ट वकील बोडस व पनवेल येथील घारपुरे हे काम चालवीत होते. खटल्याची सुरवात दुपारीं होऊन तो संध्याकाळीं ६-३० पर्यंत चालला होता. पोलिस इन्स्पेक्टर हे प्रासिक्यूशनच्या मदतीस होते व पोलिस सुपरिंटेंडेन्ट हे खटल्याच्या चौकशीचे वेळीं हजर होते. लोक पुष्कळ जमले होते. पण त्यांना, पोलिसांनीं कोर्टाचे हद्दींत येऊं दिलें नाहीं. आरोपीतर्फे सहा साक्षीदारांच्या जबान्या व उलट तपासण्या झाल्या. आरोपीनें फिर्यादींत लिहिलेले शब्द मुळींच उच्चारले नाहींत. असें सर्व साक्षिदारांनीं सांगितलें. हकीगत खालीं लिहिल्याप्रमाणें. १८ डिसेंबर रोजीं सुमारें १२ वाजतां ४ हजारांपासून

८ हजारांपर्यंत सर्व जातींचे लोक बोर्ली येथें आपसामध्यें व सावकारा-जवळ साऱ्याची तहकुबी व इतर गोष्टी यांजबद्दल विचार करण्यास जमले होते. ते आपआपसांत बोलत असतांना एक ब्राह्मणाचा **आपटे** या नांवाचा मुलगा उभा राहून त्यानें केन साहेबाचें '**मद्यपाननिषेध** ' या विषयाच्या भाषणांतील सारांश मराठींत वाचून दाखविला. त्याचें वाचन संपल्यावर लोक जवळच्या जागेकडे प्रोफेसर साठे यांची वाट पाहण्याकरितां गले. प्रोफेसरसाहेब हे फॉमिनूकोड या विषयावर संध्याकाळपर्यंत बोलत होते.

**आपटे** हें ' जंगल ' व ' ताडी ' या विषयावर मुळींच बोलले नाहींत, असें लोक ह्मणाले. गुरुवारीं सकाळीं ८ वाजतां खटल्यास फिरून सुरवात होऊन आरोपीतर्फे आणखी चार साक्षीदारांच्या जबान्या सुमारें ११ वाजेपर्यंत झाल्या. १२॥ वाजतां कोर्टाचें कामास फिरून सुरवात झाल्यावर आरोपीतर्फे वकील बोडस यांनीं प्रासिक्यूशनतर्फेचे साक्षीदार यांची उलट तपासणी करण्याकरितां त्यांना समन्सें काढण्या-बद्दल अर्ज दिला. त्यांच्या पहिल्या जबानीनंतर महत्त्वाचा पुरावा झाला होता. या कारणानें आरोपीस त्या साक्षीदारांची उलट तपासणी घेण्यास हक्क आहे. या अर्जास समाधानकारक कारणें नाहींत ह्मणून मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं तो नाकारला. नंतर आणखी ५ साक्षीदार आरोपीतर्फे झाले. व बाकीचे साक्षीदार आरोपीचे वकीलांनीं रद्द केले. शुक्रवारीं दुपारीं १ वाजतां कोर्ट फिरून भरलें. व आरोपीतर्फे वकील बोडस यांनीं कोर्टास भाषण केलें. तें भाषण ५-३० पर्यंत चाललें. त्यांनीं आरंभीं ह्मटलें कीं, कोर्टापुढें नेहमीं जे खटले येतात त्यांहून अनेक कारणांनीं हा खटला निराळा व विशेष स्वरूपाचा आहे. कांहीं विशेष कारणांनीं ह्या खटल्यास सार्वजनिक महत्त्व आलें आहे. ह्मणून हें अवश्य आहे कीं, कोर्टानीं कोणत्याही बाजूकडे मनाचा कल पक्षपातानें वळवूं नये; परंतु कोर्टापुढें जो पुरावा येईल त्याकडेच फक्त लक्ष्य ठेवावें. आरोपीवरील चार्ज ठेवलेला गुन्हा फार भयंकर स्वरूपाचा आहे.

एका अर्थी गुन्हा करण्यास उत्तेजन देणें हें त्या गुन्ह्यापेक्षां फार वाईट असतें. मूळ गुन्हा झाल्यापासून जे परिणाम होतात ते मर्यादित असतात. परंतु, गुन्हा करण्यास उत्तेजन देण्यामध्यें हजारों निराळे गुन्हे उत्पन्न होतात व त्यांपासून बरे वाईट परिणामही निराळेच उत्पन्न होतात. शिवाय, जेव्हां एकादें दुष्टोत्पत्तीस येणारें कृत्य करणें गुन्हा असतो व त्या कृत्याचे परिणाम कायमचे दिसून येतात. तेव्हां तो गुन्हा शाबीत अगर नाशाबीत करण्यास चांगला पुरावा मिळणें बरेंचसें सोपें जातें. परंतु, जेथें एकादा मनुष्य अमुक शब्द बोलला किंवा नाही एवढाच काय तो प्रश्न असतो तेथें पुराव्यानें शाबीत करण्याच्या नेहेमींच्या रीति निरुपयोगी होतात. ह्मणून पक्षकार जो पुरावा कोर्टापुढें हजर करतील तो तपासण्यामध्यें फार दक्षता ठेवली पाहिजे. हल्लींच्या खटल्यांत जो गुन्हा करण्यास आरोपीनें उत्तेजन दिलें आहे, असें फिर्यादीचें ह्मणणें आहे, त्या गुन्ह्यांत सरकारचा हितसंबंध आहे. कारण, उद्युक्त केलेले गुन्हे घडून आले असते तर त्या गुन्ह्यापासून सरकारचे मालकीचे हक्काची पायमल्ली झाली असती. एखाद्या खाजगी मनुष्याची नव्हे. आणि नेहमींचा असा अनुभव आहे कीं, ज्या गोष्टींत सरकारचेच प्रत्यक्ष हितसंबंध असतात, त्यांत जर एकादी खरी गोष्ट अधिकारी लोकांना न आवडणारी असेल, ती साक्षीदार खरी सांगत नाहींत व ज्यावेळीं पोलिस लोक आरोपीस शिक्षा होण्याबद्दल अतिशय कळकळ दाखवितात व जेव्हां तो हेतु साध्य होण्याकरितां हरएक प्रयत्न करितात तेव्हां ही अडचण तर फारच मोठी होते. ह्मणून फिर्यादीतर्फे जो पुरावा येईल तो फार काळजीनें आणि सावधगिरीनें तपासला पाहिजे आणि आरोपीच्या अडचणीबद्दलही आरोपीस सवलत दिली पाहिजे असें सामान्य रीतीचें भाषण झाल्यावर बोडस खटल्याच्या कायदेशीर मुद्याकडे वळले. पहिल्या प्रथम त्यांनीं सांगितलें—अपराध जो ठेवला आहे त्यांत आरोपी जे शब्द बोलला ते विशेष शब्द

दाखल केले पाहिजे. व ह्यास क्रि. प्रो. को. २२३ यांतील उदाहरण आधार दाखविला. त्यांनीं आरोपांतील हा उणेपणा तक्रार करण्याचें हेतूनें दाखविला नाहीं. परंतु सामान्य आणि साधारण व अस्पष्ट जे शब्द आरोपांत आहेत त्यांचा चांगला अर्थ करावा असा हेतु होता. जरी चार्जांत फक्त ' उत्तेजन दिलें ' असे शब्द आहेत, तरी आरोपी जे शब्द बोलला त्या शब्दानें उत्तेजन दिलें असा अर्थ समजला पाहिजे. दुसरा कोणताही अर्थ होऊं शकत नाहीं. आरोपी तेच शब्द बोलला असें निःशंकपणें सिद्ध झाल्यावांचून ' उत्तेजन दिल्याचा गुन्हा शाबीत होणार नाहीं. ' चार्ज खालीं लिहिल्याप्रमाणें. "दिसेंबर १८ व्या तारखेस किंवा त्या सुमारास पनवेल तालुक्यांत बोर्ली येथें ३००० माणसांसमोर एक भाषण केलें. त्या भाषणानें लोकांना सरकारी परवानगीशिवाय ताडीचीं झाडें तोडण्यास उत्तेजन दिलें. ज्यायोगें लोकांना सरकारी फॉरेस्टांतील लांकूड परवानगीशिवाय तोडण्यास उत्तेजन मिळालें आणि जर कोणी सरकारी कामगार असें करण्यास हरकत करील किंवा एखाद्या मनुष्यास अटकेंत ठेवील तर त्या कामगारापासून त्याला सोडविण्यास व त्याच्यावर हल्ला करण्यास उत्तेजन दिलें ह्मणून तुझ्याकडून इं० पि० को० ११७ खालीं अपराध घडून आला आहे. "

मुख्य आरोप ११७ कलमाखालीं उत्तेजन दिल्याचा आहे, परंतु त्या कलमाखालीं अपराध होण्यास जीं कृत्यें करण्यास उत्तेजन दिलें असेल तीं कृत्यें गुन्हे असलीं पाहिजेत. हीं कृत्यें चार आहेत. ताडीचीं झाडें तोडणें, फॉरेस्टांतील लांकूड तोडणें, कायदेशीर अटकावाला प्रतिबंध आणि सरकारी कामगारांवर हल्ला. आरोपीनें शब्द ह्मटले ह्मणून जे फिर्यादींत लिहिलें आहे; ते शब्द येणेंप्रमाणें:—

" ताडीचीं झाडें तोडा, रानांत जाऊन लांकडे तोडा, जर पोलिस अटकाव करील तर त्याला ठोका. ते फक्त ५।१० असतील. त्यांना भिऊं नका; असें धरून चालू कीं, आरोपी हे शब्द बोलला आणि असेंही

'म्हणून कीं, कृत्यें खरोखर घडून आलीं, तरी देखील तीं कृत्यें करणें ते गुन्हे होणार नाहींत. आणि जर कृत्यें करणें गुन्हा नाहीं तर तीं करण्यास उत्तेजन देणें गुन्हा नाहीं. नंतर वकीलांनीं असें सांगितलें कीं, परवानगीशिवाय ताडीचा रस काढणें हा कलमाप्रमाणें अपराध आहे. ताडीचें झाड तोडणें हें निराळें आहे म्हणून तो गुन्हा नव्हे. ताडीचें मूळ उपटणें यास परवानगी लागत नाहीं असें अपकारी इन्स्पेक्टर यांनीं जबानींत सांगितलेंच आहे, परंतु रस पाझरत असतो तेव्हां मडकें खालीं ठेवणें याला ड्रॉइंग म्हणतात. झाड तोडलें जाईल तर त्यापासून रस सांपडणार नाहीं. कायद्यानें सुद्धां टॅपिंग व ड्रॉइंग यांमध्यें अंतर मानलेला आहे. कारण, ड्रॉईंग हा गुन्हा अपकारी आक्टाखालीं होतो आणि टॅपिंग हा फॉरेस्ट ॲक्टाखालीं येतो. जर दोन्हीचा अर्थ सारखा असता तर निरनिराळे आक्टाखालीं तें आलें नसतें. शिवाय, परवानगीशिवाय तोडण्यास आरोपीनें उत्तेजन दिलें नाहीं म्हणून पहिल्या नंबरचा गुन्हा फिर्यादीच्या पुराव्यानें देखील शाबीत होत नाहीं. दुसऱ्या नंबरच्या गुन्ह्याबद्दल वापरलेले शब्दांचा बरोबर अर्थ ठरविणें अवश्यक होतें. आरोपी फक्त म्हणाला; " रानांत जाऊन लांकडें तोडा " याचा अर्थ काय ? व तो कोणतें फॉरेस्ट समजला ? हे महत्त्वाचे प्रश्न आहेत आणि ते समजण्यास बोर्ली येथील सभेच्या हकीगतीकडे लक्ष्य दिलें पाहिजे. प्रॉसिक्यूशनतर्फे ११००० लोकांनीं सह्या केलेला अर्ज पुराव्यांत दिला आहे आणि अर्जाच्या नंतर लागलीच ती सभा झाली असें ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. अर्ज सरकारांनीं कचऱ्याच्या पेटींत टाकून दिला असें आरोपीनें ज्याबद्दल म्हटलें तो हाच अर्ज असावा अशी कल्पना आहे. आणि आठ दिवसांत उत्तर न आल्यामुळें बोर्ली येथील सभा भरली. असें जर आहे तर अर्जांत ज्या फॉरेस्टाबद्दल लिहिलें आहे त्याच फॉरेस्टांत शिरण्यास आरोपीनें लोकांस सांगितलें. सरकारांनीं तीन महिन्यांपूर्वीं जाहिरनाम्यांत मुद्दाम मागितलेल्या अर्जांपैकींच हा एक आहे. ह्या जाहिरनाम्या-

प्रमाणें कांहीं रक्षण केलेल्या रानांत लोकांना जाण्यास प्रतिबंध केला आहे व तक्रारी तीन महिन्यांच्या आंत कळवाव्या ह्मणून लिहिलें आहे. ही मुदत ७ दिसेंबरला संपली. व पुढें अर्ज जरी ९ तारखेला केला तरी तो अगोदर पुष्कळ दिवस तयार असला पाहिजे. कारण, ११००० लोकांच्या सह्या २ दिवसांत होणार नाहींत. अर्जांतील भाषा अगदीं निःशंक आहे आणि त्यांतील तिसऱ्या कलमांत तीन महिन्यांपूर्वीच्या जाहिरनाम्याचा उल्लेख केला आहे. या सर्व गोष्टींचा संगतवार विचार केला असतां असें दिसून येतें कीं, जाहिरनामा 'रक्षण केलेल्या' रानाविषयीं होता. अर्जांतिल रानाचा संबंधही त्याच 'रक्षण केलेल्या' रानाशीं होता; ह्मणून आपटे यांनीं लोकांना ज्या रानांत जाण्यास सांगितलें तें रान हेंच असलें पाहिजे. ह्मणून २५ कलमाप्रमाणें जें कलम फक्त रिझर्व्ह फॉरेस्टला लागतें, गुन्हा होत नाहीं. ३१ कलमाप्रमाणेंही निषिद्ध केलेला गुन्हा करण्यास आरोपीनें सांगितलें असेल पण फॉरेष्ट आक्टाच्या ३५ कलमाखालील गुन्ह्याची आरोपीवर शाबिती होत नाहीं. ३१ कलमाप्रमाणेंही आरोप ठेवितां येणार नाहीं. कारण, ३४ कलमाचा शेवटल्या प्याऱ्याचा सारांश असा आहे. " सरकारानें लोकांच्या हक्काविषयीं विचार केल्याशिवाय ३१ कलमाप्रमाणें शिक्षा अगर दंड करितां येत नाहीं. जाहिरनाम्यावरून लोकांचे हक्क दाखविण्याविषयीं सरकारनें मागणी केली त्याप्रमाणें लोकांनीं अर्ज केला पण त्याच्या हक्काचा विचार केला आहे असें उत्तर मुळींच आलें नाहीं. या सर्व गोष्टींमुळें रक्षण केलेले रानांत जाहिरनाम्याप्रमाणें शिरणाऱ्या व लांकूड तोडणाऱ्या मनुष्यास शिक्षा देतां येत नाहीं. आणि जर लांकूड तोडणें हा गुन्हा नाहीं तर त्याला उत्तेजन देणें नाहीं गुन्हा नसून ११७ कलमाखालीं येत नाहीं. ३७९ कलमही लागूं पडत नाहीं. कारण, रक्षण केलेल्या रानांत लांकूड तोडणें ही गोष्ट जर अप्रामाणिकपणें केली तरच चोरीचा अपराध होईल. अप्रा-

गाणिकपणें ह्मणजे लोकांचे स्वत: हक्क नसतां अन्यायानें घेणें. या ठिकाणीं लोक आपला रानांत हक्कसंबंध आहे अशा खरोखर विश्वासानें रानांत जातील ह्मणून त्यांच्या मनांत अप्रामाणिकपणाचा उद्देश असूं शकणार नाहीं. खरें ह्मटलें तर लोकांनीं अर्जांत स्पष्टपणें कळविलें आहे कीं, जाहिरनाम्यास न जुमानतां उत्तर मिळेपर्यंत, पुष्कळ दिवसपर्यंत चालत आलेले हक्काची वहिवाट त्यांनीं तशीच चालूं ठविली आहे ह्मणून ३७१ कलमाखालीं गुन्हा येत नाहीं. पिनलकोडच्या २२५ । ३५३ कलमांप्रमाणेंही गुन्हे होत नाहींत असें थोड्याशा विचाराअंतीं कळून येईल. हीं कलमें लागूं पडण्यास दोन गोष्टींची जरूरी आहे. पहिलें—ज्या कृत्याबद्दल पोलिस अटकाव करील—ह्या ठिकाणीं ताडी तोडणें अगर लांकूड तोडणें तें कृत्य गुन्ह्याचें असलें पाहिजे; परंतु या ठिकाणीं वि[illegible]द्ध केल्याप्रमाणें हीं कृत्यें गुन्हे होत नाहींत. दुसरें—अशा कृत्या[illegible]ल अटकाव करीत असतांना पो. कॉन्स्टेबल हे आपल्या अधिकारांत वागत असले पाहिजेत. या ठिकाणीं हेंही नाहीं. ६३ कलमाच्या ३ ऱ्या न्यायावरून स्पष्ट आहे कीं " कलम २९ अ. यांत येणाऱ्या गुन्ह्याशिवाय दुसऱ्या भागाखालील फॉरेष्टविरुद्ध गुन्ह्याबद्दल पोलिस अधिकाऱ्यांना गुन्हेगारास धरतां येत नाहीं. याठिकाणीं लोकांच्या हातून ३१ कलमाप्रमाणें गुन्हे हे तील ह्मणून पो. कॉन्स्टेबलला या गुन्ह्याबद्दल लोकांना धरण्याचा हक्क पोंहचत नाहीं आणि जर त्याला हक्क न हीं, तर लोकांनीं त्याला धरण्याच्या कामीं प्रतिबंध करणें किंवा स्वसंरक्षणासाठीं शक्तीचा उपयोग करणें देखील न्यायाचें होणार आहे. असाच प्रकार अपकारी ॲक्टांत आहे. कारण, अपकारी ॲक्टाखालील अपराधाबद्दल फक्त अपकारी कामगार किंवा ची० कॉन्स्टेबलवरील पोलिसअधिकाऱ्यालाच गुन्हेगार धरण्याचा हक्क आहे. ( मुंबईचा १८७८ चा ५ वा ॲक्ट कलम ३६ ) ह्मणून प्रतिबंध जर कायदेशीर आहे, तर २२५ अगर ३५३ या कलमांपैकीं कोणतेंही कलम लागू पडत नाहीं. सरते-

शेवटी ११७ पि० को० कलमाखालील आरोपाकडे आपण वळूं. या ठिकाणीं " उत्तेजन " १०७ पि० को० खालील पहिल्या पोट कलमांत येतें. फिर्यादीतर्फे कट होता असें शाबीत करण्याचाही प्रयत्न झालेला दिसून येतो, पण तो निःष्फळ होय. ह्मणून कटाची कल्पना आपण मनांतून आजीबात काढून टाकिली पाहिजे. आतां जर आरोपीनें खरोखर ते शब्द वापरले असतील तर कांहीं [illegible] करण्यास उत्तेजन दिल्याचा तो दोषी आहे; परंतु पि० को० ११७ कलमांतील भाषा संशयाची व सामान्य आहे. उदाहरणार्थः—जें कृत्य करण्यास समुदायांतील मनुष्यांना उत्तेजन दिलें असेल तें कृत्य त्या समुदायापैकीं एखाद्या मनुष्याचे स्वतः हातून झालें पाहिजे किंवा त्या समुदायांकडून झालें पाहिजे हें कलमावरून स्पष्ट नाहीं. बोडम वकीलांनीं अशी तक्रार केली कीं, समुदायांतील प्रत्येक मनुष्य [illegible] निराळा गुन्हा करतो तेव्हां हें कलम लागू पडत नाहीं. ( मेनू साहे-बाचें क्रि. को. पान ६ ) पुष्कळ कोळी लोकांनीं आपापले करार मोडण्याचें उदाहरण हल्लींच्या गोष्टीस लागू पडतें. या ठिकाणीं कित्येक लोक ताडीचीं झाडें तोडतील किंवा रानांत शिरतील आणि त्यांपैकीं प्रत्येकजणाकडून निरनिराळा गुन्हा होईल व त्या गुन्ह्याबद्दल तो स्वतःच फक्त जबाबदार आहे. ज्याअर्थीं असें आहे त्याअर्थीं ११७ कलम हें उघडपणें लागू होत नाहीं, व उत्तेजनासंबंधीं दुसरें कोणतेंही कलम लागू नसल्यामुळें आरोपीच्या हातून कोणताच गुन्हा होत नाहीं हें उघड होय. आतां **आपटे** यानें असें सांगितलें कीं, लोकांनीं मिळून रानांत जाऊन लांकडें तोडावीं. तर तें कृत्य सर्वांनीं मिळून केलेलें होईल. निदान पोलिस कॉन्स्टेबलच्या अटकावास प्रतिबंध करणें हें सर्वांचेंच कृत्य होईल. ह्मणून त्या ठिकाणीं ११७ कलम लागू पडेल परंतु त्याठिकाणीं अतिशय मोठी अडचण उत्पन्न होईल. ती ही कीं, बळजबरीनें दहापेक्षां अधिक लोकांनीं लांकूड तोडून नेणें; ही फक्त

चोरी ३७९ कलमाखालील न होतां ३९५ कलमाप्रमाणें दरोडा होतो. आरोपीवर या गुन्ह्याबद्दल चार्ज ठेवला असतांना त्याला सेशनकोर्टांत पाठविला पाहिजे आणि हल्लींची चालू असलेली चौकशी अधिकाराबाहेर होते ह्मणून गैरकायदेशीर होईल. याप्रमाणें अशी पंचाईत येऊन पडते. एक तर आरोपीनें गुन्हा करण्यास उत्तेजन न दिलें असलें पाहिजे, किंवा असा गुन्हा करण्यास उत्तेजन दिलें पाहिजे कीं, ज्याची चौकशी फक्त सेशनकोर्टांतच करतां येते. कोणत्याही प्रकारें हल्लींच्या कोर्टाला त्याजवर अपराध ठेवतां येत नाहीं.

नंतर वकीलांनीं फिर्यादीतर्फेच्या लेखी व तोंडी पुराव्यासंबंधानें थोडीशी टीका केली. लेखी पुरावा अगदीं निरोपयोगी होता. कारण, तो विसंगत असून त्यापैकीं कांहीं पुराव्यानें आरोपीच्या हकीकतीसच बळकटी आणली. तोंडी पुराव्यासंबंधानें वस्तुतः सर्व खटला तीन पोलिस कॉन्स्टेबलच्या पुराव्यावर. जर त्या पुराव्यास कांहीं बळकटी आली असें ह्मणतां येईल तर एक मुसलमान कोंबडीविक्या व त्याचा चाकर या साक्षीवर अवलंबून होता. दुसऱ्या साक्षीदारांपैकीं तलाठी आणि पोलिस कॉन्स्टेबल हे कबूल करितात कीं, त्यांची माहिती ऐकीव आहे. दुसरें साक्षिदार आरोपीवर गुन्हा आणण्यासारणें कांहींच सांगत नाहींत. परंतु फिर्यादीविरुद्ध पुष्कळ सांगतात. उदाहरणार्थः—साक्षिदार नंबर २ हलवाई असें सांगतो कीं, आरोपीनें जे शब्द ह्मटले ह्मणून फिर्यादींत लिहिलें आहे ते शब्द श्रोत्यांच्या तोंडांतून बाहेर पडले होते. आतां खरें कोण सांगत आहे किंवा श्रोत्यांपैकीं कोणी बोललें असतां नुसते चेष्टेनें तें शब्द वक्ते **आपटे** यांचे तोंडांत घातले असतील; हें शक्य नाहीं काय? जर अशी गोष्ट आहे, तर हा खटला कसा उपस्थित झाला याची आपणांस चांगली कल्पना करितां येईल. साक्षिदार नंबर ७८ शपथेवर सांगतात कीं, पोलिसांकडून अमुक एक गोष्ट सांगण्याकरितां त्यांच्यावर जुलूम झाला. साक्षिदार नंबर १० हा फिर्यादीतर्फे

वकील असल्यामुळें त्याचे बोलण्यावर विश्वास ठेवला पाहिजे. तो असें सांगतो कीं, आदले दिवशीं रात्रीं तो स्वत: आणि पोलिस कॉन्स्टेबल हे अपकारी कंट्राक्टर यांचे घरीं जमले होते. तेव्हां साक्षिदार नंबर ८ तेथें आला आणि त्यानें त्याजवळ दारू मागितली. यावरून पडद्याचे पाठीमागें काय चाललें होतें याची थोडीशी छाया दृष्टीस पडते. कारण, या सर्व मनुष्यांनीं त्या कंट्राक्टरच्या घरीं एकत्र कां जमावें व साक्षिदार नंबर ८ हा तेथें गेला यावरून त्याचें आणि पोलिसाचें कांहीं ठरलें असावें. जर फिर्यादीतर्फें सर्व पुरावा अशा रीतीनें बनविला असेल तर खरोखर हें त्यांतील सर्व मनुष्यांना अपमानास्पद आहे. आतां आपटे अमुक शब्द बोलतांना आह्मीं ऐकलें असें जे पांच साक्षिदार ह्मणाले त्यांच्यामध्यें विरुद्धता दिसून आली. आणि पुष्कळ वेळां एका मनुष्याच्याच मागून पुढून बोलण्यांत मेळ दिसेना. दौलती आणि सूर्याजी ह्मणतात कीं, गोपाळा त्यांच्यापासून कांहीं पावलांच्या अंतरावर होता. परंतु गोपाळा ह्मणतो कीं, स्वत:शिवाय मजला दुसरा कोणीही पोलिस शिपाई दिसला नाहीं. एकमेकांमध्यें इतकी विरुद्धता दिसून येते कीं, व इतका मेळ नाहीं कीं, आरोपी अमुक शब्द बोलला. या साध्या गोष्टीशिवाय त्यांचें कोठेंही एकमत होत नाहीं. त्याचप्रमाणें, फिरू आणि त्याचा चाकर, हे सर्व वेळ बरोबर असतांना उघड उघड गोष्टींत त्या दोघांमध्यें फेर पडला. फिरू ह्मणतो मी दहा वाजेपर्यंत कोंबड्या विकत घेत होतों. व दुसरा ह्मणतो कीं, त्या दिवशीं आह्माला कोंबड्या मुळींच मिळाल्या नाहींत. बोर्डी येथें ४।५ हजार जमलेल्या लोकांपैकीं एक धनी व एक चाकर या जोडप्याशिवाय अधिक चांगले आणि प्रतिष्ठित लोक पोलिसांना मिळूं नयेत हें फार आश्चर्य आहे. तो धनी मुसलमान असून कबूल करितो कीं, मला चांगलें मराठी कळत नाहीं. तरी पण **पोपटपंचीप्रमाणें आपटे** यांचे तोंडांतील शब्द पाठ ह्मणून दाखवितो. साक्ष

देतांना चाकर तर गोंधळलाच; आणि त्याला जें सांगावयाचें होतें तें माझे ध्यानांत नाहीं असें ह्मणाला, शिवाय हेंही लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं, या साक्षिदारांना पंधरा दिवसांनंतर उशीरानें पुढें आणलें. **बाकीचा सर्व पुरावा कुचकामाचा आहे.** नंतर आरोपीतर्फेच्या पुराव्यावर थोडीशी टीका करून या खटल्यांतील गोष्टी घडून येण्याच्या संभवाबद्दल कोर्टास सांगितलें. पुराव्यावरून हें स्पष्ट आहे कीं, सरकाराला अर्ज करण्याकरितां तालुक्यांतील लोकांनीं पुष्कळ सभा भरविल्या तर मग जे लोक कायदेशीर रीतीनें सरकारापाशीं दाद मागण्यांत गुंतले होते ते लोक कायदा मोडण्यास सांगणाऱ्या बंडखोराच्या बोलण्याकडे एक पळ तरी लक्ष्य देतील काय? शिवाय **आपटे** ह्मणजे कोण!! तो वीस वर्षांच्या आंतील एक मुलगा आहे; आणि या प्रांतांत अगदीं परस्थ आहे. अशा मनुष्यास सभेपुढें बोलण्याचें धैर्य असेल काय? किंवा जरी असलें तरी त्यानें बोललेले शब्द असें त्वेष आणणारें भाषण ऐकण्यास शांतपणा लोक दाखवितील हें होईल काय? निरुपद्रवी हजारों रयतेवर गैरमाहित **आपटे** यांचें काय वजन पडणार? जर कोणी वजनदार मनुष्य असता किंवा जिल्ह्यांतील एखादा पुढारी असता तर ही गोष्ट कांहींशी शक्य दिसली असती. परंतु, आरोपीप्रमाणें अगदीं गरीब मनुष्य आपल्या स्थितीच्या बाहेर असा अविचारी निघेल ह्यावर अगदीं विश्वास बसत नाहीं. आणि जर त्यानें अशी बडबड केली असेल, तर त्याची लागलींच छी, थूं झाली असती; हें निर्विवाद आहे. ह्या सर्व गोष्टींचा विचार करून कोर्टास **आपटे हा निरपराधी आहे** याशिवाय दुसरा कोणताही निर्णय करितां येणार नाहीं.

## ठाणे, अरुणोदय, ता० १७।१।१८९७ उतारा.

( मुद्दाम पाठविलेल्या बातमीदाराकडून. )

रविवार ता. १० रोजीं मी आगबोटींतून धरमतरीवर उतरलों. त्या

दिवशीं आगबोटींतून फार माणसें उतरलीं व तपास करतां नेहमींच्यापेक्षां हीं माणसें फार जास्त आहेत असें समजलें. इतकेंच नव्हें तर त्या दिवशीं आलिबागेकडून पेणेस जाणाऱ्या लोकांची रहदारीही फारच जास्त होती असेंही समजलें. धरमतरीवर उतरून मचव्यांत बसून खाडी चलांडून पेणाच्या अंगच्या धक्क्यावर उतरलों आणि कांहीं वेळ तेथें बसतों तों प्रो० साठे यांच्या बरोबर आपटे नांवाचा एक माणूस जो कैद केलेला आहे त्याची स्वारी तेथें येऊन दाखल झाली. ही मूर्ति सुमारें १८।१९ वर्षांच्या वयाची, गोरी, मोंडस असून दाढीमिशीस थोडी लव आलेली, डोक्यास हिरवा फेटा बांधलेला, पायांत बूट, स्टॉकिंग घातलेली व निर्भयपणें आपल्याच तोऱ्यांत व ऐटींत चाललेली अशी असून त्यांच्या भोंवतीं हत्यारबंद अशा १२ पोलिसचा पहारा होता. हा देखावा पहातांच मला व धक्क्यावरच्या सर्व लोकांस त्यांचें वय व गांभीर्य आणि पोलिसांचा फाजील बंदोबस्त हें पाहून मोठें आश्चर्य वाटलें, आणि देशहिताकरितां झटणाऱ्या माणसांचीं मनें कशीं असावींत याची बरीच कल्पना मनांत आली. या एकट्या पोराच्या किंवा मुलाच्या रक्षणार्थ बारा शिपाई व एक नाईक हे असून मागोमाग पोलिस इन्स्पेक्टरही होते तें पाहून तर जास्तच आश्चर्य वाटलें. इतकें पाहून मी एका टांग्यांत बसून पेणेस गेलों. इ. इ.

## आपटे यांजवरील खटला.

(मुद्दाम पाठविलेल्या बातमीदाराकडून)

ता० २४ जानेवारी १८९७ ठाणें. अरुणोदय पान २.

ठरल्याप्रमाणें हा खटला ता० १३ रोजीं पेण येथें म्याजि. मि. ब्रुक यांचे पुढें सुरू झाला. लोकांची गर्दी बहुतेक प्रो० साठे यांच्या खटल्याप्रमाणेंच होती. कांहीं अंशीं शेतकरी वगैरे खालच्या प्रतीच्या लोकांस साठ्यांपेक्षां आपट्यांबद्दल जास्त काळजी आहे असें दिसलें. आणि साठे हा उद्धेश मारीत व्याख्यानें देत फिरणारा असून आपटे हा लोकांत मिळून मिसळून वागणारा असल्यामुळें आपट्यांबद्दल लोकांस

जास्त काळजी असणें स्वाभाविकही आहे. साठ्यांकरितां जसा एक मुंबईचा वकील आला होता, त्याचप्रमाणें आपट्यांकरितांही मुंबईचा वकील मि. शिवराम विठ्ठल भांडारकर आला असून पनवेलचे मि. घारपुरे व पेणचे मि. बरवे असे आहेत. साठ्यांच्या कज्जांत सरकारतर्फे वकील नव्हता. पण आपट्यांच्या कामांत अलिबागचे वकील मि. जमशेटजी हे आहेत. यावरून आपट्यांवर शाबिती करण्याकरितां सरकारची जास्त तयारी आहे असें दिसतें. पुढें एकंदर खटल्यांतील साक्षींचा सारांश दिलेला आहे. तो पेण येथील सुधाकर पत्रांत दिलेलाच आहे. पान ३.

कोल्हारमुक्कामीं कज्जा सुरू होण्यापूर्वीं आपट्यांचा फोटोग्राफ घेतला. त्यांस मध्यें उभें करून भोंवतालीं १२ शिपाई हत्यारें उपसून उभे आहेत असा थाट करून त्यांचा फोटो घेतला. सुमारें २००० शेतकरी वगैरे लोक कोल्हार येथेंही कज्जाचे वेळीं तंबूभोंवतीं जमले होते. पण पेणप्रमाणें तंबूंत घुसण्यास मात्र येथें मनाई होती.

## २१ फेब्रुवारी १८९७, अरुणोदय, निकाल. पान १.

मागें सांगितल्याप्रमाणें आरोपीतर्फेची तकार मागच्या शुक्रवारीं झाली आणि गेल्या सोमवारीं म्याजि. नें आपला ठराव सांगून आरोपी आपटे यांस एक वर्ष साधी कैद व दोनशें रुपये दंड व दंड न दिल्यास आणखी तीन महिने कैद अशी शिक्षा दिली व कैदी आपटे हा गेल्या बुधवारीं ठाण्याच्या तुरुंगांत दाखलही झाला. हा आपटे कोण काय हें अजूनही कोठें बाहेर आलेलें नाहीं तरी त्याच्यावरील खटला ज्या ज्या ठिकाणीं चालला त्या त्या ठिकाणीं त्या त्या दिवशीं शेतकरी वगैरे लोकांचा फार मोठा जमाव होत असे. असें जें आढळत होतें त्यावरून तो त्या शेतकरी वगैरे लोकांस फार आवडता झाला होता असें अनुमान काढण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. आपल्यावरील खटला कायदेशीर न्यायाधीशापुढें कायदेपंडितांच्या साह्यानें चालून त्यास शिक्षा झाली असल्यामुळें ती अमलांत येणें रास्त आहेच. पण त्याजवर सरकारतर्फेनें जो गुन्हा करण्यांत आला आहे तो इतका कोता व नेमका आहे कीं, स्वतंत्र रीतीनें विचार

करणाऱ्या कोणत्याही जूरीपुढें तो क्षणभरही टिकण्यासारखा नव्हता. सरकारतर्फेनें पुढें आलेल्या साक्षीदारांची योग्यता वगैरेचा विचार एका बाजूस ठेवून त्यांनीं सांगितलेल्या गोष्टींचाच जरी विचार करूं लागलें तरी सरकारतर्फेच्या साक्षीवरूनच कैदीवर शाबिती करतां येत नाहीं असें ह्मणणें भाग पडतें. पण आज आह्मांस त्याबद्दल विचार करावयाचा नाहीं. कारण, कैदी हा झालेल्या शिक्षेवर अपील करील असें वाटतें. तेव्हां अपीलाचा निकाल होईपर्यंत अगर मुदत संपेपर्यंत उगीच बसणेंच भाग पडतें.

## अरुणोदय, २७ जून १८९७. पान. २

आपट्यांचें अपील काल ठाण्याच्या सेशन जज्जापुढें सुनावणीस निघालें होतें. दोन्हीं बाजूंच्या तक्रारी वगैरे झाल्या. ठराव बहुतेक उद्यां सांगण्यांत येईल असें वाटतें. या अपीलाच्या सुनावणींत एक नवी गोष्ट पहाण्यांत आली व ती पाहून फार वाईट वाटलें. सेशन कोर्ट ह्मणजे जिल्ह्यांत एक महत्त्वाचें कोर्ट मानलें जातें. आणि या कोर्टांत सरकारचे दोन वकील हजरही आहेत. असें असतां या अपीलांत आरोपीतर्फे ऑन. मि. दाजी आबाजी खरे हजर असून सरकारतर्फे खालच्या कोर्टांतल्या एका वकिलास नेमिलें होतें. व त्यामुळें अपिलाच्या सुनावणीच्या प्रकारांत नेहमींचा गांभीर्यपणा दिसत नव्हता ह्मणून कोर्टाची योग्यता व थोरपणा कायम रहाण्याकरितां यापुढें असा प्रकार न होईल तर बरें असें वाटतें.

## ठाणा, अरुणोदय, ता. ४ जुलई १८९७. पान १.

### ( अपीलाचा निकाल. )

गेल्या शनिवारीं आपटे यांचें अपील चाललें. त्याविषयींची हकीकत मागल्या अंकीं कळविलीच आहे. ती हकीकत लिहीत असतांना अपिलाचा निकाल सांगितला नव्हता. तरी त्या दिवशीं आरोपीतर्फे झालेल्या तक्रारीवरून आपटे यांचा तुरुंगवास लौकरच संपतो असें वाटत होतें. ज्यांनीं ह्मणून समक्ष या कज्जाची हकीकत ऐकिली असेल त्यांचेंही

आमच्याप्रमाणेंच मत झालें असावें अशी आमची समजूत आहे. परंतु, जगांत वारंवार असें घडतें कीं, आपणांस वाटतें एक आणि आपला मनोभंग करण्याकरितांच जणूं काय घडून येतें भलतेंच. अपिलाचा निकाल येथील से० जज्ज मि० ऑलकॉक यांनीं सोमवारीं सांगितला. खालील कोर्टाचा ठराव कायम करतांना साहेबमजकुरांनीं दिलेल्या कारणांचा विचार करितां से० कोर्टाचीही प्रवृत्ति कधीं कधीं म्याजिस्त्रेटी न्यायपद्धतींचें अनुकरण करण्याकडे कशी होते तें स्पष्ट दिसून येतें. आपटे हे लोकांना अपराध करण्यास उद्युक्त करणारे शब्द बोलले ह्याबद्दल काय तो पुरावा फिर्यादीतर्फे तीन पोलीस शिपायांचाच आहे हें जज्जसाहेबासही कबूल आहे. पण त्यांच्या जबानींत असें कांहीं नाहीं कीं, ज्यावरून त्यांच्यावर विश्वास ठेवितां येत नाहीं असें त्यांचें ह्मणणें आहे. बरोबरच आहे. साक्षीदारांच्या जबानींतला फरक क्षुल्लक असून महत्त्वाचा नाहीं. असा एक शेरा मारून गैरविश्वास उत्पन्न करणाऱ्या कारणांचा निकाल लावल्यावर आपटे बोलले ह्मणून जे शब्द पोलिस सांगतं ते कागदावर कायम रहातात. घालवितां येत नाहीं. हें खरें आहे. अनेक जातींच्या तीन हजार लोकांनीं भरलेल्या सभेची हकीकत सांगण्यास सरकारास सरकारी शिपाई याशिवाय किंवा एखादा कोंबडीविक्या आणि रेवडीविक्या ह्यांशिवाय दुसरे साक्षिदार मिळूं नयेत हेंच आमच्या मतें आरोपीच्या **निरपराधित्वाची** उत्तम साक्ष आहे. अशा रीतीनें नुसत्या पोलिसाच्या साक्षीवरून म्याजि. नें दिलेल्या शिक्षा वरपर्यंत कायम करण्यांत येतील तर कोणावर केव्हां काय प्रसंग येईल याचा नेमही नाहीं; पण सर्व लोक पडले ब्राह्मणांच्या मुठींत ! तेव्हां सरकारास स्वतंत्र साक्षिदार मिळावे कसे ? ह्या अपूर्व पण निराधार कोटिक्रमाचा आपल्या ठरावांत उल्लेख न करण्यांत साहेबांनीं बराच शहाणपणा दाखविला आहे. तथापि हें माजिस्त्रेटी कारण त्यास अगदींच रुचलें नसेल असें वाटत नाहीं. बिचाऱ्या ह्या भांबावून गेलेल्या इंग्रजी अंमलदारास इतकें समजत नाहीं कीं, ज्या वेळीं

खरोखरच सर्व जाति ब्राह्मणांच्या मुठीमध्यें येतील त्या वेळीं अशा जाहीर-सभा भरवून त्यांत पोलिसच्या समक्ष तासानुतास बोलण्याची अवश्यकताही रहाणार नाहीं.

हा ठराव केवळ वरवर वाचून पहाणाऱ्याच्या सुद्धां ध्यानांत आल्याशिवाय रहाणार नाहीं कीं, सेशन कोर्टांतील न्यायासनही पूर्वबद्ध कल्पनांनीं भ्रष्ट झालें आहे. सभेच्या हकीकतीविषयीं तलाठ्यानें मामलेदाराकडे जो रिपोर्ट केला आहे तो स्वतःच्या माहितीवरून लिहिला नसल्या कारणानें कायदेशीर रीतीनें पुराव्यांत घेतां येत नाहीं. तथापि फिर्यादीतर्फे तो पुराव्यांत आल्यामुळें आरोपीला मात्र फिर्यादीविरुद्ध त्याचा उपयोग करितां येतो अशी वस्तुतः आरोपीतर्फे तक्रार होती व आरोपी जे शब्द बोलला असें फिर्यादीचें ह्मणणें आहे ते शब्द त्यानें उच्चारले देखील नाहींत असें ह्या रिपोर्टावरून त्यांनीं स्पष्ट दाखविलें होतें आणि ही तक्रार अगदीं बिनतोडही होती. पण ती समजून घेण्याची पर्वा एक तर जज्जसाहेबांनीं केली नसावी किंवा समजून उमजूनही तिकडे दुर्लक्ष्य केलें असावें असें दिसतें. कारण, आरोपी काय बोलला हें दाखविण्यास फिर्यादी व आरोपी ह्या दोघांसही त्या रिपोर्टाचा सारखाच उपयोग करितां येत नाहीं असें जज्ज साहेबांनीं ठरविलें आहे. पण आरोपी काय बोलला हें दाखविण्यास त्या रिपोर्टाचा उपयोग करावयाचा नसून आरोपी अमुक बोलला असें जें फिर्यादीचें ह्मणणें आहे तें त्यावरून सिद्ध होत नाहीं. असें आरोपीतर्फे वकील **ना. खरे** यांचें ह्मणणें होतें. ही गोष्ट साहेब बहादुरांच्या नजरेतून कशी चुकली तें सांगवत नाहीं. परंतु, सगळ्यांत आश्चर्य हें कीं, संशयाकुल म्याजि. च्या तडाक्यांतूनही जो तलाठी निर्विघ्नपणें सुटला त्या बिचाऱ्यावर मात्र जज्ज साहेबांनीं जातां जातां आपल्या अमंगळ संशयाचा शिंतोडा उडविला आहे. संशय इतकाच कीं, आरोपीला बचावण्याचा हेतु तलाठ्याचा कशावरून नसेल. होय. पोलिसाच्या ह्मणण्याप्रमाणें आरोपी बोलला असें तलाठ्याच्या रिपोर्टांत नाहीं. येवढ्याच कारणाकरितां जर तलाठ्यावर हा निराधार संशयारोप करणें रास्त होत असेल

तर आपल्याला शिक्षा करण्याचा पोलिसचा उद्देश होता असें अनुमान जास्त सयुक्तिक रीतीनें काढतां येणार नाहीं काय ? त्यांतही हें निवळ अनुमान नसून त्यास पुराव्याची बळकटी आहे. ना. खरे यांच्या तक्रारीचा दुसरा मुख्य मुद्दा असा होता कीं, चार्जमध्यें टॅप हा शब्द घातला आहे. करितां अपकारी आक्टाप्रमाणें अपराधच मुळीं होत नाहीं. या आक्टाच्या ज्या कलमाअन्वयें आरोप ठेवला आहे त्या कलमाप्रमाणें ताडी काढणें हा अपराध होतो; तुमच्या टॅपिंगनें होत नाहीं. ह्यावर साहेबांचा कोटिक्रम मोठ्या मौजेचा आहे. ते ह्मणतात:—ज्याअर्थीं ताड लावल्याशिवाय ताडी काढणें संभवनीय नाहीं. त्याअर्थीं तो अपराध करण्याचा प्रयत्न होय. जजमेंट लिहितांना साहेबांच्या जवळ पिनलकोड होता किंवा नाहीं हें समजण्याचा मार्ग नाहीं. परंतु, साहेबांनीं वापरलेली कायद्याची भाषा नव्हे हें खास. अपराध करण्याचा प्रत्येक प्रयत्न पिनलकोडांत सांगितलेला " अपराध" होत नाहीं हा कोटिक्रम जरा पुढें चालविला तर झाड लावल्याशिवाय त्यापासून दारू काढणें अशक्य आहे ह्मणून झाडें लावणेंही अपराधच समजला पाहिजे. पण इतका विचार करावा कोणीं ? किंवा फिर्यादीची तक्रार ऐकून संसर्गजन्य अज्ञानरोगानें तर न्यायदेवता भ्रांतिपटलांत गूढ झाली नसेलना ! असो. ठरावांतील ह्या ठोकळ ठोकळ गोष्टी आह्मीं सांगितल्या. एकंदरींत सर्व ठराव वाचून पहातां असें वाटतें कीं, माजिस्ट्रेटच्या ठरावांत कित्येक ठिकाणीं हास्यास्पद कारणें व अनुमानें काढल्यामुळें जी एक प्रकारची बालिशता दृग्गोचर होते ती, सेशन्स जज्जांच्या मोठ्या पगाराच्या मेंदूतून विशेष भारदस्तपणा तितकींच अयोग्य कारणें निवडून, भरून काढण्याची व त्यायोगें खालील ठराव मजबूत करण्याची त्यांस जी संधि मिळाली ती त्यांनीं व्यर्थ जाऊं दिली नाहीं. असो. ह्या कामात हायकोर्टांत बहुधा अपील होईलच तर तेव्हां तरी सर्व गोष्टींचा न्याय करण्याच्या बुद्धीनें विचार होईल अशी आशा आहे.

मुंबई हायकोर्टांत तपासणीअर्ज तीन मुद्यांवर करण्यांत आला होता. ते मुद्दे येणेंप्रमाणें:—

१ फिर्यादीतर्फे तीन साक्षीदार झाले. त्यांची उलट तपासणी करण्या-करितां आरोपीनें समन्स काढण्याचा हुकूम मागितला; व तो माजिस्ट्रे-टनीं नाकारला. हें कायदेशीर किंवा करें ?

२ आरोपीच्या तोंडून जे शब्द निघाले त्यायोगानें गुन्ह्यास उत्तेजन दिल्यासारखें होतें कीं काय ?

३ आणि त्या शब्दांचा उपयोग इं० पि० को० ११७ कलमांतील अपराधांत येतो कीं काय ?

वरील तीन मुद्यांवर तपासणीअर्ज करण्यांत आला होता. परंतु, हायकोर्टांतील मोठ्या पगाराच्या व मोठ्या अधिकाराच्या जज्ज साहेबांनीं, खालील कोर्टांतील कमी पगाराच्या व कमी अधिकाराच्या साहेबांनी आपलें डोकें खर्च करून जो निकाल सांगितला होता, तोच निकाल कायम केला. असो--

**मी असें ह्मणतों कीं**--माझा न्याय तिन्ही कोर्टांत योग्य न्यायानें न होतां विनाकारण मजला तुरुंगवास मात्र भोगावा लागला. " बळी तो कान पिळी " या ह्मणीप्रमाणें तिन्हीं कोर्टांनीं " न्यायी इंग्रज सरकारचें " राज्यांत न्यायाचा मासलाच दाखविला असें ह्मणणें भाग पडतें

असो. आतां आमचें इतकेंच ह्मणणें आहे कीं, हल्लींचे राज्याधिकारी राज्यकर्ते यांनीं, आपल्या निर्बल, निःशस्त्री, निराधार, दीन व निर्धन अशा प्रजेवर करडी नजर न करितां "न्यायमंदिरांत योग्य न्याय" अधिकारांत जातिभेद न पहातां योग्य अधिकार, व मिठावरील कर वगैरे सौम्य करून आह्मां प्रजेचें लालनपालन योग्य न्यायानें करणें हें सरकारचें कर्तव्य होय. ह्मणून हल्लींचें आमचें सरकार " बादशहा प्रिन्स ऑफ वेल्स " हें चिरायु होऊन आह्मां अनाथ प्रजेला सुख देवोत !

अशी मी सदय अंतःकरणानें या पुस्तकद्वारें सरकारास विनंति करीत आहें.

REFBK-0000088